




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार ६ जुलै २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०


# ‘आम्हाला भाजपामुक्त राम हवा आहे’




## मुंबईतून उद्धव ठाकरेंची गर्जना

**मुंबई/प्रतिनिधी** : अयोध्येच्या राम मंदिरात चोरी झाली आहे. या प्रकरणी आता शिवसेना ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली असून रामरक्षा आंदोलन सुरु केलं आहे. याच आंदोलनात बोलत असताना उद्धव ठाकरेंनी आम्हाला भाजपामुक्त राम हवा आहे अशी घोषणा केली आहे. उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत दादरच्या हनुमान मंदिरात शिवसेना ठाकरे गटाकडून रामरक्षा पठण करण्यात आलं आणि त्यानंतर महाआरती करण्यात आली. यावेळी खासदार संजय राऊत यांची देखील उपस्थिती होती.

### शिवसेनेने राम मंदिराला दिलेली चांदीची वीट कुठे गेली?- उद्धव ठाकरेंचा सवाल

शिवसेनेने राम मंदिराला दिलेली चांदीची वीट कुठे गेली? रामरक्षा आंदोलन म्हणजे भर पावसात पेटलेली ठिणगी आहे. शिवसेना संपवण्याचा अफजलखानी विडा त्यांनी उचलाय. त्यामुळे या आंदोलनासाठी सर्वांनी आता एकत्र या, जोपर्यंत या चोरीचा निष्पक्षपातीपणाने निकाल लागला जात नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही. अशी मोठी घोषणा देखील यावेळी उद्धव ठाकरे यांनी केली आहे, त्यामुळे आता भविष्यात हे आंदोलन अधिक तापण्याची शक्यता आहे. दरम्यान आता जी जाग आली आहे, ती जाग तशीच ठेवा, झोपू नका, असंही यावेळी उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. भर पावसामध्ये हे आंदोलन आज मुंबईमध्ये पार पडलं आहे. या आंदोलनाला ठाकरे गटाचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

उद्धव ठाकरे यांनी अयोध्यमध्ये झालेल्या चोरीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. राम मंदिरासाठी कारसेवकांनी रक्त सांडलं आहे, आम्ही भोळे-भाबडे हिंदू आहोत, पण मूर्ख नाही. कुणी मंदिर लुटत असेल तर हिंदू कधीही माफ करणार नाही, असा हल्लाबोल यावेळी उद्धव ठाकरे यांनी केला आहे. तसेच राम मंदिराला केलेलं सगळं दान कुठे गेलं असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला. हिंदुंचे पैसे लुटता, तुम्हाला लाज वाटली पाहिजे. आम्हाला भाजपमुक्त राम हवाय. त्यामुळे आता राम रक्षा करण्यासाठी रस्त्यावर उतरा असं आवाहन ☞(पान २ वर)

## उद्धव ठाकरे यांनी रामाचा मार्ग स्वीकारावा; रोज रामरक्षा म्हणावी

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा टोला!

**चंद्रपूर /प्रतिनिधी** : अयोध्येतील रामाच्या चढाव्याच्या कथित चोरीप्रकरणावरून उद्धव ठाकरे यांनी आंदोलनाचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करत त्यांना रामाचा मार्ग स्वीकारण्याचा सल्ला दिला. चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे धार्मिक कार्यक्रमासाठी आले असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना ही प्रतिक्रिया व्यक्त केली.



चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे धार्मिक कार्यक्रमासाठी शोभाताई फडणवीस यांच्या निवासस्थानी आले असताना त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना फडणवीस म्हणाले, ‘उद्धव ठाकरे यांना राम आठवले, याचा मला आनंद आहे. आमची अपेक्षा एवढीच होती की त्यांना राम आठवले पाहिजेत. त्यांनी रामाचा मार्ग सोडला होता, त्यामुळे त्यांच्या पक्षाची अधोगती झाली. त्यांनी रामाच्या मार्गाने चालले तर त्यांचे भले होईल. केवळ आजच्या दिवसापुरते नाही, तर त्यांनी रोज रामरक्षा म्हणावी, अशी माझी अपेक्षा आहे.’ दरम्यान, अयोध्येतील रामाच्या चढाव्याच्या कथित चोरीप्रकरणावरून उद्धव ठाकरे यांनी आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे दिसत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही प्रतिक्रिया दिली असून त्यांच्या वक्तव्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. राज्यातील सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विविध मुद्द्यांवरून सुरू असलेले आरोप-प्रत्यारोप आता धार्मिक आणि भावनिक विषयांपर्यंत पोहोचल्याचे चित्र दिसत आहे. आगामी काळात या प्रकरणावरून आणखी राजकीय प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मुंबईत मुसळधार पावसाचा ‘ऑरेंज अलर्ट’!

## ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण, रायगडमधील शाळा-कॉलेजांना सुटी जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईसह संपूर्ण उपनगरे आणि लगतच्या जिल्ह्यांमध्ये पावसाने रौद्ररूप धारण केले आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार आणि मुसळधार पावसामुळे ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील अनेक सखल भागांत पाणी साचले असून पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाने उद्या सोमवार, दिनांक ६ जुलै २०२६ रोजी या भागात ’ऑरेंज अलर्ट’ जारी करत अत्यंत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण-डोंबिवली आणि संपूर्ण रायगड जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना उद्या ६ जुलै रोजी सुटी जाहीर करण्यात आली आहे.

**शाळा-कॉलेज बंद, पण कार्यालये सुरू राहणार!**

बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, केवळ शाळा आणि महाविद्यालयांनाच उद्या ६ जुलै रोजी सुटी असेल. शहरातील सर्व शासकीय आणि खाजगी




कार्यालये मात्र नेहमीप्रमाणे नियमितपणे सुरू राहतील. त्यामुळे नोकरदार वर्गाला कार्यालयात जावे लागणार आहे.

### शिक्षकांना मात्र आपत्ती व्यवस्थापनासाठी हजर राहावे लागणार

शाळांना सुटी जाहीर करण्यात आली असली, तरी पनवेल आणि रायगडमधील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेत उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पूर परिस्थिती आणि आपत्कालीन व्यवस्थापनाच्या कामासाठी प्रशासनाला मदत करणे या कर्मचाऱ्यांना बंधनकारक असणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पालिकेचा तातडीचा निर्णय**

पावसाचा जोर आणि सोसाट्याचा वारा यामुळे सखल भागात पाणी साचण्याची आणि वाहतूक विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत शाळा-कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणताही त्रास☞(पान २ वर)



## जांभुळवाडी सोसायटीत ७ कार, ७ दुचाकींवर शेड कोसळले

**पुणे/प्रतिनिधी** : शहरावर तब्बल १०० तासांपासून पावसाची संततधार सुरू असल्याने, गेल्या ४८ तासांत झालेल्या झाडपडीमुळे अनेक भागांतील उभ्या वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. कार, रिक्षा आणि दुचाकींवर मोठी झाडे कोसळली. जांभुळवाडी भागात पार्किंग शेडवर सीमाभिंत कोसळल्याने नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. सुदैवाने कुठेही जीवितहानी झाली नसली तरी, अग्निशमन दलाची गेल्या ४८ तासांपासून प्रचंड धावपळ सुरू आहे. रस्त्यांवर आणि गाड्यांवर पडलेली झाडे कापून बाजूला करताना जवानांची दमछाक होत आहे.

**जांभुळवाडी सोसायटीत हाहाकार-** रविवारी पहाटे ३ वाजून २४ मिनिटांनी समृद्धी लेक सोसायटी (जांभुळवाडी रोड) येथे संततधार पावसामुळे सोसायटीची सीमाभिंत पार्किंग शेडवर कोसळली. त्यामुळे लोखंडी शेड संपूर्णपणे खाली आले. यात खाली पार्क केलेल्या अनेक चारचाकी आणि दुचाकी गाड्यांचे मोठे नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच कात्रज व सिंहगड अग्निशमन केंद्रातील जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. ☞(पान २ वर)

## सासरवाडीला आलेल्या जावयाला मेव्हण्याने पेट्रोल टाकून जिवंत जाळले; मेहुणीचाही झाला मृत्यू

**तरनतारन/वृत्तसंस्था-** : पंजाबमधील तरनतारन जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आपल्या रुसलेल्या पत्नीला मनवण्यासाठी सासरच्या घरी पोहोचलेल्या एका व्यक्तीवर त्याच्या मेव्हण्याने भररस्त्यात पेट्रोल ओतून त्याला जिवंत जाळले. या भयंकर आगीत होरपळून जावयाचा जागीच मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे, त्याला वाचवण्यासाठी धावून आलेली त्याची मेहुणीही या आगीत गंभीररीत्या भाजली होती, तिचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.



ही घटना १३ जून रोजी घडली होती, या घटनेचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल झाला असून संपूर्ण देश हादरला आहे. पोलिसांनी दिलेल्या ☞(पान २ वर)

## वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा देवगड तालुक्याला तडाखा

### कुणकेश्वर, मणचे, शिरवलीत घरांचे नुकसान

**देवगड /वृत्तसंस्था-** : देवगड तालुक्यात रविवारी वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसाने मोठा तडाखा दिला. तालुक्यातील कुणकेश्वर, मणचे आणि शिरवली परिसरात घरांचे तसेच झाडांचे नुकसान झाले. अनेक ठिकाणी घरांच्या छपरांवरील सिमेंट पत्रे उडाली, भिंती कोसळल्या, तर झाडे घरांवर कोसळल्याच्या घटना घडल्या. सुदैवाने या सर्व



घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.

यंदा पावसाला उशिरा सुरुवात झाली असली, तरी जुलैच्या पहिल्याच आठवड्यात तालुक्यात पावसाने १,०५० मिलिमीटरचा टप्पा पार केला आहे. रविवारी एकाच दिवसात १०६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. कुणकेश्वर येथील सत्यवान दत्ताराम कुणकेश्वरकर यांच्या घरावरील सिमेंट पत्र्याचे छप्पर वादळी वाऱ्यामुळे उडून नुकसान झाले. या☞(पान २ वर)

## पोलिस वहसातीला लागून गुटख्याचे गोदाम; ४० लाखांचा मुद्देमाल जप्त

**यवतमाळ /प्रतिनिधी : :** जिल्ह्यात कॅन्सरचा विळखा वाढत असताना प्रतिबंधित गुटख्याची मात्र सर्रास विक्री सुरू आहे. यवतमाळ शहरातून कुमारने मोठे नेटवर्क उभे केले होते. पोलिस त्याच्या सातत्याने संपर्कात होते. मात्र, कोणीही त्याच्यावर कारवाई केली नाही. अगदी पोलिस वसाहतीला लागून पळसवाडी कॅम्प परिसरातच गुटखा साठविण्याचे गोदाम तयार केले होते. सर्वश्रुत गोदामावर रविवारी दुपारी शहर पोलिसांच्या शोध पथकाने धाड टाकली. येथे तब्बल कारसह ४० लाखांचा मुद्देमाल मिळाला.

कुमार रामचंद्र ओचाणी (३७, रा. पळसावाडी सिंधी कॅम्प, यवतमाळ) असे गुटखा तस्कराचे नाव आहे. कुमार



हा व्यवसाय अनेक वर्षांपासून करत आहे. कायद्यातील त्रृटींमुळे त्याच्यावर कठोर कारवाई झाली नाही. यापूर्वी त्याला पांढरकवडा येथे टोलनाक्यावर गुटख्यासह पकडण्यात आले होते. २०२३ मध्ये अन्न सुरक्षा अधिकारी व पोलिसांनी पांढरकवडा येथे त्याच्याविरुद्ध ☞(पान २ वर)

### घराची बेकायदेशीरपणे झडती घेतल्यामुळे

## महिलेला १० हजार रुपये नुकसान भरपाई

**नागपूर/प्रतिनिधी** : खापा पोलिसांनी तपासाच्या नावाखाली बेकायदेशीरपणे घराची झडती घेऊन मोबाईल जप्त केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पीडित महिलेला १० हजार रुपये नुकसान भरपाई मंजूर केली. न्यायमूर्तिद्वय उर्मिला जोशी-फलके व निवेदिता मेहता यांनी पोलिसांची कारवाई मनमानी ठरवत हा निर्णय दिला.




भरपाईची रक्कम अदा करण्यासाठी राज्य सरकारला दोन महिन्याची मुदत देण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास भरपाईच्या रकमेवर ३ जुलैपासून ते प्रत्यक्ष रक्कम अदा करण्याच्या तारखेपर्यंत आठ टक्के व्याज लागू होईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, ही ☞(पान २ वर)




# महाविद्यालयीन वेळेत बस स्टँड परिसरात अतिरिक्त ट्रॅफिक पोलीस कर्मचारी तैनात करा

## नगराध्यक्षाची नांदगाव पोलीस प्रशासनाकडे मागणी

**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधीः-** शैक्षणिक सत्राला सुरुवात झाली असल्यामुळे शहरातील बस स्टँड परिसर चांदुर रेल्वे रोड तसेच पहूर रोड येथे विद्यार्थी व नागरिक आणि वाहनाची एकच गर्दी होत असते. या परिसरात शाळा सुटण्याच्या वेळी अतिरिक्त ट्रॅफिक पोलीस व महिला पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी अशी मागणी नगर पंचायतच्या नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर यांनी नवनियुक्त ठाणेदार अनिल पिदुरकर यांना निवेदन सादर करून केली.

नुकतीच ३० जून पासून शैक्षणिक सत्रास सुरुवात झाली असून नांदगाव शहरातील शाळा,महाविद्यालये हे चांदुर रेल्वे रोड भागात व बस स्टँड परिसरात आहे आणि सदर परिसरात इतर सर्वच विभागाचे शासकीय कार्यालये, बँक सुद्धा याच परिसरात आहे. शाळा सुटण्याच्या वेळी विद्यार्थी ,कर्मचारी ,नागरिक व वाहनाची एकच गर्दी



होत असल्याने शाळा सुटण्याच्या वेळी या परिसरातील वाहतूक व्यवस्था कोलमळते शिवाय अमरावती यवतमाळ रोड हा वाहतुकीचा असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता नकारता येत नाही. तेव्हा विद्यार्थ्यांच्या व विशेषता मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या परिसरात सकाळी १० ते १२ व सायंकाळी ४ ते ६ दरम्यान अतिरिक्त पोलिस कर्मचारी व बस स्टँड परिसरात महिला पोलीस कर्मचारी नियुक्त करावा अशी मागणी पोलीस प्रशासनाकडे निवेदन सादर करून केली आहे. यावेळी नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर, न.प.गटनेते प्रकाश मारोटकर, सभापती कांता लोमटे, वासुदेव लोखंडे, मौ. रियाज नगरसेवक मो. साजिद, निलेश एखार, काँग्रेसचे अध्यक्ष अमोल धवसे, शुभम रावेकर, अक्षय हिवराळे, हिमांशू तोटे, सुमित लोमटे इत्यादी उपस्थित होते.

# लोकनेते प्रा.बी.टी.देशमुख यांच्या स्मृती प्रित्यर्थ मातोश्री वृद्धाश्रम येथे सामाजिक उपक्रम व श्रद्धांजली

**अमरावती ः** नुटा संघटनेच्या वतीने संघटनेचे संस्थापक लोकनेते प्रा. बी.टी. देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मातोश्री वृद्धाश्रम भानखेडा येथे श्रद्धांजली व ज्येष्ठ मंडळींना गरजू वस्तूंचे वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमाला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, नुटा संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी, नगरसेवक मिलिंद चिमोटे, बीटी भाऊंचे बंधू भरत देशमुख, मातोश्री वृद्धाश्रम चे संचालक सु. गो. राऊत, नुटाचे अमरावती जिल्हाध्यक्ष डॉ.तीर्थराज रॉय हे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. बी. टी. देशमुख यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. डॉ. रवींद्र मुंद्रे यांनी प्रास्ताविकातून बी.टी. अर्थात भाऊंच्या सामाजिक, शैक्षणिक कार्याची माहिती दिली. सु. गो. राऊत यांनी भाऊंच्या शिक्षण व सिंचनाच्या चळवळी बाबत व विविध सामाजिक उपक्रमाची माहिती विशद करत भाऊंना अभिवादन केले. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ मंडळींना गरजू वस्तूंचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला संघटनेचे व सामाजिक चळवळीचे कार्यकर्ते डॉ.रवींद्र मुंद्रे, डॉ.प्रवीण इंगळे, डॉ.विलास ठाकरे, डॉ. उमेश कडू डॉ. किशोर साबळे, डॉ. राजेश मिरगे, डॉ. सौरभ घोगरे, डॉ. दिनेश पुंड,कैलास चव्हाण आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# दर्यापूर वकील संघ, निवडणूक ः डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून परिवर्तन पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर वकील संघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परिवर्तन पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ आज (दि. ५ ) सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. यावेळी पॅनलच्या सर्व उमेदवारांनी एकजुटीने विजयाचा निर्धार व्यक्त केला.



परिवर्तन पॅनलकडून अध्यक्षपदासाठी ॲड. प्रदीप शेळके, उपाध्यक्षपदासाठी ॲड.देवानंद पर्वतकर, सचिवपदासाठी ॲड.अनुराधा गोमासे, सहसचिवपदासाठी ॲड.लीना गहरवाल तसेच कोषाध्यक्षपदासाठी ॲड.वैभव इंगळे हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

तर ॲड.संतोष धर्माधिकारी, ॲड.जगदीश विल्हेकर, ॲड.मुकुंद नळकांडे, ॲड.निशिकांत पाखरे आणि ॲड.विद्यासागर वानखडे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढविली जात आहे.

प्रचार शुभारंभ प्रसंगी ॲड.नरेंद्र पवार, ॲड.नंदकिशोर रायकवार,ॲड.सचिन आठवले, ॲड. हर्षवर्धन कोलखेडे, ॲड.स्वप्निल बारब्दे,ॲड.संदीप मानकर, ॲड.रितेश गवई,ॲड.उषा अग्रवाल, ॲड.सौरभ दिघडे यांच्यासह अनेक वकील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी परिवर्तन पॅनलच्या उमेदवारांनी वकील संघाच्या सर्वांगीण विकासासाठी, पारदर्शक कारभारासाठी आणि सर्व सदस्यांच्या हिताला प्राधान्य देणारे नेतृत्व देण्याचा संकल्प व्यक्त करत मतदारांकडे पाठिंबा व सहकार्याचे आवाहन केले.

# १ व १० वरील उर्वरित

## आम्हाला भाजपामुक्त राम

उद्धव ठाकरेंनी केलं.

अयोध्येत हे घडलं असेल तर मथुरा काशीमध्ये काय होईल?- उद्धव ठाकरे

'१२ वर्षे होऊन गेली, आज ज्यासाठी आपण मेहनत केली होती ती व्यक्ती पंतप्रधानपदी बसली. पण त्यानंतर शिवसेनेला संपवण्यासाठी त्यांनी अफजलखानी विडा उचलला. हिंदुत्वाचा गैरफायदा घेणाऱ्यांविरोधात शिवसेनाच निधड्या छातीने प्रश्न विचारू शकते. अयोध्या तो झांकी है, काशी-मथुरा बाकी है, असं त्यांनी म्हटलं आहे. ही अयोध्येची झांकी असेल तर काशी-मथुरा किती लुटतील? भगव्याचं सरकार आलं असं आपल्याला वाटलं होतं. अटलजी म्हणाले होते की अब हिंदू मार नहीं खाएगा, पण हिंदूंना लुटणारं सरकार बसलं आहे. हे दुर्भाग्य आहे. हे आरोप मी करत नाही, हे आरोप अनेकजण करत आहे. शंकराचार्यांनी म्हटलं होतं की केदारनाथमधील सोनं लुटलं आहे. मध्य प्रदेशातील मंत्र्यांनी महाकालची जमीन लुटली आहे. बद्रीनाथमधूनही अपहाराच्या बातम्या येत आहेत', असेही दाखले उद्धव ठाकरेंनी दिले.

## मुंबईत मुसळधार

होऊ नये, यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. पालकांनी आपल्या मुलांना उद्या शाळेत पाठवू नये, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**महानगरपालिका प्रशासनाचे नागरिकांना आवाहन**

हवामान खात्याचा अंदाज पाहता, मुंबई महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. 'नागरिकांनी हवामानाचा अंदाज घेऊनच घराबाहेर पडावे. अत्यंत आवश्यक काम असेल तरच घराबाहेर पडावे, अन्यथा विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे,' असे आवाहन पालिकेने केले आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी पालिकेची यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

## जांभुळवाडी सोसायटीत ७ कार,

फॅब्रिकेशन करणाऱ्या टीमच्या मदतीने जवानांनी लोखंडी अँगल आणि पत्रे कापून बाजूला केले. यात सात चारचाकी आणि सात दुचाकींचे मोठे नुकसान झाले असून ती वाहने सुरक्षित बाहेर काढण्यात आली. या कामगिरीत प्रभारी उपअग्निशमन अधिकारी संतोष भिलारे, फायरमन मयूर काटे, प्रशांत कुंभार, अक्षय देवकर तसेच सिंहगड अग्निशमन केंद्रातील फायरमन सुनील दिवाडकर, राकेश बरे, संभाजी आटोळे आणि आदिनाथ पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## सासरवाडीला आलेल्या जावयाला

माहितीनुसार, ही घटना तरनतारन जिल्ह्यातील संघा गावात घडली आहे. लवप्रीत सिंह असे मृत जावयाचे नाव आहे. लवप्रीतचे काही दिवसांपूर्वी त्याची पत्नी संदीप कौर हिच्याशी भांडण झाले होते. या भांडणानंतर ती रागावून आपल्या माहेरी निघून आली होती. आपले तुटणारे लग्न वाचवण्यासाठी आणि पत्नीची समजूत काढून तिला परत नेण्यासाठी लवप्रीत १३ जून रोजी आपल्या सासरच्या घरी पोहोचला होता.

मात्र, लवप्रीत सासरवाडीला पोहोचताच, त्याचा मेव्हणा साजन सिंह याने रागाच्या भरात लवप्रीतच्या अंगावर पेट्रोल ओतले आणि थेट आग लावून दिली. आगीची तीव्रता एवढी भीषण होती की, लवप्रीत सिंहचा घटनास्थळीच मृत्यू झाला. साजन सिंह लवप्रीतला पेटवून देत असताना, लवप्रीतची मेहुणी गुरजीत कौर तेथे आली. तिने मेव्हण्याला वाचवण्यासाठी जीवाची बाजी लावली. मात्र, या प्रयत्नात ती स्वतः देखील आगीच्या कचाट्यात सापडली आणि गंभीररीत्या भाजली. तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण उपचारादरम्यान तिचाही मृत्यू झाला. यात आरोपी मेव्हणा साजन सिंह हा देखील आगीच्या ज्वाळांमुळे जखमी झाला आहे. त्याची प्रकृती गंभीर असून त्याला पोलीस बंदोबस्तात रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी तरनतारन सदर पोलीस ठाण्यात आरोपी साजन सिंहविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत.

## वादळी वाऱ्यासह मुसळधार

घटनेचा पंचनामा स्वतंत्रपणे करण्यात येणार आहे. मणचे येथील गोविंद तुकाराम गुरव यांच्या घराची भिंत मुसळधार पावसामुळे कोसळली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. तसेच शिरवली येथील मंगेश भिकाजी कदम यांच्या घरावर सागाचे झाड कोसळल्याने छपराचे नुकसान झाले. या घटनेतही कोणतीही जीवितहानी झाली नसून संबंधित पंचनामे लवकरच सादर करण्यात येणार आहेत. दरम्यान, सलग सुरू असलेल्या पावसामुळे तालुक्यातील अनेक सखल भागांतील रस्ते पाण्याखाली गेले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने प्रशासनाने नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

## पोलिस वहसातीला लागून

प्रतिबंधित गुटखा तस्करी करत असल्याचा गुन्हा दाखल करून अटक केली होती. त्यानंतर तो जामिनावर बाहेर आल्यानंतर पुन्हा त्याने गुटखा विक्रीचा व्यवसाय जोरात सुरू केला. याच 'कुमार'च्या गुटखा सेटिंगमध्ये तीन पोलिस शिपाई काही महिन्यांपूर्वीच निलंबित झाले होते. याची चौकशीसुद्धा त्यावेळी झाली. मात्र, गुटखा आपले काम नाही, असे म्हणत नंतर कुमार सोबत जुळवून घेण्यात आले.

ही कारवाई उपअधीक्षक अमोळ कोळी, शहर ठाणेदार निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक गणेश सपकाळ, निलेश मिश्रा, जमादार रावसाहेब शेंडे, किरण पडघन, गजानन धात्रक, प्रदीप कुरडकर, पवन तडसे, पवन नांदेकर, गौरव ठाकरे, मयुर तेल्लेवार, कुणाल पांडे आणि अन्न सुरक्षा अधिकारी यांनी संयुक्त रित्या केली आहे.

विदर्भ - तेलंगणातील नेटवर्क रडावर

'कुमार'च्या माध्यमातून विदर्भ व तेलंगणातील नेटवर्क उघड होण्याची शक्यता वाढली आहे. आता त्या दिशेने तपासाची गरज आहे. अकोला, अमरावती, कारंजा, वाशिम यासह यवतमाळ जिल्ह्यात जवळपास सर्वच तालुक्यांतील गुटखा विक्रीच्या नेटवर्कमध्ये कुमार गुंतला आहे. त्याने हे जाळे थेट तेलंगणापर्यंत विणले आहे. त्यामुळे एका कारवाईत संपूर्ण नेटवर्कच बाहेर काढण्याची संधी चालून आली आहे.

## घराची बेकायदेशीरपणे झडती

रक्कम जबाबदार पोलीस अधिकाऱ्याकडून वसुल करण्याची मुभा राज्य सरकारला देण्यात आली आहे. खुशबू खान, असे पीडित महिलेचे नाव आहे. त्यांचे पती इद्रीस खान यांच्याविरोधात कार अपघाताचा गुन्हा दाखल आहे. त्याच्या तपासादरम्यान पोलिसांनी वारंवार खान यांच्या घरी जाऊन त्रास दिला. रात्री उशिरा घरात प्रवेश केला. महिला पोलिसांशिवाय चौकशी केली आणि कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता मोबाईल फोन ताब्यात घेतला, असे आरोप होते.

न्यायालयाला या आरोपांमध्ये तथ्य आढळून आले. तपास अधिकाऱ्याने घराची झडती घेण्यापूर्वी यासंदर्भातील लेखी कारणे नोंदविणे, शोधाची गरज स्पष्ट करणे, शक्य असल्यास ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे, आवश्यक कागदपत्रे तयार करणे आणि जप्तीची कायदेशीर प्रक्रिया पाळणे बंधनकारक होते. परंतु, या प्रकरणात आवश्यक प्रक्रियेचे पालन करण्यात आले नाही, असे न्यायालय म्हणाले.

## वीजखांब कोसळून शेतकरी

माहितीनुसार, रविवारी दुपारी शेतातील कामे संपवून जांबेकर दाम्पत्य बैलगाडीतून गावाकडे परतत होते. त्यांचा मुलगा बिजेश काही अंतरावरून पायी मागे येत होता. दरम्यान, रस्त्याच्या कडेला असलेला जुना व कमकुवत झालेला वीजखांब अचानक कोसळून थेट बैलगाडीवर पडला. खांबातून विद्युतप्रवाह सुरू असल्याने क्षणात संपूर्ण बैलगाडी करंटच्या विळख्यात सापडली. समोर आई-वडील आणि बैल मृत्यूशी झुंज देत असल्याचे पाहून मुलगा बिजेशने प्रसंगावधान राखले. जीवाची पर्वा न करता त्याने प्रथम वीजपुरवठा बंद करण्याची व्यवस्था केली आणि नंतर जखमींना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी आपत्कालीन सेवांना माहिती देण्यात आली. मात्र, गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या दाम्पत्याला तातडीची वैद्यकीय मदत मिळाली नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. १०८ रुग्णवाहिका वेळेवर न पोहोचल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. अखेर धारणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेषराव नितनवरे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेत जखमींना पोलीस वाहनातून रुग्णालयात हलविले. मात्र उपचार सुरू असतानाच दोघांचीही प्राणज्योत मालवली. दुर्घटनेनंतर ग्रामस्थांनी महावितरणवर निष्काळजीपणाचा आरोप केला आहे. संबंधित वीजखांब अनेक महिन्यांपासून धोकादायक अवस्थेत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. याबाबत वारंवार तक्रारी करूनही कोणतीही दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या घटनेने भोकरबर्डी गावावर शोककळा पसरली असून मृतांच्या कुटुंबीयांना तातडीची आर्थिक मदत, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई आणि परिसरातील जीर्ण वीजयंत्रणेची तात्काळ तपासणी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. एका जीर्ण वीजखांबाने चार जीव घेतल्याची भावना व्यक्त करत ग्रामस्थांनी प्रशासनाकडून उत्तरदायित्व निश्चित करण्याची मागणी केली आहे.

## डिप्रेशनच्या प्रभावामुळे विदर्भात

सक्रिय आहे. या हवामान प्रणालींच्या प्रभावामुळे ६ आणि ७ जुलै दरम्यान संपूर्ण विदर्भात सार्वत्रिक स्वरूपाचा हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी मुसळधार ते जोरदार पावसाच्या सरी कोसळू शकतात. दरम्यान, ८ ते १० जुलै या कालावधीत विदर्भातील बहुतांश भागात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस कायम राहण्याचा अंदाज आहे. मात्र ७ जुलैनंतर पावसाची तीव्रता कमी होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. संभाव्य जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, नागरिक आणि स्थानिक प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कार्यकर्त्याशिवाय नेता घडत नाही

व्यास ,दीपक भोरे,दीपक धुळधर, संजय तट्टे ,गौरव बंसल,मंगेश हुड,मनोज नंदवंशी,नितीन आगे, प्रीतेश अवघड, विवेक महल्ले, विलास सोळंके, बंटी ककरांनीया ,नितीन आखुड ,प्रशांत आवारे,भास्कर मासोदकर, जे. डी वानखडे,अश्फाक खान, अजय इंगळे, अनंत हरणे,हर्ष गुप्ता , ऋषी चौधरी,भूषण गडेकर ,वैभव बोबडे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.विदर्भ मिल परिसरात आमदार बच्चु कडू यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की ,कार्यकर्त्यांशिवाय नेता घडू शकत नाही.खुर्ची हा विषय फार महत्त्वाचा नाही.शिवसेना ही गरिबांची व सर्वसामान्य नागरिकांची आहे. आमचा लढा शेतकरी , शेतमजूर , बेरोजगार तरुण वर्गासाठी आहे . सत्ता महत्वाची नाही सत्य महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन विधान परिषद आमदार बच्चु कडू यांनी वाढदिवसाच्या प्रसंगी केले . राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विदर्भाची जबाबदारी माझ्यावर दिली असून विदर्भात शिवसेनेचे मूठ मजबूत करणार असल्याचे प्रतिपादन सुद्धा आमदार बच्चू कडू यांनी याप्रसंगी केले .विधानपरिषद आमदार म्हणून सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात खाजगी शाळेची फी , फिन्ले मिल व प्रलंबित विविध प्रकल्प संदर्भात आवाज उचलला आणि यापुढेही सामान्य माणसाचा आवाज म्हणून विधान परिषदेत आमचा लढा सुरूच राहणार असल्याची प्रतिपादनही त्यांनी यावेळी केले . वाढदिवसाच्या औचित्यावर अचलपुर - परतवाडा जुळ्या शहरात विविध ठिकाणी सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार बच्चु कडू यांनी या कार्यक्रमासाठी भेट दिली . जागोजागी त्यांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले . या कार्यक्रमाला प्रहार जनशक्ती पक्ष ,शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी , कार्यकर्ते नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाढत्या शहरीकरणांसाठी 'मित्रा'

ड' वर्ग महानगर पालिकांना २५ टक्के भार उचलावा लागणार असल्याचे नियम आहे. मात्र त्यांची आर्थिक अवस्था बिकट असतांना त्या इतका २५ टक्के भार उचलू शकत नसल्याने ज्या काही चांगल्या 'अ' वर्ग महापालिका आहेत किंवा शासनाच्या पीएमआरडीए, एमएमआयडीए, सिडको सारख्या योजनेचा हा निधी मिळतो. त्यामुळे ड' वर्ग महानगर पालिकांना नगरोत्थान मधील २५ टक्के वाटा कमी करून ५ टक्केवर आणणे आवश्यक आहे. तेव्हाच 'ड'वर्गमहापालिका , छोट्या नगर पालिका अशा ठिकाणी नगरोत्थानच्या योजना राबविणे शक्य होणार असल्याचे सुद्धा आ. संजय खोडके यांनी स्पष्ट करून छोट्या स्थानिक स्वराज संस्थांच्या आर्थिक अडचणींबाबत सभागृहाचे लक्ष वेधले. अमरावती महानगर पालिका क्षेत्रात संदर्भात उदाहरण देतांना आ. संजय खोडके यांनी अधोरेखित केले कि, आज ६० टक्के शहरीकरण वाढले आहे. ग्रामीण भागातून लोक शहराकडे येत असतांना त्यांना सर्व पायाभूत सुविधा पुरविणे आवश्यक असतांना निधी अभावी त्यांना सुविधा पुरविणे कठीण आहे. अमरावती महानगर पालिकेला वित्त आयोगातून उपलब्ध होणारे अनुदान हे स्वच्छता कामे व इतर कामांवर खर्च होतात. अमरावतीमध्ये औद्योगिकरण नसल्याने टॅक्स मधूनही उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे महापालिकेला फक्त जिल्हा नियोजन मधून मिळणारा निधी आणि नगरोत्थान योजनेचे अनुदानावर अवलंबून राहावं लागत आहे. आणि बजेट असो कि जिल्हा नियोजन योजना असो सर्वाधिक निधी हा जिल्हा परिषद अंतर्गत कामे व ग्रामीण भागाकडे जात असल्याने पश्चिम विदर्भाचे मुख्यालय असलेल्या अमरावती शहरीभागात विकासाचा मोठा अनुशेष निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत 'ड' वर्ग महानगर पालिका व छोट्या -नगरपालिका -नगर पंचायतीना शासनाच्या बजेटमधून तसेच जिल्हा नियोजनातून अधिकाधिक निधी मिळण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाने सद्याचे धोरण बदलवून एक नवीन आराखडा व स्वतंत्र नवीन धोरण आखण्याची गरज आहे. आर्थिक विकासाला गती देण्यासाठी आणि शाश्वत आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी शासनाने नियोजन विभागामार्फत ' मित्रा' सारखी संस्था निर्माण केली आहे. त्या मित्रा संस्थेकडे हा विषय देऊन राज्यातील वाढत्या नवीन शहरीकरणाच्या संदर्भात पायाभूत सुविधांची मुबलक पूर्तता करण्यासाठी राज्य शासनाच्या बजेटमधून अथवा जिल्हा नियोजनातून नव्या शहरीकरणाच्या विकासासाठी अधिकाधिक निधी कसा उपलब्ध करता येईल. त्यासंदर्भात ' मित्रा ' मार्फत नगर विकास विभागाचे एक सुयोग्य नवीन धोरण ठरविण्याची आवश्यकता असल्याचे मत आ. संजय खोडके यांनी व्यक्त केले.

दरम्यान अधिवेशनामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबधित विषयावर आ.संजय खोडके यांनी अमरावती रेल्वे उड्डाणपूल पुनर्निर्मिती प्रकल्पास गती देण्याची मागणी केली. अमरावतीची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुलभ करण्याच्या दृष्टीने हा पूल तातडीने पूर्णत्वास आणणे आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग मागील सहा महिन्यापासून याबाबत तयारी करत आहे. मध्यंतरी महोदयांनी महारेल मंडळ स्थापन करून राज्यातील रेल्वे ओव्हरब्रिज संदर्भात सर्व कामे महारेल मंडळाच्या माध्यमातून पूर्णत्वास आणण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महारेल मंडळाकडून सर्व प्रक्रिया नव्याने पूर्ण करतांना आणखी बराच विलंब लागणार आहे. म्हणून अमरावती रेल्वे उड्डाणपुल पुर्नबांधकाम संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केलेला आराखडा कायम ठेवून हा सर्व आराखडा जसाच्या तसा महारेल मंडळाकडे पाठविल्यास लगेच टेंडर प्रक्रिया होऊन हा पूल १ वर्षात पूर्ण होईल. या संदर्भातही निर्णय घेण्यासाठी महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन व सार्वजनिक बांधकाम विभाग याचे अधिकारीसोबत याच अधिवेशनादरम्यान बैठक घेऊन अमरावतीच्या रेल्वे उड्डाणपुलाचे कामास गती देण्याची मागणी केली.

शासनाकडे पायाभूत सुविधांचे प्रस्ताव प्रलंबित असून त्यात अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौकापर्यंत उड्डाणपुलं साकारण्याचे काम प्रस्तावित आहे. त्यामुळे आगामी डिसेंबरच्या विधिमंडळ अधिवेशनापर्यंत पायाभूत सुविधांच्या कामाचे प्रस्ताव निकाली काढून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी सुद्धा आमदार संजय खोडके यांनी सभागृहातून केली आहे. तीन वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनाने नागपूर अधिवेशनात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर शहरी भागाकरिता मुख्यमंत्री शहरी सडक योजना जाहीर केली. मात्र आजपर्यंत या योजनेवर निधीची कुठलीही तरतूद करण्यात आली नसल्याने ही योजना पुढे जाऊ शकली नाही. शहरी भागात रस्ते निर्मितीची कामे ही पायाभूत सुविधांच्या योजनांमधून करावी लागत आहे. शहरीभागात सुसज्ज रस्त्याचे जाळे निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री शहरी सडक योजना ही एक महत्वाकांक्षी योजना असल्याने त्यावर बजेट मध्ये निधीची तरतूद करून योजनेला गती देण्याची मागणी सुद्धा सभागृहा समक्ष करण्यात आली. त्याचबरोबर अमरावती शहरातील म्हाडाच्या योज़ना अंतर्गत बांधण्यात आलेल्या वसाहती या ५० वर्ष जुन्या असून जीर्ण झाल्या आहेत. त्याची पुर्नबांधणी करणे आवश्यक आहे. तसेच शहरातील जवळपास ४० हुन अधिक घोषित झोपडपट्ट्यांच्या पुर्नविकासाकरीता 'एसआरए' योजना सुद्धा राबविणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आल्याने त्यास मंजुरी देऊन अधिवेशन काळात मुख्यमंत्री महोदयांनी याला मूर्तरूप देण्याची मागणी सुद्धा अधिवेशनातून करण्यात आली. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या योजनांचा लाभ प्रत्यक्ष कामगारांपर्यंत पोहोचण्यासाठी कामगार संघटनांशी चर्चा करून योजनांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याची गरज सुद्धा आ. संजय खोडके यांनी व्यक्त केली.

## उड्डाणपुलावर भरधाव कार पलटी

केल्या. विशेष म्हणजे, कार डिव्हायडरला धडकून उड्डाणपुलावरच अडकल्याने मोठी दुर्घटना टळली. अन्यथा वाहनाचा वेग आणि अपघाताची तीव्रता लक्षात घेता कार उड्डाणपुलावरून खाली कोसळण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. अशा परिस्थितीत खालील रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांनाही धोका निर्माण होऊन मोठी जीवितहानी होऊ शकली असती. या अपघाताचा पुढील तपास सिटी कोतवाली पोलीस करीत आहेत.

## सहाव्या मजल्यावरून कोसळून

येथील विद्याभारती कॉलेजच्या सुरू असलेल्या इमारत बांधकामावर सेंट्रिंगचे काम करत होता. काम सुरू असतानाच त्याचा तोल गेला आणि तो सहाव्या मजल्यावरून थेट ग्राउंड फ्लोअरवर कोसळला. उंचीवरून पडल्याने त्याच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली. घटनेनंतर सहकाऱ्यांनी तातडीने त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. त्यानंतर शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या दुर्घटनेनंतर बांधकामस्थळी कामगारांसाठी आवश्यक असलेली सुरक्षा साधने, सेफ्टी बेल्ट, संरक्षक जाळ्या आणि इतर सुरक्षाव्यवस्था पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत्या का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. दरवर्षी अशा प्रकारच्या दुर्घटनांमध्ये अनेक कामगारांना जीव गमवावा लागत असतानाही सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप कामगार संघटनांकडून केला जात आहे. या प्रकरणात नातेवाईकांकडून कोणताही आक्षेप नोंदविण्यात आलेला नसला तरी, एका तरुण कामगाराचा जीव गेला, मात्र बांधकामस्थळावरील सुरक्षेच्या जबाबदारीबाबत उत्तरदायित्व कोणाचे? हा प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित यंत्रणांनी या दुर्घटनेची चौकशी करून कामगार सुरक्षा नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी करणे गरजेचे आहे.

## खोलापूर खून प्रकरणातील फरार

माहिती मिळाली की, आरोपी यवतमाळ शहरातील इंदिरानगर परिसरात एका परिचित व्यक्तीकडे लपून राहत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला खोलापूर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर व त्यांच्या पथकाने केली.

## चांदूर रेल्वेतील आठवडी बाजारात

येणाऱ्या ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक या बाजारात खरेदीसाठी येत असल्याने अशा अवस्थेमुळे नगरपरिषद प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर बनत असून, सध्या तरी या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात मुरूम किंवा चुरी टाकून रस्ता चालण्यायोग्य करावा, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे. विशेष म्हणजे, या आठवडी बाजारात दर रविवारी व्यापाऱ्यांकडून बाजार शुल्क (कर) नियमितपणे वसूल करण्यात येते. मात्र त्यानुसार आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नसल्याची नाराजी व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

आठवडी बाजारातील चिखलमय रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिक व व्यापाऱ्यांकडून होत आहे. आता या गंभीर समस्येकडे नगरपरिषद प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कितपत गांभीर्याने दखल घेतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## विद्याभारती कॉलेज परिसरातील

व्यक्तीचा धारदार शस्त्राने वार करून खून झाल्याची माहिती मिळाली. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मृताची ओळख जायेद हुसेन खान (वय २८, रा. पाकीजा कॉलनी, अमरावती) अशी पटली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर आणि पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला. प्राथमिक चौकशीत मृतक आणि आरोपींमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाल्याची माहिती समोर आली. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध घेत एक तासाहून अधिक काळ शहरातील विविध मार्गांवर पाठलाग केला. या कारवाईत शेख इम्रान शेख महमुद ऊर्फ गोलू कुरेशी (वय ३०), शेख समीर शेख जुम्मन (वय ३२) आणि शेख अमीन शेख जब्बार (वय ३४) या तिघांना ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत वादातून धारदार चाकूने वार करून खून केल्याची कबुली आरोपींनी दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, मुख्य आरोपी शेख इम्रान ऊर्फ गोलू कुरेशी याच्याविरुद्ध यापूर्वी यवतमाळ येथे खुनाचा गुन्हा दाखल असून त्याने कारावासाची शिक्षा भोगल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. याबाबत अधिक तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, ६ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अकोटच्या बायोमायनिंगमध्ये 'कोट्यवधींचा खेळ' चा संशय?

## २.०७ कोटींच्या प्रकल्पावर प्रश्नांचा भडिमार; कचरा नव्हता तर टेंडर कसे? आरडीएफ कुठे, ई–वे बिल कुठे, प्रदूषण मंडळाचा अहवाल कुठे?

### नगर परिषद, कंत्राटदार आणि संबंधित यंत्रणांनी मौन सोडण्याची नागरिकांची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

**अकोट नगर परिषदेच्या डम्पिंग ग्राऊंडवर सुरू असलेल्या सुमारे २ कोटी ७ लाख रुपयांच्या बायोमायनिंग प्रकल्पाभोवती आता गंभीर प्रश्नांचे वादळ निर्माण झाले आहे. सार्वजनिक निधीतून राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पात वैज्ञानिक निकषांचे पालन, पर्यावरणीय नियम, कचऱ्याचे प्रत्यक्ष प्रमाण, आरडीएफ (Refuse Derived Fuel) निर्मिती व विल्हेवाट, बायो-कल्चरचा वापर, देयक प्रक्रिया आणि तांत्रिक कागदपत्रे याबाबत अनेक मुद्द्यांवर नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.**

विशेष म्हणजे, डम्पिंग ग्राऊंडवर जुना कचरा उपलब्ध नसताना बायोमायनिंगचे टेंडर काढण्यात आले का? हा प्रश्न आता या संपूर्ण प्रकरणाचा केंद्रबिंदू ठरू लागला आहे. त्यामुळे केवळ कामाची गुणवत्ता नव्हे, तर प्रकल्पाच्या मूळ आधारावरच संशयाचे सावट निर्माण झाले आहे. बायोमायनिंग म्हणजे केवळ जेसीबीने कचरा उकरणे नव्हे घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार बायोमायनिंग ही पूर्णपणे वैज्ञानिक प्रक्रिया मानली जाते. त्यामध्ये कचऱ्याचे वर्गीकरण, बायो-कल्चरची फवारणी, स्क्रीनिंग, पुनर्वापरयोग्य साहित्य वेगळे करणे, आरडीएफ तयार करणे, त्याची अधिकृत विल्हेवाट लावणे आणि उर्वरित कचऱ्याची पर्यावरणीय निकषांनुसार हाताळणी करणे आवश्यक असते. या प्रत्येक टप्प्याची अधिकृत नोंद, प्रयोगशाळा चाचण्या, मोजमाप पुस्तिका (Measurement Book), छायाचित्रे, ड्रोन सर्व्हे आणि तृतीय पक्ष तपासणी अपेक्षित असते. मात्र अकोटमधील प्रकल्पात या प्रक्रियेसंबंधीची अधिकृत कागदपत्रे सार्वजनिकरीत्या उपलब्ध नसल्याचा आरोप होत असून, त्यामुळे शंका अधिक गडद होत आहेत.



संग्रहित छायाचित्र

#### डम्पिंग ग्राऊंडवर जुना कचरा नव्हताच?

स्थानिक नागरिकांनी उपस्थित केलेला सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे, डम्पिंग ग्राऊंडवरील जुना कचरा यापूर्वीच संपुष्टात आल्याचा दावा. जर तेथे २ ते ४ वर्षे जुना 'लेगसी वेस्ट' शिल्लकच नव्हता, तर नव्याने बायोमायनिंग प्रकल्पाची गरज नेमकी कशासाठी निर्माण झाली? असा सवाल उपस्थित केला जात आहे. घनकचरा व्यवस्थापनातील तज्ज्ञांच्या मते, ताज्या किंवा चालू वर्षातील कचऱ्यावर पारंपरिक बायोमायनिंग प्रक्रिया राबविणे तांत्रिकदृष्ट्या योग्य मानले जात नाही. अशा परिस्थितीत प्रत्यक्षात कोणत्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली, याचे अधिकृत स्पष्टीकरण अपेक्षित आहे.

#### मेट्रिक टन मोजणीचा आधार काय?

ज्या कचऱ्यावर २.०७ कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर झाला, त्या कचऱ्याचे एकूण मेट्रिक टन किती होते? हा आकडा कोणत्या अधिकृत सर्वेक्षणावर आधारित होता? मोजणी कोणी केली? त्याचा पंचनामा, सर्व्हे अहवाल, नकाशे आणि तांत्रिक प्रमाणपत्रे कुठे आहेत? या प्रश्नांची उत्तरे अद्याप समोर आलेली नाहीत. जर मोजणीच पारदर्शक नसेल, तर कामाचे मोजमाप आणि देयके कोणत्या आधारावर मंजूर झाली, अशीही विचारणा नागरिक करत आहेत.

#### आरडीएफ तयार झाला तरी गेला कुठे?

बायोमायनिंग प्रक्रियेतून तयार होणारा आरडीएफ अधिकृत उद्योग किंवा सिमेंट कारखान्यांकडे सुपूर्द करणे अपेक्षित असते. मात्र अकोट प्रकल्पात तयार झालेला आरडीएफ नेमका कुठे गेला? कोणत्या कंपनीने तो स्वीकारला? कराराची प्रत कुठे आहे? स्वीकार प्रमाणपत्र (RDF Acceptance Certificate) नगर परिषदेकडे आहे का? असल्यास ते सार्वजनिक का केले जात नाही? अशा प्रश्नांचा भडिमार होत आहे. आरडीएफची वाहतूक झाल्याचा दावा असल्यास त्यासंदर्भातील ई-वे बिल, वाहतूक चलने, जीएसटी कागदपत्रे आणि प्राप्तीची नोंदही उपलब्ध असणे अपेक्षित असल्याचे जाणकारांचे मत आहे.

#### बायो-कल्चरचा पुरावा कुठे?

बायोमायनिंग प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा घटक असलेल्या बायो-कल्चरच्या वापराबाबतही अनेक शंका उपस्थित करण्यात आल्या आहेत. नेमके किती लिटर किंवा किलो बायो-कल्चर वापरण्यात आले? ते कोणत्या उत्पादकाकडून खरेदी करण्यात आले? त्याची जीएसटी बिले, खरेदी चलने, ई-वे बिल, वाहतूक नोंदी आणि माल प्रत्यक्ष घटनास्थळी पोहोचल्याचे पुरावे उपलब्ध आहेत का? या प्रश्नांची उत्तरे अद्याप समोर आलेली नाहीत.

#### प्रदूषण नियंत्रण मंडळाची भूमिका काय?

बायोमायनिंग प्रकल्प सुरू करण्यापूर्वी आवश्यक पर्यावरणीय परवानग्या घेण्यात आल्या होत्या का? महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने किती वेळा पाहणी केली? त्यांचे निरीक्षण अहवाल, अनुपालन अहवाल (Compliance Report) आणि पर्यावरणीय अटींचे पालन झाल्याचे दस्तऐवज उपलब्ध आहेत का? अशीही विचारणा होत आहे.

डम्पिंग ग्राऊंडवर यापूर्वी लागलेल्या आगींच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर मिथेन वायू, दुर्गंधी, लीचेट, भूजल प्रदूषण आणि अग्निसुरक्षेबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली, याचाही खुलासा व्हावा, अशी मागणी पुढे येत आहे.

#### आगींच्या घटनांमागे नेमके काय?

डम्पिंग ग्राऊंडवर वेळोवेळी लागलेल्या आगींमुळेही संशय अधिक गडद झाला आहे. काही नागरिकांनी असा आरोप केला आहे की, उपलब्ध कचऱ्याला आग लागल्यानंतर त्याच्या स्वरूपात बदल झाला का? त्या पार्श्वभूमीवर प्रकल्पातील कचऱ्याचे स्वरूप, प्रमाण आणि नोंदी यांची स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे. या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसून, संबंधित यंत्रणांकडून याबाबत स्पष्टीकरण अपेक्षित आहे.

#### खताच्या नमुन्यांवरही संशय

बायोमायनिंग प्रक्रियेनंतर तयार झालेल्या खताचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आल्याचे सांगितले जाते. मात्र हे नमुने कोणाच्या उपस्थितीत घेण्यात आले? त्यांचे कोडिंग कोणी केले? कोणत्या प्रयोगशाळेत तपासणी झाली? अहवाल काय आहे? याची माहिती सार्वजनिक करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

#### देयके कोणत्या आधारावर?

कामाचे मोजमाप (एम.बी.), तृतीय पक्ष तपासणी, प्रयोगशाळा अहवाल, जीपीएस ट्रॅकिंग, ड्रोन सर्व्हे, छायाचित्रे आणि इतर तांत्रिक पुरावे उपलब्ध नसतील, तर देयके कोणत्या आधारावर मंजूर झाली? या मुद्द्यावरही नागरिकांनी प्रशासनाकडे स्पष्टीकरण मागितले आहे.

#### 'दस्तऐवज जाहीर करा, शंका दूर करा'

या प्रकरणात संबंधितांवर करण्यात येणाऱ्या आरोपांची अधिकृतरीत्या पुष्टी झालेली नाही. मात्र सार्वजनिक निधीतून राबविण्यात आलेल्या प्रकल्पात सर्व प्रक्रिया नियमांनुसार पार पडल्या असतील, तर संबंधित कागदपत्रे जाहीर करण्यात कोणतीही अडचण नसावी, असे मत नागरिक व्यक्त करीत आहेत. तर 'कोट्यवधी रुपयांचा खर्च झाला. मग प्रत्येक टन कचऱ्याचा आणि प्रत्येक रुपयाचा हिशेब जनतेसमोर नेमका कधी मांडला जाणार?' असा सवाल अकोटकर व्यक्त करीत आहे.

#### नागरिकांच्या प्रमुख मागण्या

- डम्पिंग ग्राऊंडवरील अधिकृत मेट्रिक टन मोजणी अहवाल जाहीर करावा.
- निविदा, कार्यादेश आणि कंत्राटाची प्रत सार्वजनिक करावी.
- आरडीएफ स्वीकारणाऱ्या कंपनीचे नाव, करार आणि स्वीकार प्रमाणपत्र जाहीर करावे.
- बायो-कल्चरची खरेदी बिले, जीएसटी चलने, ई-वे बिल आणि वाहतूक कागदपत्रे प्रसिद्ध करावीत.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवानग्या, निरीक्षण अहवाल आणि अनुपालन अहवाल जाहीर करावेत.
- कामाचे मोजमाप, देयक मंजुरी, तृतीय पक्ष तपासणी, ड्रोन सर्व्हे आणि प्रयोगशाळा अहवाल नागरिकांसमोर ठेवावेत.

---

## काटेपुर्णा–सोहळ अभयारण्यातील वनकर्मचाऱ्यांचा मेळघाटमध्ये कुरण विकास अभ्यास दौरा

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

वाशिम - अकोला जिल्ह्यात पसरलेले काटेपुर्णा व कारंजा सोहळ अभयारण्यातील कुरणांचा शास्त्रीय पद्धतीने विकास व भविष्यात त्यांचे प्रभावी व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने स्थानिक कार्यरत वनमजूर आणि वनरक्षक यांच्यासाठी मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील नरनाळा व धारगड परिसरात २ व ३ जुलै २०२६ रोजी दोन दिवसीय कुरण विकास अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला.



या अभ्यास दौऱ्यादरम्यान नरनाळा वनपरिक्षेत्र अधिकारी दिनेश नंदेश्वर यांनी कुरणांचा योग्य पद्धतीने विकास केल्यास तृणभक्षी वन्यप्राण्यांची संख्या वाढते. परिणामी मांसभक्षी प्राण्यांसाठी आवश्यक अन्नसाखळी मजबूत होऊन त्यांची संख्याही वाढण्यास मदत होते. यामुळे जैवविविधतेचे संवर्धन होण्याबरोबरच वनपर्यटनालाही चालना मिळते, अशी माहिती दिली. यावेळी नरनाळा येथील स्थानिक मार्गदर्शकही उपस्थित होते. त्यानंतर नरनाळा किल्ला परिसरातील विकसित करण्यात आलेल्या कुरणांची पाहणी करण्यात आली. यावेळी प्रमोद खांडवये यांनी कुरण विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपाययोजना, नियोजन आणि त्यातून झालेल्या सकारात्मक परिणामांची सविस्तर माहिती दिली. तसेच धारगड वनपरिक्षेत्रात वनरक्षक नितीन सावंत यांनी खाद्य गवत व इतर उपयुक्त वनस्पतींची लागवड, खाद्य गवताचे बियाणे संकलन, गवताच्या थोंबांची लागवड, गवताचे प्लॉट तयार करण्याची पद्धत तसेच अखाद्य वनस्पतींचे उच्चाटन कसे करावे याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. यावेळी वनक्षेत्रातील कुरण व्यवस्थापनासाठी आवश्यक तांत्रिक बाबींची माहितीही त्यांनी सहभागी कर्मचाऱ्यांना दिली.

---

## नालंदा नगरात नवीन डी.पी. व पाच वीज खांब द्या; नगरसेवक अनिल ताजने यांची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील नालंदा नगर परिसरात वाढती लोकसंख्या आणि नव्याने वाढलेल्या वीज ग्राहकांच्या संख्येमुळे विद्यमान वीज वितरण यंत्रणेवर मोठा ताण निर्माण झाला असून, परिसरात नवीन वितरण ट्रान्सफॉर्मर (डी.पी.) मंजूर करून पाच नवीन वीज खांब उभारण्यात यावेत, अशी मागणी नगर परिषद वाशिमच्या स्थायी समितीचे सदस्य अनिल ताजने यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण)च्या सहाय्यक अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नालंदा नगर परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर नवीन घरे व वसाहती विकसित झाल्या आहेत. त्यामुळे विद्यमान डी.पी.वर अतिरिक्त भार पडत असून, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, कमी दाबाने वीज मिळणे तसेच ट्रान्सफॉर्मरमध्ये वारंवार तांत्रिक बिघाड होण्याच्या समस्या नागरिकांना सहन कराव्या लागत आहेत. परिणामी घरगुती ग्राहकांसह व्यावसायिक प्रतिष्ठानांनाही मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

याशिवाय परिसरातील नव्याने विकसित झालेल्या भागात वीजपुरवठा पोहोचविण्यासाठी सध्या उपलब्ध वीज खांबांचे अंतर अधिक असल्याने नवीन वीजवाहिन्या टाकण्यास अडचणी येत आहेत.

---

## विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेला गती

### जिल्हाभर घरोघरी पडताळणीचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

'मतदार यादी जितकी अचूक आणि अद्ययावत, तितकी लोकशाही अधिक सक्षम होते. त्यामुळे विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत प्रत्येक पात्र मतदाराने सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे,' असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, जिल्हाभर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी भेट देऊन मतदारांची माहिती पडताळत आहेत. गणना प्रपत्र भरून घेण्याचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून, पात्र मतदारांची माहिती अचूकपणे नोंदविण्यावर भर देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, पर्यवेक्षक आणि बीएलओ यांच्या समन्वयातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकारी विविध भागांना भेटी देऊन मोहिमेचा आढावा घेत असून आवश्यक सूचना देत आहेत.

मोहिमेदरम्यान बीएलओ नागरिकांच्या घरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेत आहेत. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देऊन अचूक माहिती द्यावी.

---

## श्रीक्षेत्र वाघागड व चाकातीर्थ पालख्यांचे वाशिममध्ये आगमन

### वारकऱ्यांसाठी महाप्रसाद, सत्कार आणि आरोग्य सेवा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आषाढी वारीनिमित्त श्रीक्षेत्र वाघागड व चाकातीर्थ येथून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या पालख्यांचे शनिवार, ४ जुलै रोजी वाशिम शहरात भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. पालख्यांच्या आगमनानिमित्त श्री संत गजानन महाराज मंदिर, जुनी आय.यु.डी.पी. कॉलनी, वाशिम येथे वारकरी व भाविकांसाठी महाप्रसाद, वारकऱ्यांचा सत्कार तसेच मोफत आरोग्य सेवा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामुळे भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. या सेवाभावी उपक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते मयुर गणेशराव राऊत यांच्या पुढाकारातून करण्यात आले.



तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, वाशिम यांच्या सौजन्याने वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये डॉ. भानुप्रिया बजाज आणि त्यांच्या सहकारी वैद्यकीय पथकाने शेकडो वारकऱ्यांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधोपचार, वैद्यकीय सल्ला आणि औषधांचे वाटप केले. या आरोग्य सेवा उपक्रमासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे यांचे मार्गदर्शन लाभले, तर आरोग्य विभागातील नितीन व्यवहारे यांनीही मोलाचे सहकार्य केले. पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांना दीर्घ प्रवासादरम्यान उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांचा विचार करून ही सेवा उपलब्ध करून देण्यात आली.

---

## 'मोगरा फुलला' या भक्ती भावगीतेच्या कार्यक्रमाचा सर्वांनी आस्वाद घ्यावा

### शिवशंकर भोयर यांचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'मोगरा फुलला – एक भक्तिमय संध्याकाळ' या विशेष आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन भाजपा आध्यात्मिक आघाडीचे वाशिम जिल्हाध्यक्ष शिवशंकर भोयर यांनी केले आहे.



हा भक्तिमय कार्यक्रम सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र (आत्मा), काटा चौफुली, वाशिम येथे आयोजित करण्यात आला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या विचारांचा आणि भक्ती परंपरेचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम विशेष स्वरूपात सादर केला जाणार असून, अध्यात्म, संस्कृती आणि समाजप्रबोधनाचा अनोखा संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळणार आहे.

---

## सांगून न येणाऱ्या आपत्तीला धैर्याने सामोरे जाण्याची मानसिकता सर्वांनी ठेवणे गरजेचे

### मानोरा पोलीस स्टेशनमध्ये 'आपत्ती प्रशिक्षण मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | मानोरा ■

पावसाळा ऋतू दरम्यान पूर, वादळ, वीज कोसळणे, दरड कोसळणे अशा नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर शहर व तालुक्यातील प्रत्येक जबाबदार नागरिकांनी अधिक सजग राहून आपत्ती निवारणामध्ये जिल्हा प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांनी केले.

**पोलीस स्टेशनमध्ये कार्यशाळा संपन्न**

मानोरा पोलीस स्टेशनच्या आवारात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यालयाच्या वतीने 'आपत्ती मित्र' प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहर व तालुक्यातील सरपंच, पोलीस पाटील, तलाठी, ग्रामसेवक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**शाहू भगत यांनी दिले व्यवस्थापनाचे धडे** : पावसाळ्यापूर्वी नाले-गटारे साफ करावीत. धोकादायक इमारती, झाडे यांची माहिती प्रशासनाला द्यावी. वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू असताना झाडाखाली, विजेच्या खांबाजवळ थांबू नये. नदी-नाल्यांना पूर आल्यास पुलावरून पाणी वाहत असेल तर ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. कोणतीही आपत्ती आल्यास ग्रामस्तरावर प्रथम पोलीस पाटील, तलाठी यांना कळवावे. तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाचा टोल फ्री क्रमांक १०७७/१००ङ वर तात्काळ संपर्क साधावा. गावपातळीवर तरुणांचे 'आपत्ती मित्र' पथक तयार करावे. त्यांना प्राथमिक मदत, बचाव कार्याचे प्रशिक्षण दिले जाईल.

**महिला पोलीस अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन :** कार्यक्रमात उपस्थित महिला पोलीस अधिकारी नयना पोहेकर यांनी आपत्ती काळात महिला व लहान मुलांच्या सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. 'अफवांवर विश्वास ठेवू नका. प्रशासनाकडून येणाऱ्या सूचनांचे पालन करा. आपल्या गावातील वृद्ध, दिव्यांग व गरोदर महिलांना सुरक्षित स्थळी हलवण्यास प्राधान्य द्या,' असे आवाहन त्यांनी केले. पोलीस स्टेशनच्या आवारात खुर्च्यांवर बसून शहर व तालुक्यातील नागरिक, महिला व पुरुष अधिकारी मार्गदर्शन ऐकताना दिसत आहेत.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २१९ ■ सोमवार, ६ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

देवळीहून परतताना मालवाहू वाहनाची दुचाकीला धडक

# फत्तेपूरजवळ भीषण अपघातात मामा-भाच्याचा मृत्यू

## एकाचा जागीच, तर दुसऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू

**पुलगाव जनमाध्यम :** पुलगावजवळील फत्तेपूर परिसरात शनिवारी सायंकाळी सुमारे ६ वाजताच्या दरम्यान झालेल्या भीषण रस्ता अपघातात दुचाकीवरील मामा-भाच्याचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. या अपघातामुळे पुलगाव, नाचणगावसह परिसरात शोककळा पसरली असून एकाच कुटुंबातील दोन सदस्यांचा मृत्यू झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुलगाव येथील भाऊराव पारिसे (वय ५७) हे त्यांचा भाचा केशव प्रभुजी मांढरे (वय ३६) याच्यासह देवळी येथे काम आटोपून एमएच ३२ बीबी १२२० क्रमांकाच्या दुचाकीने पुलगावकडे परत येत होते. दरम्यान, फत्तेपूर परिसरात समोरून येणाऱ्या मालवाहू वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडक इतकी भीषण होती की दुचाकीचा अक्षरशः चुराडा झाला. या अपघातात भाऊराव पारिसे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या केशव मांढरे यांना





तातडीने वर्धा जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचीही प्राणज्योत मालवली.

अपघाताची माहिती मिळताच पुलगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या कडेला करून वाहतूक सुरळीत केली.

या प्रकरणी पुलगाव पोलिस ठाण्यात मालवाहू वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे दोन्ही कुटुंबांवर शोककळा पसरली असून परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे

# महापुरात वाहून गेला रस्ता बोरखेडीचा संपर्क अजूनही तुटलेलाच

विद्यार्थ्यांचे शिक्षण ठप्प, रुग्णांचे हाला

## प्रशासनाच्या दिरंगाई विरोधात ग्रामस्थांचा संताप

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील बोरखेडी गावाकडे जाणारा पर्यायी रस्ता जांब नदीच्या महापुरात वाहून जाऊन अनेक दिवस उलटले, तरी त्याची दुरुस्ती अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यामुळे गावाचा बाह्य संपर्क कायम तुटलेला असून विद्यार्थी, रुग्ण, शेतकरी आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



महापुरानंतर पर्यायी रस्ता तातडीने सुरू करण्यात येईल, अशी घोषणा करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अनेक वेळा काम बंद असल्याचेही दिसून येत असल्याने गावकरी संतप्त झाले आहेत.


ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित कंत्राटदार कामाबाबत मनमानी करत असून वारंवार पाठपुरावा करूनही कामाला गती दिली जात नाही. यासोबतच संबंधित विभागाचे अधिकारीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

रस्ता बंद असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच रुग्णांना उपचारासाठी, शेतकऱ्यांना शेतीकामासाठी आणि नागरिकांना दैनंदिन कामांसाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ही परिस्थिती तातडीने बदलण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

पर्यायी रस्ता त्वरित वाहतुकीसाठी खुला करावा, अन्यथा सार्वजनिक बांधकाम विभाग, संबंधित कंत्राटदार आणि प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# विश्रामगृहामागील गुलमोहर वृक्षांची बेकायदा तोड; कारवाईची मागणी

**सेलू जनमाध्यम :** शहरातील विश्रामगृहाच्या मागील महसूल विभागाच्या मालकीच्या सरकारी जागेवरील गुलमोहर वृक्षांची विनापरवाना कत्तल करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सरकारी मालमत्तेचे नुकसान होऊनही अद्याप



संबंधितांवर कोणतीही कारवाई न झाल्याने महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या क्षेत्र सहाय्यकांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मात्र संबंधित जागा वनविभागाच्या अखत्यारीत नसून महसूल विभागाच्या ताब्यात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे या प्रकरणात चौकशी करून पुढील कायदेशीर कारवाई करण्याची जबाबदारी महसूल विभागाची असल्याचे सांगण्यात आले.

# खर्रीची पन्नी फेकण्यावरून तरुणावर जीवघेणा चाकूहल्ला

## काठीने मारहाण करून तरुणावर सपासप चाकूचे वार; प्रकृती चिंताजनक

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील वडगाव खुर्द येथे किरकोळ कारणावरून झालेल्या वादाने हिंसक वळण घेत एका १९ वर्षीय तरुणावर चाकूने सपासप वार करण्यात आल्याची धक्कादायक घटना शनिवारी रात्री घडली. या हल्ल्यात साहिल उर्फ करण प्रकाश सातपुते (वय १९) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर नागपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री साडेनऊच्या सुमारास साहिल याने आरोपीच्या घरासमोरील चौकात खर्रीची पन्नी फेकल्याच्या कारणावरून मंगेश घनश्याम पिंजरकर (वय ४२, रा. वडगाव खुर्द) याच्याशी वाद झाला. सुरुवातीला शाब्दिक बाचाबाची झाली. मात्र काही क्षणांतच हा वाद उग्र बनला.

आरोपीने प्रथम काठीने साहिलच्या डोक्यावर प्रहार केला. त्यानंतर घरातून धारदार चाकू आणून साहिलच्या पोटावर, हातावर आणि पायावर सपासप वार केले. गंभीर जखमी झालेल्या साहिलला परिसरातील नागरिकांनी तातडीने सेलू येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्याला नागपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच सेलू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. जखमीच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**आरोपीचे पोलिसांसमोर समर्पण-** घटनेनंतर आरोपी मंगेश पिंजरकर याने स्वतः सेलू पोलिस ठाण्यात हजर होत पोलिसांच्या स्वाधीन केले. त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. या घटनेमुळे वडगाव खुर्द परिसरात खळबळ उडाली असून किरकोळ कारणातून घडलेल्या या रक्तरंजित प्रकाराची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

# मान्सूनची साद... बोरच्या जंगलात शांतता

**वर्धा जनमाध्यम :** विदर्भातील वन्यजीव पर्यटनाचे प्रमुख आकर्षण असलेल्या सेलू तालुक्यातील बोर व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रातील जंगल सफारीला मान्सूनमुळे तात्पुरता ब्रेक लागला आहे. ३० जूनपासून कोअर क्षेत्र पर्यटकांसाठी बंद करण्यात आल्याने ऐरवी जंगलात धावणाऱ्या जिप्सींची चाकेही थांबली आहेत.

बोर व्याघ्र प्रकल्पातील समृद्ध जैवविविधता, वाघांसह विविध वन्यजीवांचे दर्शन आणि निसर्गरम्य वातावरणामुळे दरवर्षी हजारो पर्यटक येथे भेट देतात.

## कोअर सफारीला ब्रेक; जिप्सींची चाके थांबली, पर्यटकांना मान्सूननंतरच मिळणार जंगलभ्रमंतीचा आनंद

यंदाच्या उन्हाळी हंगामातही विदर्भासह राज्यातील आणि बाहेरील पर्यटकांनी मोठ्या संख्येने बोर सफारीचा आनंद घेतला. विशेष म्हणजे, कॅटरिना या वाघिणीचे तिच्या दोन बछड्यांसह दर्शन झाल्याने अनेक पर्यटकांची सफर अविस्मरणीय ठरली. जंगल पर्यटनामुळे परिसरातील युवकांना जिप्सी चालक, मार्गदर्शक आणि पर्यटनाशी संबंधित विविध व्यवसायांत रोजगाराची संधी मिळते. मात्र, वन्यजीवांच्या प्रजननाचा काळ आणि पावसाळ्यातील सुरक्षितता लक्षात घेऊन दरवर्षीप्रमाणे यंदाही कोअर सफारी बंद ठेवण्यात आली आहे. मान्सून संपल्यानंतर पुन्हा सफारी सुरू होणार असून पर्यटकांना बोरच्या जंगलातील रोमांचक अनुभव घेता येणार आहे.

# वाहतूक नियमांचे पालन हीच खरी सुरक्षितता; एनसीसीच्या ४०० विद्यार्थ्यांचा संकल्प

**सेवाग्राम जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यात रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करून वाहतूक नियमांबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने वर्धा जिल्हा पोलीस दलाच्या वतीने विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विशेष मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून सेवाग्राम येथील बापूराव देशमुख महाविद्यालयातील एनसीसी शिबिरात सहभागी झालेल्या ४०० विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील व सहाय्यक फौजदार जावेद खान यांनी विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा, वाहतूक नियमांचे पालन आणि सुरक्षित वाहनचालना याविषयी माहिती दिली.

यावेळी विद्यार्थ्यांना वाहन चालविण्यापूर्वी वैध परवाना घेणे, हेल्मेटचा वापर करणे, अतिवेग टाळणे, मद्य किंवा अमली पदार्थांचे सेवन करून वाहन न चालविणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर न करणे, तसेच अपघातग्रस्तांना तातडीने मदत करून १०८ ॲम्ब्युलन्स सेवा व ११२ पोलीस हेल्पलाईनचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. महिला सुरक्षा, गुड टच-बॅड टच, सायबर फसवणूक, अमली पदार्थांपासून दूर राहणे तसेच संशयास्पद व बेकायदेशीर प्रकारांची माहिती पोलिसांना देण्याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी एनसीसी विद्यार्थ्यांना देशप्रेम, शिस्त, अनुशासन आणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व सांगण्यात आले. एनसीसीचे प्रशिक्षण भविष्यात आर्मी, नेव्ही आणि एअरफोर्समध्ये करिअर घडविण्यास उपयुक्त ठरत असल्याने विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व ४०० विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून अपघातमुक्त जीवन जगण्याची व समाजातील गरजूंना मदत करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे आयोजन एनसीसीचे डीआय गणेश डोईफोडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी वाहतूक पोलिसांचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला आणि आभार मानले.

# कारला रोडवरील देहविक्री अड्ड्यावर छापा; पती-पत्नी अटकेत

## दाम्पत्याला बेड्या; पीडित महिलेची सुटका, ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील कारला रोडवरील वैष्णवी कॉम्प्लेक्स परिसरात सुरू असलेल्या देहविक्रीच्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखा व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने संयुक्त धाड टाकून एका दाम्पत्याला अटक केली. या कारवाईत एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली असून रोख रक्कम, मोबाईल व अन्य आक्षेपार्ह साहित्य असा एकूण ३४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



अटक करण्यात आलेल्यांमध्ये गणेश गोविंद महाले (वय ४३) व त्याची पत्नी यांचा समावेश आहे.

पोलिसांना आर्थिक लाभासाठी जिल्ह्याबाहेरील महिलांकडून देहविक्रीचा व्यवसाय करून घेतला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून आरोपी महिलेशी संपर्क साधला. दीड हजार रुपयांत व्यवहार निश्चित झाल्यानंतर ग्राहक ठरलेल्या ठिकाणी पोहोचताच पोलिसांनी छापा टाकला.

कारवाईदरम्यान एका खोलीत नागपूर येथील ३६ वर्षीय पीडित महिला आढळून आली. तिची सुटका करून आरोपी दाम्पत्याला ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत प्रत्येक ग्राहकाकडून १,५०० रुपये घेतले जात असून त्यापैकी ५०० रुपये पीडित महिलेला, तर उर्वरित रक्कम आरोपींकडे ठेवली जात असल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अतिरिक्त पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने केली.

# चाकूच्या धाकाने दहशत माजविणारा ‘अण्डा’ पोलिसांच्या जाळ्यात

देवळी पोलिसांची धडक कारवाई; चाकू जप्त, आरोपीला अटक

**देवळी जनमाध्यम :** शहरातील आंबेडकर नगर परिसरात हातात चाकू घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका तरुणाला देवळी पोलिसांनी धाडसी कारवाई करत अटक केली. संघर्ष उर्फ अण्डा प्रमोद गाडगे (वय २०, रा. आंबेडकर नगर, देवळी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून एक धारदार चाकू जप्त करण्यात आला आहे.



पोलिसांना ४ जुलै रोजी आंबेडकर नगर परिसरात एक तरुण हातात चाकू घेऊन फिरत असून नागरिकांना धाक दाखवत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. माहिती मिळताच देवळी पोलिसांनी तातडीने पथक तयार करून घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी शिताफीने त्याला घेराव घालून ताब्यात घेतले.

झडतीदरम्यान त्याच्याकडून एक धारदार चाकू जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई देवळी पोलिस ठाण्याचे ठाणेदार संदीप कापडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी नितीन तोडासे, रितेश शर्मा, सागर पवार आणि श्याम गावनेर यांनी केली.

या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर पोलिसांनी अशीच कठोर कारवाई सुरू ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आर्थिक संकटाने घेतला आणखी एका शेतकऱ्याचा बळी; बांबरडा हादरले

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील बांबरडा येथे रविवारी (दि. ५ जुलै) घडलेल्या दुर्दैवी घटनेने संपूर्ण गाव हळहळ व्यक्त करत आहे. शेतकरी राजेश उत्तम ताईवाडे (वय ४५) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवल्याची घटना उघडकीस आली. त्यांच्या निधनाने पत्नी, दोन चिमुकली मुले आणि वृद्ध आई-वडिलांचा आधार हरपला असून कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



प्राथमिक माहितीनुसार, राजेश ताईवाडे हे गेल्या काही काळापासून आर्थिक विवंचना, हाताला नियमित रोजगार नसणे आणि वाढत्या मानसिक तणावाचा सामना करत होते. या परिस्थितीमुळे त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज असून, या प्रकरणाचा पुढील तपास आष्टी पोलीस करीत आहेत.

घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील मोहित बगलेकर यांनी पोलिसांना कळविले. हेड कॉन्स्टेबल सतीश नंदा गवळी, प्रवीण सदावर्ते आणि वैभव साबळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी आष्टी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला.

राजेश ताईवाडे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, वृद्ध आई-वडील आणि भाऊ असा परिवार आहे. कुटुंबाचा कर्ता पुरुष अचानक गेल्याने गावात शोककळा पसरली आहे. वाढते आर्थिक संकट, रोजगाराची अनिश्चितता आणि त्यातून निर्माण होणारा मानसिक तणाव याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# एल निनोच्या सावटात शेती; पीकविमा ठरणार शेतकऱ्यांचा आधार

## ३१ जुलैपर्यंत संधी; मोजक्या हप्त्यात पिकांना मिळणार संरक्षण कवच

**वर्धा जनमाध्यम :** यंदाच्या खरीप हंगामावर एल निनो’चे सावट गडद होत असून, सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. अशा परिस्थितीत पिकांच्या सुरक्षेसाठी पीकविमा योजना शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरणार आहे. खरीप पीकविम्यात सहभागी होण्यासाठी ३१ जुलै ही अंतिम मुदत असून, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.




२१ जूनपासून जिल्ह्यात पावसाने हजेरी लावल्यानंतर शेतकऱ्यांनी पेरणीच्या कामांना वेग दिला. सध्या अनेक ठिकाणी पेरलेले बियाणे उगवणीच्या अवस्थेत असून, काही भागात पिकांची वाढ सुरू झाली आहे. तणनियंत्रणाची कामेही वेगाने सुरू आहेत. मात्र, पावसाने पुन्हा दडी मारल्यास उभ्या पिकांवर संकट ओढविण्याची शक्यता आहे. त्यामुळे वेळेत पीकविमा काढणे गरजेचे ठरत आहे.

वर्धा जिल्ह्यात खरीप हंगामात प्रामुख्याने सोयाबीन, कपाशी आणि तूर या पिकांची लागवड केली जाते. शासनाने अत्यल्प प्रीमियममध्ये पीकविमा उपलब्ध करून दिला आहे. त्यानुसार सोयाबीनसाठी प्रतिहेक्टर ५८ रुपये, तुरीसाठी ४७ रुपये आणि कपाशीसाठी ६५ रुपये भरून विमा संरक्षण मिळू शकते. नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि इतर प्रतिकूल परिस्थितीत होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून हा विमा शेतकऱ्यांना दिलासा देणार आहे.

### ■ दीड लाख हेक्टरवर पेरणी पूर्ण

जिल्ह्यात खरीप पेरण्या जवळपास पूर्ण झाल्या असून, आतापर्यंत दीड लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर सोयाबीन, तूर आणि कपाशीची लागवड झाल्याची नोंद कृषी विभागाने घेतली आहे.

एल निनोमुळे हवामानात अचानक बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे योग्य पीक व्यवस्थापनासोबतच ३१ जुलैपूर्वी पीकविमा काढणे आवश्यक आहे.’

**– अरविंद उपरिकर,**
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वर्धा

# ‘आमदार-खासदार फोडून ताण आला की ...’

## संजय राऊतांचे विधान चर्चेत; शिंदेंच्या उत्तम प्रकृतीसाठी केली प्रार्थना



**मुंबई** - राज्यात आमदार-खासदार फुटीवरून राजकीय वातावरण तापलं आहे. गेल्या १५ दिवसांत शिवसेनेला दोनवेळा जबर धक्के बसले. आधी ६ खासदारांनी बंड करून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. तर, नंतर विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी ठाकरेंची साथ सोडत शिंदेंच्या शिवसेनेतून विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी अर्ज केला. या दोन्ही घटना ताज्या असतानाच आणखी एका आमदाराला २० कोटींची ऑफर दिल्याची माहिती आज संजय राऊतांनी दिली. तसंच, त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या प्रकृतीबाबतही भाष्य केलं. यावेळी त्यांनी टॉलस्टॉयच्या गोष्टीचाही संदर्भ दिला.

संजय राऊत म्हणाले, ‘टॉलस्टॉयची गोष्ट सर्वांसाठी आहे. माणसाने कुठे थांबायचं हे ज्याला कळत नाही, त्याचा अंत वाईट आहे. बायबल, हिंदूत्व, पुराणात कोणत्याही धर्मात एक तत्व आहे; तुम्हाला कुठे थांबलं पाहिजे हे कळत नाही, तोपर्यंत तुम्हाला समाधान होत नाही. तुम्ही आमदार-खासदार फोडताय, कार्यकर्ते फोडताय, पैसे देताय. कालही एका लिंगाडे नावाच्या आमदाराला २० कोटींची ऑफर दिली. किती पाहिजे तुम्हाला? मग स्ट्रेसमुळे इस्पितळात जाऊन दाखल व्हावं लागतं. हे थांबलं पाहिजे’, असं म्हणत संजय राऊतांनी एकनाथ शिंदेंवरही टीका केली.

ते पुढे म्हणाले, ‘अतिश्रमामुळे एकनाथ शिंदे आजारी असल्याचं मला कळलं. ते आजारी असतील तर त्यांच्या प्रकृतीला आराम पडो, त्यांच्याबरोबर महाराष्ट्राच्या प्रकृतीलाही आराम पडो.’

संजय राऊतांनी आज टॉलस्टॉयच्या कथेवरून सत्ताधारी पक्षावर आणि मुख्यत्वे एकनाथ शिंदेंवर प्रहार केला. याबाबत त्यांनी सामनाच्या रोखठोक सदरातही लिहिलं आहे. ते म्हणाले, ‘महाराष्ट्रात शिंदे यांची अवस्था टॉलस्टॉयच्या कथेतील त्या हावऱ्या म्हाताऱ्यासारखी झाली आहे. ही गोष्ट बकासुरासारखी आहे. एका छोट्यागावात राहणारा म्हातारा शेतकरी, तो ‘टांगा’ चालवून उदरनिर्वाह करीत होता. नेहमीच असंतुष्ट दिसायचा.

त्याच्या मालकाने त्याला कितीही दिले तरी त्याला ते कमीच वाटायचे. जे आहे ते पुरेसे नाही या भावनेने तो रात्रभर तळमळत पडायचा.

# तुकाराम मुंढेंच्या खात्याची पुण्यातील बड्या हॉटेलवर कारवाई

## ‘मथुरा प्युअर व्हेज’ बंद करण्याचे आदेश; ७ रेस्टॉरंट्सवर धडक कारवाई







**पुणे :** पुण्यातील खवय्यांसाठी आणि हॉटेल चालकांसाठी एक अत्यंत मोठी आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. अन्न व औषध प्रशासनानेपुणे शहरातील हॉटेल्सवर मोठी कारवाई करत प्रसिद्ध 'मथुरा प्युअर व्हेज' हॉटेल बंद करण्याचे आदेश दिले आहेत. अन्न पदार्थांच्या चाचणीचे अहवाल येईपर्यंत हे हॉटेल बंद ठेवण्यास सांगण्यात आले आहे. यासोबतच पुण्यातील तब्बल ७ नामांकित रेस्टॉरंट्सचे परवाने एफडीएने निलंबित केले आहेत. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कडक निर्देशानुसार ही धडक कारवाई करण्यात आल्याने हॉटेल चालकांचे धाबे दणाणले आहेत.

राज्यात नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित अन्न मिळावे यासाठी आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत पुणे विभागात हॉटेल चालकांविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाने मोठी मोहीम हाती घेतली आहे. १ ते ३ जुलै दरम्यान संपूर्ण राज्यातील तब्बल ७० हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सची अचानक तपासणी करण्यात आली.

पुण्यातील ज्या ७ रेस्टॉरंट्सवर एफडीएने धाडी टाकल्या, तिथे अन्न सुरक्षा कायद्याचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे उघडकीस आले. तपासणी दरम्यान हॉटेलच्या स्वयंपाकघरात कमालीची अस्वच्छता, निकृष्ट दर्जाचे अन्न आणि मुदतबाह्य अन्नसाठा आढळून आला. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या आस्थापनांवर कारवाईचा बडगा उगारत प्रशासनाने त्यांचे परवाने तात्काळ निलंबित केले आहेत.

पुण्यातील प्रसिद्ध 'मथुरा प्युअर व्हेज'वर झालेली कारवाई सध्या शहरात चर्चेचा विषय ठरली आहे. एफडीएच्या पथकाने या हॉटेलमधील अन्नपदार्थांचे नमुने जप्त केले असून ते प्रयोगशाळेत चाचणीसाठी पाठवले आहेत. हा चाचणी अहवाल जोपर्यंत अधिकृतपणे येत नाही, तोपर्यंत हॉटेल पूर्णपणे बंद ठेवण्याचे कडक आदेश देण्यात आले आहेत.

अन्न सुरक्षा मानकांचे पालन न करणाऱ्या आणि ग्राहकांच्या जिवाशी खेळणाऱ्या कोणत्याही हॉटेलची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

आगामी काळातही पुण्यात आणि संपूर्ण महाराष्ट्रात ही तपासणी मोहीम अशीच तीव्रतेने सुरू राहणार असल्याने हॉटेल चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# संक्षिप्त

## इयत्ता सहावीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील धडा वादाच्या भोवऱ्यात



**मुंबई** - बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील ‘लोकनृत्य’ धड्यावरून नव्या वादाला सुरुवात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बालभारतीने मराठी पाठ्यपुस्तकातील धड्यात एकूण पाच लोकनृत्यांचा समावेश केला आहे, त्यापैकी पाच पैकी केवळ एक महाराष्ट्रातील, तर चार इतर राज्यांतील लोकनृत्यांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील लावणी, लेझीम, धनगरी गजा, गोंधळ, कोळी नृत्य, पोवाडा यांसारख्या समृद्ध लोकपरंपरेला पुरेसे स्थान न दिल्याची जेष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशीसह शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक आणि सांस्कृतिक जाणकारांनी यावर नाराजी व्यक्त केली. दरम्यान, विद्यार्थी सहाव्या ईयत्तेत शिकत असता राज्यातील विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावर महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीची अधिक व्यापक ओळख करून देणे आवश्यक होते, प्रत्येक विभागानुसार लोकनृत्याचा समावेश करता आला असता, तसे झाले नसल्याने रिजॉइंडर जोडून पाठ्यपुस्तकात सुधारणा करावी, अशी मागणी जेष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून केली आहे. या धड्याला घेवून राज्य शैशानिक संशोधन परिषद व भालभारती यांना देखील याचा खुलासा केला नसल्याचे त्यावर देखील त्यांनी आक्षेप नोंदविला आहे. यापूर्वीही इयत्ता तिसरीच्या पुस्तकात भिडेवाड्याचा उल्लेख 'महाराष्ट्रातील पहिली शाळा' असा करण्यात आल्याने वाद निर्माण झाला होता. इतिहासानुसार भिडेवाडा ही देशातील पहिली मुलींची शाळा असल्याचा आक्षेप नोंदवण्यात आला होता. त्यानंतर बालभारतीने संबंधित मजकुरात दुरुस्ती करण्याची घोषणा केली होती. आता लोकनृत्याच्या धड्यामुळे पुन्हा एकदा बालभारतीच्या अभ्यासक्रमाला घेवून राज्य सरकारच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

## ‘मंगेशकर कुटुंबीय कोणाला काही देत नाहीत; पण मला..’



**पुणे :** ‘मंगेशकर कुटुंबीय कोणाला फारसं काही देत नाहीत; पण मला त्यांनी भेट दिली आहे,’ असे मिश्कील विधान करून भाजपचे राष्ट्रीय सचिव सुनील देवधर यांनी रविवारी पुण्यातील एका कार्यक्रमात उपस्थितांना खळखळून हसवले. त्यांच्या या विधानानंतर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट, हास्याची लकेर आणि कुजबुज रंगली.शेठ चिमणलाल गोविंददास मेमोरियल ट्रस्टच्या पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर ‘राष्ट्रीय एकात्मतेपुढील आव्हाने’ या विषयावर देवधर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी आपल्या गाण्याच्या आवडीचा उल्लेख करत नेहमीच्या गंभीर विषयाला हलकाफुलका रंग दिला.‘काही जण किराणा घराण्याचे, काही लखनौ घराण्याचे गायक असतात. मी मात्र हमाम घराण्याचा अर्थात बाथरूम सिंगर आहे,’ असे म्हणताच सभागृहात एकच हशा पिकला. त्यावरच न थांबता, ‘हिंदी चित्रपटसृष्टीतील पाच हजार ते सहा हजार गाण्यांचे अंतरे आणि मुखडे मला तोंडपाठ आहेत. या बाबतीत मला सहज हरवणे कठीण आहे,’ असेही त्यांनी आत्मविश्वासाने सांगितले.

## पेरणीचा खर्च वाढला ! ट्रॅक्टर किंमतीमध्ये तीन टक्के वाढ



**छत्रपती संभाजीनगर :** थोडा पाऊस पडू लागला आणि गावागावातील ‘पेर्ते’ शोधण्याची लगबग सुरू झाली आहे. आणि दोन महिन्यापूर्वी वाढलेल्या लोखंडाचे भाव वाढले परिणामी या महिन्यापासून ट्रॅक्टरच्या दरात तीन टक्के वाढ होईल असे ट्रॅक्टर कंपन्यांनी वितरकांना कळवले आहे. केवळ ट्रॅक्टरचे नव्हे तर ‘नांगराचा फाळ आता ६० हजार रुपयांना तर पेरणी यंत्र ५० हजाराच्या पुढे गेले आहे. एकूण क्षेत्रापैकी ७० टक्के क्षेत्र आता यंत्राच्या आधारे होत असून आता शेतीचा भांडवली खर्च या वर्षी वाढला आहे.राज्यात अनेक भागात पावसाने हजेरी लावायला सुरुवात केली आणि पेरणीची लगबग सुरू झाली. या वर्षी पेरणीपूर्वी डिझेल मिळत नसल्याने नांगरणीचा खर्चही वाढला होता. इस्राएल आणि इराण युद्धाचा परिणाम म्हणून लोखंडाचे दर वाढले. त्यामुळे नांगराचा फाळ ५८ हजाराहून ६० हजार रुपयांवर गेले आहे. पेरणी यंत्राची किंमतही वाढली आहे.

## आचारसंहितेमुळे रखडलेल्या दोन रेल्वेगाड्यांचा अखेर मुहूर्त



**अकोला :** आचारसंहितेमुळे रखडलेल्या दोन रेल्वेगाड्या सुरू होण्याचा अखेर मुहूर्त निघाला आहे. नांदेड – लोकमान्य टिळक टर्मिनस आणि टनकपुर – नांदेड या दोन नवीन एक्सप्रेस गाड्यांना ६ जुलैपासून सुरुवात होणार आहे. मराठवाडा, विदर्भातून थेट मुंबई व देवभूमी उत्तराखंडला जोडणाऱ्या थेट गाड्या धावणार असल्याने प्रवाशांसाठी मोठी सुविधा होणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव ६ जुलैला सकाळी १० वाजता उद्घाटन सोहळ्यात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी होऊन गाड्यांना हिरवी झेंडी दाखवणार आहेत. हजूर साहिब नांदेड-लोकमान्य टिळक टर्मिनस उद्घाटन विशेष गाडी क्रमांक ०७६६७ हजूर साहिब नांदेड येथून ७ जुलैला १०.४५ वाजता सुटेल. दुसऱ्या दिवशी ४.५० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. या गाडीला पूर्णा, बसमत, हिंगोली डेक्कन, वाशीम, अकोला, मलकापूर, भुसावळ, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण येथे थांबा राहील.

## सात वेळा वाढवला कांदा खरेदीचा दर

**नाशिक:** साधारणतः दीड महिन्यांत दर स्थिरीकरण निधी योजनेंतर्गत सरकारी कांदा खरेदीचे दर जवळपास सात वेळा वाढवूनही शेतकऱ्यांनी नाफेड व एनसीसीएफच्या केंद्रांवर जणू बहिष्कार टाकल्याचे चित्र समोर येत आहे. प्रारंभी प्रति क्विंटल १,२३५ रुपये असलेला हा दर आता २,१२५ रुपयांवर पोहोचला आहे.

# सोन्या-चांदीच्या दरात मोठी उसळी



**नवी दिल्ली** -देशांतर्गत सराफा बाजारात सराफा बाजारात आज सोन्या आणि चांदीच्या किमतींनी नवा उच्चांक गाठत मोठी झेप घेतली आहे. आज २४ कॅरेट सोन्याच्या दरात जोरदार तेजी पाहायला मिळाली असून, ते प्रति १० ग्रॅम ?१.४९ लाख रुपयांवर व्यवहार करत आहे. गेल्या सत्राच्या तुलनेत सोन्याच्या भावात १.८८% ची वाढ झाली आहे, म्हणजेच अवघ्या एका दिवसात सोन्याचा भाव तब्बल २,७०० ते २,८०० रुपयांनी वधारला आहे.

दुसरीकडे, सर्वसामान्यांच्या आवडीच्या २२ कॅरेट सोन्याच्या दरातही चांगलीच वाढ झाली असून, ते प्रति १० ग्रॅम १.३७ लाख रुपयांच्या आसपास पोहोचले आहे. सोन्यासोबतच चांदीनेही ग्राहकांना झटका दिला असून, चांदीचा भाव प्रति किलोग्राम २.२६ लाख ते २.५० लाख रुपयांच्या आसपास व्यवहार करत आहे.

# देवगडच्या उच्चशिक्षित इंजिनिअर वैष्णवीने ‘बळीराजा’शी बांधली साता जन्माची गाठ



**देवगड** - मुलगा नोकरीवालाच हवा आणि तो पुणे-मुंबईसारख्या शहरात राहणारा असावा,’ या हट्टापायी आज महाराष्ट्रातील गावागावांत हजारो तरुण शेतकरी लग्नाविना बसले आहेत. शेतीला 'तोट्याचा व्यवसाय' मानून शेतकऱ्यांच्या मुलांना मुलगी देण्यास नकार देणाऱ्या आजच्या बुरसटलेल्या सामाजिक मानसिकतेवर कोकणातील एका उच्चशिक्षित मुलीने आपल्या धाडसी निर्णयाने जोरदार प्रहार केला आहे. देवगडच्या उच्चशिक्षित इंजिनिअर मुलगी वैष्णवी कदम हिने कोणत्याही कॉर्पोरेट झगमगाटाला किंवा शहरातल्या सुखसोयींना भुलू न देता 'मोंड राणेवाडी' येथील मनोज दळवी या कष्टाळू शेतकरी तरुणाला आपला जीवनसाथी म्हणून निवडले आहे. तिच्या या प्रेरणादायी निर्णयाची दखल घेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी थेट तिच्या सासरी जाऊन या नवदाम्पत्याला वैवाहिक आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मे महिन्यातील 'ती' भेट अन् वैष्णवीचा दांडगा आत्मविश्वास!

माजी खासदार राजू शेट्टी यांनी या कौतुकास्पद घटनेचा सविस्तर प्रवास आपल्या पोस्टमध्ये मांडला आहे. मे महिन्यामध्ये राजू शेट्टी देवगड येथे आंबा व काजू बागायतदार शेतकऱ्यांच्या मेळाव्यासाठी गेले होते. त्यावेळेस वैष्णवी आणि तिच्या वडिलांनी मेळाव्यात त्यांची भेट घेऊन लग्नाची पत्रिका दिली होती. पत्रिका देत असताना वैष्णवीने मोठ्या उत्साहात आणि आत्मविश्वासाने सांगितले होते, 'साहेब, मी इंजिनिअरिंग मधील उच्चशिक्षित मुलगी आहे. मात्र, मी एका शेतकरी मुलाबरोबर लग्न करण्याचे ठरविले आहे. यामुळे माझ्या लग्नाला येवून तुम्हाला आशिर्वाद द्यावेच लागतील.' तिचा तो आत्मविश्वास आणि तिने घेतलेला क्रांतीकारी निर्णय ऐकून स्वतः राजू शेट्टी काही क्षणांसाठी अचंबित झाले होते.

# पीकविमा योजनेत गैरप्रकार करणाऱ्यांचे सरकारी लाभ बंद

## सुधारित योजना लागू; ३१ जुलैपूर्वी नोंदणीची मुदत




**मुंबई :** शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तींमुळे शेतीमालाच्या उत्पादनात होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, या उद्देशाने राज्य शासनाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. ३१ जुलैपूर्वी शेतकऱ्यांनी नोंदणी करता येईल. यंदाच्या पिक विमा योजनेत गैरप्रकार करणाऱ्या शेतकऱ्यांचे कृषी विभागाकडून मिळणारे लाभ बंद केले जाणार आहेत.

या बाबतचा सुधारित शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. त्यानुसार अधिसूचित महसूल मंडलांमध्ये अधिसूचित पिकाचे चालू वर्षातील सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास संबंधित शेतकऱ्यांना विमा नुकसान भरपाईचा लाभ मिळणार आहे. खरीप हंगामासाठी भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस आणि खरीप कांदा या एकूण चौदा पिकांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी अन्नधान्य, कडधान्य व तेलबिया पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या केवळ दोन टक्के विमा हप्ता भरावा लागणार असून, कापूस आणि कांदा या व्यापारी पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या पाच टक्के हप्ता भरावा लागणार आहे.

# सिया-चेतनच्या मोबाईलमधील डेटा मिळाला



**पुणे :** केतन अग्रवाल खून प्रकरणात संशयित मुख्य आरोपी असलेली त्याची नियोजित वधू सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांच्याकडून जप्त केलेल्या तिन्ही मोबाइलमधून ‘डिलिट’ करण्यात आलेला ‘डेटा’ पुणे ग्रामीण पोलिसांनी परत मिळवला केला आहे.

चेतन चौधरीच्या एका मित्राला केतन अग्रवालच्या खुनाच्या कटाची पूर्वकल्पना असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, त्याचा जबाब पोलिसांनी नोंदविला आहे.

या मित्राने चेतन आणि सियाला गुन्हा करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांना सांगितले आहे. दुसरीकडे, चेतन चौधरीची अटक बेकायदा असल्याचा अर्ज त्याचे वकील राधिकेश उत्तरवार यांनी न्यायालयात केला आहे. चेतन चौधरीला २३ जून रोजी दुपारी साडेचारला अटक करण्यात आल्याचा दावा पुणे ग्रामीण पोलिसांनी न्यायालयात सादर केलेल्या रिमांड अहवालात केला आहे.

प्रत्यक्षात पोलिसांनी चेतन चौधरीला २२ जून रोजी मध्यरात्री सव्वाबाराच्या सुमारास कोंढव्यातील राहत्या घरातून ताब्यात घेऊन पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयात आणले होते.

त्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ९४ अंतर्गत चेतन चौधरीची अटक बेकायदा असल्याचा अर्ज केला असून, त्यामध्ये पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षकांचे कार्यालय व चेतनच्या घराजवळच्या सीसीटीव्हींचे २४ तासांचे चित्रीकरण सुरक्षित ठेवण्याची मागणी केली आहे. त्यावर, बुधवारी सुनावणी होणार आहे, असे ॲड. उत्तरवार यांनी सांगितले.

**केतनच्या आजोबांचे निधन**

केतन अग्रवालचे आजोबा देवीचंद अग्रवाल (वय ८३) यांचे शनिवारी सायंकाळी खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले.

# बाल लैंगिक शोषणाला प्रोत्साहन देणाऱ्या जाहिराती त्वरित थांबवा

## केंद्र सरकारचे मेटाला आदेश





**नवी दिल्ली** -बाल लैंगिक शोषणाला प्रोत्साहन देणाऱ्या जाहिराती इन्स्टाग्रामवर दाखवल्या गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. त्यामुळे केंद्र सरकारने याची गंभीर दखल घेतली आहे. आता केंद्र सरकारने इन्स्टाग्रामची मूळ कंपनी ‘मेटा’ला समन्स बजावले आहेत. इंस्टाग्रामवर अशा जाहिराती प्रसारित कशा होतात? असा सवाल विचारत बाल लैंगिक शोषणाला कथितपणे प्रोत्साहन देणाऱ्या जाहिराती त्वरित थांबवण्याचे आदेश केंद्र सरकारने ‘मेटा’ला दिले आहेत.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने या प्रकरणात मेटाला नोटीस बजावली असल्याची माहिती एका सरकारी अधिकाऱ्याने दिली आहे. मेटाला बजावलेल्या नोटीसमध्ये सरकारने इन्स्टाग्रामला बाल लैंगिक शोषण आणि शोषणाला प्रोत्साहन देणाऱ्या किंवा त्यापर्यंत पोहोचण्यास मदत करणाऱ्या सर्व जाहिराती बंद करण्याचे आदेश दिले आहेत. त्याच बरोबर या प्रकाराबाबत स्पष्टीकरण देण्यास मेटाला सरकारने सात दिवसांची मुदत दिली आहे.

बाल लैंगिक शोषणाला कथित प्रोत्साहन देणाऱ्या जाहिराती आणि कथित अल्गोरिदमद्वारे होणाऱ्या प्रसारणाकडे केंद्र सरकार अतिशय गांभीर्याने पाहत असून याबाबत तात्काळ सुधारणा करण्याचे आणि उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती देखील सरकारी अधिकाऱ्याने सांगितली आहे.

‘बीबीसी आय’च्या एका तपासानुसार इन्स्टाग्रामवर ‘रेप व्हिडीओ’ आणि ‘चाइल्ड व्हिडीओ’ या सारखे शब्द असलेल्या सशुल्क जाहिराती दाखवल्या जात होत्या. या जाहिरातींवर क्लिक केल्यास युजर्स थेट ‘टेलिग्राम’ चॅनेल्सवर पोहोचत होते, जिथे अवघ्या ९९ रुपयांमध्ये बाल लैंगिक शोषणाचे बेकायदेशीर व्हिडीओ विकले जात होते. धक्कादायक बाब म्हणजे, इन्स्टाग्रामवरील प्रत्येक जाहिरात ही त्यांच्या पडताळणी प्रक्रियेतून मंजूर झाल्यानंतरच लाईव्ह होते, तरीही या जाहिराती कशा दिसल्या? असा प्रश्न उपस्थित येत आहे.

या तपासासाठी बीबीसीने भारतात एक काल्पनिक इन्स्टाग्राम अकाउंट तयार केलं होतं. या अकाउंटवरून केवळ अशा प्रकारच्या १० प्रोफाइल फॉलो केल्या गेल्या. अवघ्या एका आठवड्यात या अकाउंटवर अश्लील आणि बाल लैंगिक शोषणाशी संबंधित सुमारे ३० वेगवेगळ्या जाहिराती दिसू लागल्या. यात लहान मुलांवर अत्याचार दर्शवणाऱ्या जाहिरातींचाही समावेश होता.

**मेटा कंपनीने काय स्पष्टीकरण दिलं होतं?**

बीबीसीने प्रश्न विचारल्यानंतर मेटा कंपनीने तात्काळ कारवाई करत संबंधित जाहिराती आणि त्या पोस्ट करणारी अकाउंट्स निलंबित केले होते. यावर मेटाने म्हटलं की, ‘कोणतीही प्रणाली पूर्णपणे परिपूर्ण नसते आणि कधीकधी आमच्या पडताळणी प्रक्रियेतून अशा गोष्टी सुटू शकतात. पण अशा प्रकारचा गुन्हा रोखण्यासाठी आम्ही सातत्याने तंत्रज्ञानाचा वापर करत आहोत आणि संशयास्पद वाटल्यास ‘नॅशनल सेंटर फॉर मिसिंग अँड एक्स्प्लॉइटेड चिल्ड्रन’कडे याची तक्रार करतात. केवळ २०२५ मध्येच अशा संशयास्पद हालचालींमुळे ४० लाखांहून अधिक अकाउंट्स ब्लॉक करण्यात आल्याचा दावा मेटाने केला.

# संपादकीय


प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## प्रामाणिकतेची कसोटी

**भा**रतातील कोणतीही स्पर्धा परीक्षा ही लाखो उमेदवारांच्या भविष्याशी जोडलेली असते. एखादी परीक्षा केवळ गुण मिळविण्याचे साधन नसते, तर ती एखाद्याच्या आयुष्याचा मार्ग ठरवत असते. त्यामुळे अशा परीक्षांमध्ये पारदर्शकता, गोपनीयता आणि विश्वासार्हता या तीन बाबी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. मात्र गेल्या काही वर्षांत विविध भरती परीक्षा आणि पात्रता परीक्षांमध्ये सातत्याने पेपरफुटीच्या घटना घडत आहेत. नीट परीक्षेभोवती निर्माण झालेल्या वादानंतर टीईटी पेपरफुटी प्रकरणाने पुन्हा एकदा परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी समोर आणल्या आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांच्या शाळांमध्ये शिक्षक म्हणून नियुक्ती मिळविण्यासाठी ही परीक्षा अनिवार्य मानली जाते. अनेक राज्यांमध्ये सेवेत असलेल्या शिक्षकांनाही काही नियमांनुसार टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक असते. त्यामुळे ही परीक्षा केवळ नव्या उमेदवारांसाठीच नाही, तर सेवेत असलेल्या शिक्षकांसाठीही अत्यंत महत्त्वाची आहे.शिक्षक हा समाजाचा शिल्पकार मानला जातो. विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते. त्यामुळे शिक्षकांकडे आवश्यक ज्ञान, अध्यापन कौशल्य आणि शैक्षणिक पात्रता आहे का, याची खात्री करण्यासाठी टीईटी परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत बालमानसशास्त्र, अध्यापन पद्धती, भाषा, गणित, पर्यावरण अभ्यास यासारख्या विषयांवरील उमेदवारांचे ज्ञान तपासले जाते. टीईटी उत्तीर्ण झाल्याशिवाय सरकारी किंवा अनुदानित शाळांमध्ये शिक्षक म्हणून संधी मिळणे कठीण असते. त्यामुळे या परीक्षेला उमेदवारांच्या करिअरमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. टीईटीसाठी लाखो उमेदवार अनेक महिने अथक परिश्रम करतात. काहीजण कोचिंग क्लासेस लावतात, पुस्तके विकत घेतात, ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण करतात आणि आर्थिक अडचणी असूनही तयारी सुरू ठेवतात. दुसरीकडे, सेवेत असलेले अनेक शिक्षक दिवसभर शाळेचे काम सांभाळून रात्री अभ्यास करतात. अध्यापन, परीक्षा, शालेय उपक्रम आणि प्रशासकीय कामे पूर्ण करून ते टीईटीची तयारी करतात. अशा परिस्थितीत पेपर फुटल्याचे समोर आले की त्यांच्या मेहनतीचे मोल एका क्षणात कमी होते. ज्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास केला, त्यांच्यासाठी हा मानसिक धक्का असतो. पेपरफुटीचा सर्वाधिक फटका प्रामाणिक विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना बसतो. कारण त्यांनी केलेल्या मेहनतीला न्याय मिळत नाही. ज्यांच्याकडे पैसा किंवा गैरमार्गाचा आधार असतो, त्यांना अन्यायकारक फायदा मिळण्याची शक्यता निर्माण होते. अनेक वेळा पेपरफुटीनंतर परीक्षा रद्द करावी लागते. पुन्हा परीक्षा घेण्यासाठी अनेक महिने जातात. या काळात उमेदवारांचे वय वाढते, आर्थिक भार वाढतो आणि मानसिक ताणही वाढतो. टीईटी पेपरफुटी प्रकरणात तपास यंत्रणांनी अनेक आरोपींना अटक केली. काही अधिकारी, दलाल आणि संबंधित व्यक्तींवर गुन्हे दाखल झाले. चौकशीमध्ये अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका बाहेर काढणे, उमेदवारांकडून लाखो रुपयांची मागणी करणे, बनावट नेटवर्क तयार करणे अशा प्रकारांनी हा गैरव्यवहार झाल्याचे तपासात स्पष्ट झाले. मात्र केवळ आरोपींना अटक झाली म्हणून प्रश्न संपत नाही. कारण प्रत्येक पेपरफुटीनंतर काही आरोपी पकडले जातात; पण काही वर्षांनी पुन्हा अशाच घटना घडतात. याचा अर्थ मूळ व्यवस्थेमध्येच गंभीर त्रुटी आहेत.पेपरफुटीमागे अनेक कारणे आहेत.सर्वप्रथम, प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून छपाई, वाहतूक आणि परीक्षा केंद्रापर्यंत अनेक टप्प्यांमध्ये मानवी हस्तक्षेप असतो. प्रत्येक टप्प्यावर गोपनीयतेची जबाबदारी असते. यापैकी एखाद्या ठिकाणी भ्रष्टाचार झाला तर संपूर्ण व्यवस्था धोक्यात येते. काही उमेदवार कोणत्याही मार्गाने यश मिळविण्याचा प्रयत्न करतात. या मानसिकतेचा फायदा दलाल घेतात. तिसरे म्हणजे, पेपरफुटीमध्ये सहभागी असलेल्या आरोपींना तातडीने आणि कठोर शिक्षा होत नाही. न्यायालयीन प्रक्रिया लांबत असल्यामुळे गुन्हेगारांना फारसा धाक राहत नाही. चौथे म्हणजे, परीक्षा आयोजित करणाऱ्या संस्थांमध्ये तांत्रिक सुरक्षा आणि डिजिटल निरीक्षण अनेकदा अपुरे असते. यामुळे गोपनीय माहिती गळती होण्याची शक्यता वाढते. पेपरफुटीचा परिणाम केवळ एका परीक्षेपुरता मर्यादित राहत नाही. विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास कमी होतो.'मेहनतीपेक्षा पैसा आणि ओळखी महत्त्वाच्या आहेत' अशी भावना निर्माण होणे, ही कोणत्याही समाजासाठी धोक्याची बाब आहे. शिक्षक होण्यासाठीच जर गैरमार्गाचा वापर झाला, तर त्याचा परिणाम पुढील अनेक वर्षे शिक्षणाच्या गुणवत्तेवर होऊ शकतो. कारण गुणवत्तेपेक्षा गैरव्यवहारातून पात्र ठरलेले उमेदवार व्यवस्थेत प्रवेश करू शकतात.भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी केवळ घोषणांपेक्षा ठोस उपाययोजना आवश्यक आहेत. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून परीक्षा संपेपर्यंत संपूर्ण प्रक्रिया डिजिटल सुरक्षेखाली आणली पाहिजे. प्रश्नपत्रिका एन्क्रिप्टेड स्वरूपात सुरक्षित ठेवणे, शेवटच्या क्षणी अधिकृत प्रणालीद्वारे डाउनलोड करण्याची व्यवस्था करणे आणि प्रत्येक टप्प्यावर डिजिटल ट्रॅकिंग करणे गरजेचे आहे. परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही, बायोमेट्रिक पडताळणी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित निरीक्षण प्रणालीचा वापर वाढविणे आवश्यक आहे. पेपरफुटीच्या पेपरफुटीच्या गुन्ह्यांसाठी कठोर आणि जलद न्यायव्यवस्था उभी राहिली पाहिजे. दोषी आढळलेल्या अधिकारी, कर्मचारी, दलाल आणि उमेदवारांवर कारवाई करून त्यांना भविष्यात सरकारी भरतीपासून कायमचे अपात्र ठरविण्याची तरतूद असावी. तसेच परीक्षा व्यवस्थापन करणाऱ्या संस्थांचे नियमित स्वतंत्र लेखापरीक्षण (ऑडिट) झाले पाहिजे. परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे सुरक्षित, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करणे, दोषींना कठोर शिक्षा देणे आणि प्रामाणिक उमेदवारांच्या विश्वासाचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. कारण परीक्षेची विश्वासार्हता टिकली तरच गुणवत्तापूर्ण शिक्षक घडतील आणि गुणवत्तापूर्ण शिक्षक घडले तरच देशाची भावी पिढी सक्षमपणे उभी राहील.

# इथेनॉल मिश्रणाचा पेच

**भारताने पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य पाच वर्षे आधीच गाठले. भारताची इथेनॉल उत्पादन क्षमता गरजेपेक्षा दुप्पट झाली असली, तरी जुन्या वाहनांचे मायलेज आणि इंजिनच्या सुरक्षेचा प्रश्न आहे.**




**भा**रतासाठी इंधन सुरक्षा हा आर्थिक आणि भूराजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि देशांतर्गत उत्पादित इंधनाचा वापर वाढवण्यासाठी भारत गेल्या अनेक वर्षांपासून पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणावर भर देत आहे. इथेनॉल हे ऊस, मका किंवा इतर पिकांपासून तयार होणारे अल्कोहोल आधारित इंधन आहे, जे पेट्रोलमध्ये मिसळून वाहनांसाठी वापरले जाऊ शकते. २०३० पर्यंत ई-२० म्हणजे पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण साध्य करण्याची योजना होती. भारताने हे उद्दिष्ट तब्बल पाच वर्षे आधीच गाठले असून ई-२० आज राष्ट्रीय मानक बनले आहे. ई-२५, ई-८५ आणि ई-१०० हे पुढील टप्पे गाठण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे ग्राहक, वाहन उत्पादक आणि धोरणकर्त्यांसमोर नवीन प्रश्न उभे राहिले आहेत.

### क्षमता विरुद्ध मागणी

ई-२० नियमांचे उद्दिष्ट गाठण्यासाठी भारताला वर्षाला सुमारे १० ते ११ अब्ज लिटर इथेनॉलची गरज आहे; मात्र नोव्हेंबर २०२५ मध्येच देशाची उत्पादन क्षमता २० अब्ज लिटरवर पोहोचली. २०२६-२७ या आर्थिक वर्षात त्यात आणखी १५ टक्के वाढ अपेक्षित आहे. सध्याच्या गरजेपेक्षा ही क्षमता दुप्पट असल्याने अनेक कारखाने अवघ्या २५-३० टक्के क्षमतेवर चालत आहेत. त्यामुळे प्रश्न पुरवठा वाढवण्याचा नसून अतिरिक्त क्षमतेसाठी मागणी सुनिश्चित करण्याचा आहे. सरकारी कर्ज सवलतींमुळे खासगी क्षेत्राकडून या उद्योगात ४०,००० कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक झाली; मात्र प्रकल्प बंद राहिल्यास खर्च वाढून ही गुंतवणूक धोक्यात येऊ शकते. साखरेच्या अस्थिर बाजारापेक्षा इथेनॉलला हमीभाव मिळत असल्याने कंपन्यांनी इथे गुंतवणूक वाढवली आहे. परिणामी, इथेनॉलचा गरजेपेक्षा जास्त पुरवठा होत आहे. त्यामुळे इथेनॉल मिश्रण या अतिरिक्त उत्पादनाला सामावून घेण्याचा एक मार्ग बनले आहे.

### आयात पर्यायाचा प्रश्न

इथेनॉलचे उत्पादन वाढवण्यासाठी ऊस, मका आणि तांदळाचे अधिक उत्पादन लागेल. यासाठी युरिया, डायअमोनियम फॉस्फेट आणि पोटॅशसारख्या खतांची मागणी वाढेल. ही खते स्वतः आयात केलेल्या नैसर्गिक वायूवर अवलंबून असतात. या पिकांना जास्त पाठबळ दिल्यास शेतकरी तेलबिया आणि डाळींचे क्षेत्र कमी करण्यास प्रवृत्त होऊ शकतात. इथेनॉलच्या मोहापायी डाळी, तेलबिया आणि पशुखाद्याचा तुटवडा निर्माण होऊन 'अन्न की इंधन' असा पेच उभा ठाकू शकतो. इथेनॉलमुळे देशाचे एकूण आयात-अवलंबित्व कमी होणार नाही. ते केवळ खते, नैसर्गिक वायू आणि खाद्यतेलांकडे वळेल. पर्यावरणीय गणित हा आणखी एक गंभीर पेच आहे. एक लिटर इथेनॉलनिर्मितीसाठी उसाला २८६० लिटर, मक्याला ४०९३ लिटर, तर तांदळाला तब्बल १० हजार ७९० लिटर पाणी लागते. सध्या जवळपास ५०० कारखाने सुरू असून धान्यापासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा वाटा वाढतो आहे, ज्यामुळे पाण्याची गरजही वाढते आहे. मक्याचा उत्पादन खर्च वाढतो आहे; पण खरेदी दर स्थिर असल्याने उत्पादकांना नुकसान होत आहे. अपुरी वितरण यंत्रणा, जनजागृतीचा अभाव आणि फ्लेक्स इंधन म्हणजे विविध प्रमाणातील पेट्रोल-इथेनॉल मिश्रणांवर चालू शकणाऱ्या वाहनांची महागडी किंमत यांमुळे अतिरिक्त अडथळे निर्माण होतील. सरकारने २२ ते ३० टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलला केंद्रीय अबकारी करातून सवलत देत ते ई-२० च्या पातळीवर आणले, तसेच मोटार वाहन नियमांखाली ई-८५ आणि ई-१०० ला अधिकृत मान्यता देण्यासाठी हालचाली सुरू केल्या. 'ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्स'ने उच्च मिश्रणांचे तांत्रिक निकष जाहीर केले. सरकार ई-२२ ते ई-३० साठी मानके तयार करत आहे. ई-२५ वाहनांच्या चाचण्याही सुरू झाल्या. केंद्र सरकारने ई-१०० लाही कायदेशीर मान्यता दिली. ई-२० नंतरच्या कोणत्याही उच्च मिश्रणाची अंमलबजावणी पूर्ण चाचण्यांनंतरच केली जाईल. वाहन उत्पादक व इंधन पुरवठादारांना पुरेसा वेळ मिळणे अपेक्षित आहे.

### वाहनांच्या क्षमतेचा प्रश्न

२०१२ ते मार्च २०२३ मधील बहुतांश वाहने ई-१० साठी बनली आहेत, तर एप्रिल २०२३ नंतरच्या वाहनांचे भाग ई-२० ला पूरक आहेत; मात्र केवळ एप्रिल २०२५ नंतर विकली गेलेली वाहनेच पूर्णपणे ई-२० सक्षम आहेत. त्यामुळे २०२५ पूर्वीच्या मोठ्या वाहनसंख्येसाठी सध्याचे इंधन मिश्रण जोखमीचे ठरू शकते. शिवाय, पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलची ऊर्जा क्षमता कमी असल्याने वाहनाचे मायलेजही घटते. नीती आयोगाने ई-२० मुळे मायलेजमध्ये १-२ टक्क्यांची घसरण वर्तवली होती; पण प्रत्यक्षात मात्र मायलेज ५ ते १२ टक्क्यांपर्यंत कमी झाल्याच्या तक्रारी आहेत. अर्थात, जुन्या वाहनांचे मायलेज आणखी कमी आहे. इथेनॉल उशिरा पेटत असल्याने थंडीत गाड्या सुरू होण्यास अडचण येत आहे. ई-१० ते ई-२० पेक्षा ई-२० कडून ई-२५ कडे जाताना अडचणी जास्त वाढतील. दुसरे म्हणजे, पंपांवर ई-१०, ई-२० किंवा शुद्ध पेट्रोल निवडण्याची सोय नसल्याने नुकसानीचा भार वाहनधारकांवर पडतो. ई-२० पुन्हा बदलावे लागल्यास वाढीव खर्चाचा भार ग्राहकांवर पडू शकतो. त्यामुळे उत्पादकांनी धोरणात्मक स्पष्टता, देशभरात समान इंधन मानके आणि तेल कंपन्यांशी समन्वयाची मागणी केली आहे. कारण, एकाच वेळी अनेक प्रकारचे इंधन पुरवणे कंपन्यांना कठीण जाते. ऊस उत्पादक राज्यांमधील राजकीय पैलू लक्षात घेता, वाहन उद्योग आणि साखर लॉबीने हे मिश्रण टप्प्याटप्प्याने वाढवण्याची मागणी केली आहे. नीती आयोगाच्या मार्गदर्शक समितीनुसार, प्रत्येक नवीन मिश्रणासाठी इंजिनमध्ये वारंवार बदल करण्यापेक्षा, थेट ई-२० आणि त्याहून अधिक मिश्रणावर चालणाऱ्या फ्लेक्स इंधन वाहनांनाच प्रोत्साहन देणे अधिक सोयीचे ठरेल.

### अधिक इथेनॉल का?

तेल आयातीचा खर्च कमी करण्यासाठी देशातच तयार होणारे इथेनॉल हा एक उत्तम पर्याय मानला जातो. दुसरे कारण शेतीशी जोडलेले असून महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशमधील शेतकरी संघटनांनी यासाठी खूप दबाव आणले आहे. इथेनॉलची मागणी वाढल्याने ऊस व इतर पिकांसाठी मोठी बाजारपेठ मिळते. यामुळे शेतीतील अतिरिक्त उत्पादनाचा वापर होतो आणि कारखान्यांची उत्पादन क्षमताही पूर्णपणे उपयोगात आणता येते.

### ब्राझीलचे उदाहरण

सुसंघटित आणि परिपक्व ऊस इथेनॉल उद्योगाच्या जोरावर ब्राझील अनेक दशकांपासून २७ ते ३० टक्के मिश्रणाचे यशस्वी जागतिक मॉडेल ठरला आहे. १९७० च्या तेल संकटानंतर सुरू झालेल्या या प्रवासात ब्राझीलने देशव्यापी पायाभूत सुविधा, फ्लेक्स इंधन वाहने आणि मोठी ग्राहक जागृती केली. आज तिथे नवीन कार विक्रीत फ्लेक्स वाहनांचा वाटा ९० टक्क्यांपेक्षा जास्त असून ग्राहकांना विविध इथेनॉल मिश्रणांमधून निवडीचे स्वातंत्र्य उपलब्ध आहे. ही निवडच ब्राझीलच्या यशाचा पाया आहे. ब्राझीलने हे धोरण जुन्या वाहनधारकांचे नुकसान टाळत टप्प्याटप्प्याने राबवले. भारतालाही उच्च मिश्रणासाठी लोकांचा पाठिंबा हवा असल्यास हाच धडा गिरवावा लागेल. इतरत्र मक्यापासून उत्पादनाद्वारे अमेरिकेने देशव्यापी ई-१० मिश्रणाचा कार्यक्रम उभारला आहे. फिलिपिन्समध्ये २०१२ पासून ई-१० अनिवार्य आहे, तर व्हिएतनामने जून २०२६ पासून देशव्यापी ई-१० अंमलात आणले. ग्राहकांना निवडीचे स्वातंत्र्य, अनुकूल किंमत धोरणे, फ्लेक्स फ्युएल वाहनांचा प्रसार, पायाभूत सुविधांमध्ये वाढ आणि टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी यांची परिणामकारक सांगड घालण्यात भारताचे यश दडलेले आहे.

**हर्ष काबरा**

## केरळचा विकास, महाराष्ट्रासाठी आरसा

**ए**डप्पळ हे छोटे शहर वट्टमकुळम गावापासून दोन किलोमीटरवर आहे. शहराची लोकसंख्या पन्नास हजार असावी. या शहरातील रेस्टॉरंट, बाजारपेठ, मॉल्स पाहून थक्क झालो. अनेक आंतरराष्ट्रीय ब्रँड्स तिथल्या बाजारपेठेत आहेत. Van Hussain, Zara, Crocks, इत्यादी.

सुकवलेले अननस, किवी, आंबे, सफरचंद, केळी, प्लम, अंजीर, अशी अनेक फळे, त्याशिवाय सुकवलेल्या - खारवलेल्या भाज्या आणि सुकामेवा यासाठी या मॉलमध्ये एक स्वतंत्र विभाग आहे. तयार खाद्यपदार्थांसाठी एक स्वतंत्र विभाग आहे. गावागावात उत्तम बेकऱ्या आहेत. पाच रुपयाला एक कच्ची चपाती. दहा चपात्यांचे एक पाकीट पन्नास रुपयांना. तिथे कोणीही घरी चपाती करत नाही. ही कच्ची चपाती तव्यावर टम्म फुगते. चर्चगेटच्या स्टार बाझार मध्येही एवढी विविधता नाही.

फणसाचे तळलेले गरे शंभर रुपयाला २५० ग्रॅम. पापडाची एक पिशवी (५०) केवळ शंभर रुपयाला. अंडी डबल पॅकिंगमध्ये असतात. एक अंडे सात रुपये. डुक्कर, बैल, रेडा, ससा, बोकड, कोंबडी यांचें मांस आणि मासे अतिशय स्वच्छ आणि नेटकेपणे मांडलेले. रस्त्यावरही या छोट्याशा शहरात खास महिलांसाठी जिम आहेत.

बेघर, भुके कंगाल लोक केरळमध्ये मला दिसले नाहीत. गुरुवायूर मंदिर परिसरात हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच भिकारी दिसले. एम टी वासुदेवन नायर या लेखकाच्या कादंबरीवर चित्रपट काढण्याचे हक्क एका निर्मात्याने विकत घेतले. दोन वर्षांत त्या चित्रपटाची निर्मिती झाली नाही म्हणून लेखक सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला. स्वामित्व हक्कापोटी मिळालेले १ कोटी २५ लाख रुपये लेखकाने निर्मात्याला परत केले आणि चित्रपट निर्मितीचे हक्क आपल्याकडे घेतले. केरळची अर्थव्यवस्था उत्तम आहे.

महाराष्ट्राला शिवकाळाचे फाजील आणि दिखाऊ आकर्षण आहे. फुले - शाहू - आंबेडकर यांच्याबाबतीत हेच आहे. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हा खेळ गेल्या शतकापासून सुरू आहे. दोन्ही फळ्यातल्या लेखकांना एम. टी. वासुदेवन नायर यांच्या एवढी स्वामित्व हक्काची रक्कम पुढच्या शतकातही मिळणार नाही.

केरळ मध्ये सरासरी कुटुंबाचा मासिक खर्च रु. ७२१९ आहे, म्हणजे महाराष्ट्राच्या पेक्षा १७० टक्के जास्त आहे. केरळ मधील तळाच्या २५ टक्के कुटुंबांचा खर्च महाराष्ट्रातील ७० टक्के कुटुंबापेक्षा अधिक आहे . ही आकडेवारी भारत सरकारच्या नॅशनल सँपल सर्वे ऑर्गनायझेशनची. २०२२ - २३ महाराष्ट्रातले मतदार कमालीचे लाचार आहेत. सामंतशाही मानसिकता आहे त्यांची. त्यामुळे आमदार असोत की खासदार सहजपणे पक्षांतर करतात. पन्नास कोटी कोण कशासाठी मोजेल त्यांना? कारण मतदार त्यांना पुन्हा निवडून देतातच. आपला मतदारसंघ आणि राज्य दरिद्री ठेवण्यातच त्यांचे हितसंबंध असतात, तेच त्यांचे राजकारण असते.

**-सुनील तांबे,** केरळ

## महिलांच्या श्रमाला प्रतिष्ठा देण्याचा निर्धार

अलीकडेच संयुक्त राष्ट्रसंघाने २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारदेखील महिला शेतकरी सशक्तीकरण विधेयक मंजुरीसाठी आणण्याच्या तयारीत आहे. ग्रामीण भारतातील जवळपास ऐंशी टक्के महिला ह्या शेती उद्योगाशी जोडलेल्या आहेत. पेरणीपासून कापणीपर्यंत आणि पशुपालनापासून ते धान्य प्रक्रियेपर्यंत बहुतेक शेती कामांमध्ये महिलांचे योगदान विसरता येणार नाही. परंतु असे असूनदेखील महिलांच्या नावावर देशातील केवळ १२.८ टक्के शेतजमीन आहे. त्यामुळे शेती करणारी आणि शेतकरी यांच्यातील दरी अद्यापही कायम आहे. जमिनीची मालकी नसल्यामुळे महिलांना कर्ज, विमा, पीक नुकसानीची भरपाई आणि इतर अनेक सरकारी योजनांचा लाभ थेटपणे घेता येत नाही. महिला शेतकऱ्यांच्या श्रमांची नोंद आहे. मात्र, त्यांच्या हक्कांची दखल घेतली जात नाही.

आजच्या आधुनिक काळातदेखील भारतासारख्या पुरुषप्रधान समाजामध्ये शेतकरी म्हटले की आपल्यापुढे नांगरधारी पुरुष शेतकऱ्याचे चित्र डोळ्यापुढे उभे राहाते. आणि ही प्रतिमा सर्वसामान्यांच्या मनामध्ये खोलवर रुजली आहे. परिणामी शेतामध्ये अहोरात्र राबणाऱ्या स्त्रियांना शेतकरी म्हणायला आणि मानायला आपण विसरतो. तिची ओळख ही केवळ एक स्त्री शेतमजूर किंवा कुटुंबातील मदतनीस इतकीच राहिली आहे.

मानववंश शास्त्रानुसार जगामध्ये पहिली शेती स्त्रियांनी केल्याचा पुरावा मिळतो. मात्र, पुढील काळात पुरुषांनी शेती ही आपली मक्तेदारी बनवली आहे. कृषी संस्कृतीची आद्यमाता असलेल्या स्त्रियांना आतातरी शेतकरी म्हणून सन्मान मिळायला पाहिजे. मागील दहा वर्षात शेतात राबणाऱ्या महिलांची संख्या दुपटीने वाढली आहे. देशभरात कर्जबाजारीमुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांमध्ये बहुसंख्येने पुरुष शेतकरीच आढळले आहेत. महिला शेतकरी आत्महत्येचा मार्ग न पत्करता जीवघेण्या संघर्षाला सामोऱ्या जाण्यासाठी ओळखल्या जातात. देशातील स्त्रिया आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाल्या तर घर, कुटुंब आणि समाज समृद्ध होण्यास वेळ लागणार नाही. कबाडकष्टासाठी कायम तयार असणाऱ्या महिला शेतकऱ्यांवर समाजाने आणि सरकारनेदेखील विश्वास दाखवायला पाहिजे. आणि हे चित्र बदलण्यासाठी विधेयक पुरेसे ठरणार नाही. कायदा होणे आणि तो प्रभावीपणे राबवला जाणे यामध्ये खूप मोठे अंतर असते.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर

## पश्चिम घाटाचे संरक्षण काळाची गरज

निसर्गाने भारताला दिलेली अफाट आणि अनुपमेय देणगी म्हणजे पश्चिम घाट (सह्याद्री पर्वतरांगा)! हा केवळ पर्वतांचा समूह नसून भारताच्या हवामानाचा, जलचक्राचा आणि कोट्यावधी जीव जंतूंच्या अस्तित्वाचा मुख्य कणा आहे. अशा या अतिशय संवेदनशील क्षेत्राचे रक्षण करण्यासाठी केंद्र शासनाने आता गुजरात, महाराष्ट्र आणि गोवा या तीन राज्यांच्या मर्यादित येणारा पश्चिम घाटातील भाग पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र( इको सेन्सिटिव्ह झोन) म्हणून घोषणा करण्याची तयारी चालू केली आहे. भारताच्या अवकाश संशोधन संस्थेचे (इस्त्रोचे) माजी प्रमुख डॉक्टर के.कस्तुरीरंगन यांनी जवळपास बारा वर्षांपूर्वी सादर केलेल्या अहवालावर धुलिकण साचू दिल्यानंतर आता कुठे सरकारला जाग आली आहे असेच म्हणावे लागेल. सहा राज्यांमध्ये पसरलेल्या या निसर्गवैभवातील केवळ तीन राज्यांपूर्तीची ही प्रक्रिया मर्यादित ठेवण्याची वेळ येणे यातच राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि निसर्गाप्रती असलेली अनास्था दिसून येते.

**लीना गाडगीळ**

## वैभव सूर्यवंशीचे ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय पदार्पण!

इंग्लंडविरुद्धच्या मँचेस्टर येथील ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर पार पडलेल्या दुसऱ्या टी-२० क्रिकेट सामन्यात भारताच्या वैभव सूर्यवंशी या अवघ्या १५ वर्षे आणि ९९ दिवस वयाच्या मुलाने भारतीय संघाकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ऐतिहासिक पदार्पण केले आणि पाकिस्तानच्या हसन रझानंतर (वय १४ वर्षे २२७ दिवस) राष्ट्रीय संघात पदार्पण करणारा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील तो केवळ दुसराच खेळाडू ठरला. त्याचबरोबर त्याने भारताच्या सचिन तेंडुलकर (१६ वर्षे २०५ दिवस), पीयूष चावला (१७ वर्षे ७५ दिवस), एल. शिवरामकृष्णन (१७ वर्षे ११८ दिवस), पार्थिव पटेल (१७ वर्षे १५२ दिवस), मनिंदर सिंग (१७ वर्षे १९३ दिवस), हरभजन सिंग (१७ वर्षे २८८ दिवस) , लक्ष्मी रतन शुक्ल (१७ वर्षे ३२० दिवस) आणि चेतन शर्मा (१७ वर्षे ३३८ दिवस) या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पदार्पणाच्या बाबतीत मागे टाकले. खरे तर तर जागतिक क्रिकेटमध्ये इतक्या निष्पाप आणि लहान वयात मुख्य राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व करण्याचे भाग्य फार कमी खेळाडूंच्या वाट्याला आले आहे. कारण आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळाडूंची मानसिक आणि शारीरिक क्षमता पणाला लागते. अशावेळी वैभव सूर्यवंशी या केवळ १५ वर्षांच्या मुलाने जगातील सर्वोत्तम गोलंदाजांचा निर्भयतेने सामना करणे हे त्याच्या अफाट प्रतिभेची साक्ष देते. वैभव सूर्यवंशीचे हे यशस्वी पदार्पण आपल्या क्रिकेटवेड्या देशातील लाखो उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणा देईल यात शंका नाही.

**-प्रदीप मोरे**

## हिंदुत्व हे अंतःकरणापासून श्रद्धेपर्यंत

समाजात एक नवा प्रवाह पाहायला मिळत आहे, ज्याला 'नास्तिक हिंदुत्ववादी' किंवा 'नवहिंदुत्ववादी' म्हटले आहे. ही अशी माणसे आहेत जी कपाळावर टिळा लावतात, गळ्यात रुद्राक्ष घालतात आणि 'जय श्रीराम'च्या घोषणाही देतात; परंतु त्यांच्या मनात देव, धर्म, कर्म किंवा पुनर्जन्म यांवर कोणतीही खरी श्रद्धा नसते. त्यांच्यासाठी हिंदुत्व म्हणजे केवळ एक 'लाईफस्टाईल' (जीवनपद्धती) किंवा बाह्य प्रदर्शन बनले आहे.धर्माची खरी व्याख्या ही केवळ सण-वार किंवा खाण्यापिण्यापुरती मर्यादित नाही. जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज किंवा हरिहर आणि बुक्क यांनी संघर्ष केला, तेव्हा त्यांच्या पाठीशी हिंदू धर्माची आणि ईश्वरावरील अढळ श्रद्धेची खरी ताकद होती. निव्वळ घोषणाबाजी करून किंवा सोशल मीडियावर 'महाकाल भक्त' लिहून खरी श्रद्धा निर्माण होत नाही. मनात खरी भक्ती नसेल, तर ते केवळ एक रिकामे प्रदर्शन ठरते.धर्माचे आणि हिंदुत्वाचे खरे सामर्थ्य हे केवळ बाह्य दाखवण्यात, घोषणा देण्यात किंवा कपड्यांमध्ये नसून ते माणसाच्या अंतःकरणातील अढळ श्रद्धेमध्ये असते. जोपर्यंत मनात ईश्वराबद्दल आणि मूल्यांबद्दल खरी निष्ठा व आदर असत नाही, तोपर्यंत केलेले कोणतेही प्रदर्शन निरर्थक आहे. खरी श्रद्धाच माणसाला आणि समाजाला कठीण काळात टिकवून ठेवते.

**-आल्हाद माळगांवकर**

सोमवार, दि. ६ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# पुसदच्या विकासासाठी आता निर्णायक लढा उभारणार..!

## ५७ वर्षांनंतरही मूलभूत प्रश्न कायम – निरंजन नाईक"

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ५ : पुसद तालुक्याचा सर्वांगीण विकास अद्यापही कागदावरच असून, रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य आणि शिक्षण यांसारखे मूलभूत प्रश्न गेल्या सहा दशकांनंतरही कायम आहेत. त्यामुळे आता विकासासाठी निर्णायक भूमिका घेण्याची वेळ आली असल्याचे मत निरंजन नाईक यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.**



"गेल्या ५७ वर्षांपासून सत्ता असूनही जनतेच्या मूलभूत समस्या सुटत नसतील, तर पुढील भूमिका ठरवावी लागेल," असे सांगत त्यांनी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर अप्रत्यक्षपणे टीका केली. "डॉक्टरांना डोळे दाखवले, पण पुसदचे रस्तेच दिसले नाहीत," असा टोला त्यांनी लगावला. दोन वर्षांपूर्वी आदित्य जाधव यांनी ग्रामीण भागातील समस्यांबाबत व्हिडिओ दाखविल्यानंतर आपण मीना नाईक यांच्यासह शेंबाळपिंपरी, बेलोरा, काळी दौलतखान परिसरातील सुमारे २५ गावांचा दौरा केला. या दौऱ्यात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई, खडतर रस्ते, महिलांसाठी शौचालयांचा अभाव, दुर्लक्षित प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाड्यांची दयनीय अवस्था प्रत्यक्ष पाहिल्याचे त्यांनी सांगितले. कुटुंबात कोणतेही मतभेद नसल्याचे स्पष्ट करत, आपला संघर्ष हा सर्वसामान्य, दुर्बल आणि गोरगरीब नागरिकांच्या न्यायासाठी असल्याचे नाईक यांनी नमूद केले. माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या कार्याचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, त्यांनी कधीही व्यक्तिगत राजकारण केले नाही; महाराष्ट्र आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी आयुष्य समर्पित केले. त्यामुळेच जनतेने त्यांना सलग ११ वर्षे मुख्यमंत्रीपदाची संधी दिली. आजही पुसदचा अपेक्षित विकास झालेला नाही. त्यामुळे केवळ वसंतराव नाईक यांचे नाव राजकीय फायद्यासाठी वापरण्याचा अधिकार कोणालाही नसल्याचा आरोप त्यांनी केला. पुसदची जनता त्यांना दैवत मानते आणि त्या भावनेचा गैरवापर होत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. प्रशासनाला वारंवार सूचना करूनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्यामुळे कामचुकार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मंत्री गिरीश महाजन यांना निवेदन दिल्याची माहितीही त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# ढाणकीत टेम्पोतून तलवार घेऊन फिरणारा युवक एलसीबीच्या जाळ्यात..!

## टेम्पोसह २.०१ लाखांचा मुद्देमाल जप्त, आर्म्स ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ५ :** यवतमाळ जिल्ह्यात अवैध शस्त्रे व गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) सुरू केलेल्या विशेष मोहिमेत आणखी एक यश मिळाले आहे. बिटरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ढाणकी येथे टाटा ४०७ टेम्पोत धारदार तलवार घेऊन फिरणाऱ्या एका युवकाला ताब्यात घेत पोलिसांनी तलवार व टेम्पोसह २ लाख १ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात अवैध धंदे, अवैध शस्त्रसाठा व गुन्हेगारी प्रवृत्तीवर कठोर कारवाई सुरू आहे. त्यानुसार पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ५ जुलै रोजी उमरखेड उपविभागात दरोडा प्रतिबंधक रात्रगस्त करत होते. दरम्यान, रामप्रसाद आईनाथ गोपेवाड (वय २१, रा. हरदडा फाटा, ता. उमरखेड) हा विना क्रमांकाच्या टाटा ४०७ टेम्पोत धारदार तलवार घेऊन ढाणकीकडे जात असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार मौजे ढाणकी येथील सोईट फाट्यावर सापळा रचण्यात आला.



संशयित टेम्पो थांबवून झडती घेतली असता, चालकाच्या केबिनमध्ये एक धारदार लोखंडी तलवार आढळून आली. पोलिसांनी तलवार व टेम्पो असा एकूण २.०१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरुद्ध आर्म्स ॲक्ट कलम ४ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपासासाठी त्याला बिटरगाव पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक धीरज बांडे, पोउपनि अमोल राठोड तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# महावीर नगर मध्ये घाणीचे साम्राज्य, फुटलेल्या नाल्यांमुळे नागरिक त्रस्त

## संबंधित विभागाचे दुर्लक्ष,स्थानिक रहिवाशी आंदोलनाच्या पवित्र्यात.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ५ :** शहरातील महावीर नगर परिसरात फुटलेल्या व जीर्ण अवस्थेतील नाल्यांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून संपूर्ण परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. या गंभीर समस्येकडे वारंवार वृत्तपत्राच्या माध्यमातून तथा तक्रारीतून लक्ष वेधूनही नगर परिषद प्रशासनाकडून जाग येत नाही व कोणतीही ठोस उपाययोजना होत नसल्याने परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



अखेर रहिवासी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना तोंडी सूचना व चर्चा करून पावसाळ्यापूर्वी नाल्यांचे बांधकाम न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला होता परंतू अद्याप कोणत्याही प्रकारे कामाची सुरुवात करण्यात आलेली नाही. महावीर नगर परिसरातील अनेक नाल्या फुटलेल्या अवस्थेत असून काही ठिकाणी पूर्णपणे जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे सांडपाणी योग्य प्रकारे वाहून जात नसून रस्त्यावर व घरासमोर मोठ्या प्रमाणात साचत आहे. या साचलेल्या घाणीमुळे दुर्गंधी पसरली असून डासांचे प्रमाण वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, अनेक घरांच्या बाथरूममध्ये नाल्यांमधील घान पाणी उलट्या प्रवाहाने शिरत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे जेष्ठ नागरिका पासून लहान मुलांपर्यंत सर्वांचे आरोग्य खराब झाले असून संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला आहे.

नागरिकांना दररोज घाणीच्या विळख्यात जीवन जगावे लागत असल्याने प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. परिसरातील रहिवाशांनी यापूर्वीही नगर परिषदेकडे तसेच आरोग्य विभागाला प्रत्यक्षातील घाणीचे साम्राज्य दिसत नाही का, असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. आरोग्य विभाग व बांधकाम विभागाकडे अनेक वेळा तक्रारी केल्या होत्या. तक्रारीनंतर सुमारे महिनाभरापूर्वी नगर परिषदेचे कर्मचारी पाहणीसाठी आले होते. त्यावेळी नालीचे काम तात्काळ करण्यात येईल,असे आश्वासन नागरिकांना देण्यात आले होते. मात्र आजपर्यंत प्रत्यक्षात कोणतेही काम सुरू झाले नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# अल्पवयीन विवाहितेच्या सामूहिक अत्याचार प्रकरणात कारवाईला विलंब..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

### कळंब–राळेगावमध्ये मुलींच्या विक्रीचे रॅकेट?

**या प्रकरणामुळे कळंब व राळेगाव तालुक्यात अल्पवयीन मुलींना फूस लावून त्यांचे विवाह लावून देण्याच्या नावाखाली आर्थिक व्यवहार होत असल्याची गंभीर बाब पुन्हा चर्चेत आली आहे. मध्यस्थांकडून गरीब व अशिक्षित कुटुंबांना पैशाचे आमिष दाखवून मुलींची विक्री केली जात असल्याचा आरोप होत असून, या संपूर्ण साखळीचा सखोल तपास करून रॅकेटचा पर्दाफाश करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.**

**कळंब, दि. ५ :** गरिबी आणि अशिक्षितपणाचा गैरफायदा घेत अल्पवयीन मुलींची दलालां मार्फत विक्री करून त्यांचे जबरदस्तीने विवाह लावून दिले जात असल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. अशाच एका प्रकरणात अल्पवयीन विवाहितेला अहिल्यानगर जिल्ह्यात नेल्यानंतर पती, सासरा व दीर यांनी डांबून ठेवत तिच्यावर सामूहिक अत्याचार केल्याची तक्रार आहे. या गंभीर गुन्ह्यात गुन्हा दाखल होऊनही आरोपींना अद्याप अटक न झाल्याने पीडित कुटुंबाने यवतमाळचे जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांची भेट घेऊन तातडीने न्यायाची मागणी केली.

पीडितेच्या तक्रारीनुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील बेलगाव घुमरी येथे तिच्यावर अत्याचार करण्यात आला. याप्रकरणी १२ जून २०२६ रोजी वडगाव (जंगल) पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर प्रकरण पुढील तपासासाठी मिरजगाव पोलिसांकडे वर्ग करण्यात आले. या गुन्ह्यात गणेश गाडे, बबन गाडे, पिनू गुरुजी, सुखदेव देवतळे तसेच जोडमोहा येथील एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. मात्र अनेक दिवस उलटूनही आरोपींना अटक न झाल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दरम्यान, जबाब नोंदवण्यासाठी मिरजगाव पोलिसांनी पीडित मुलगी व तिच्या आईला अहिल्यानगर येथे बोलावले होते. मात्र अत्यंत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना प्रवास करणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांनी शनिवारी जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांची भेट घेऊन संपूर्ण घटनाक्रम मांडला. त्यानंतर एसपींनी अहिल्यानगर पोलिस अधीक्षकांशी संपर्क साधून प्रकरणाची गंभीर दखल घेतली. आता अहिल्यानगर पोलिसांचे पथक यवतमाळात येऊन पीडितेसह संबंधितांचे जबाब नोंदवणार असल्याची माहिती मिळाली आहे. पुढील दोन दिवसांत पथक न आल्यास यवतमाळ पोलिसांच्या मदतीने पीडितेला अहिल्यानगर येथे नेण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

## थोडक्यात



### सहकार सप्ताहानिमित्त रक्तदान, वृक्षारोपण व विविध उपक्रम उत्साहात

**पुसद येथे सहकार विभागाच्या वतीने सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन**

**पुसद :** भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या निर्देशानुसार २९ जून ते ६ जुलै २०२६ या कालावधीत साजऱ्या होत असलेल्या सहकार सप्ताहानिमित्त सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुसद कार्यालयाच्या वतीने रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, चर्चासत्र तसेच विविध सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत रक्तदान शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण करण्यात आले, तर सहकार चळवळीचे महत्त्व, सहकारी संस्थांची भूमिका आणि शासनाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन करणारे चर्चासत्रही आयोजित करण्यात आले.याशिवाय स्वच्छता अभियान, जनजागृती उपक्रम तसेच सामाजिक उत्तरदायित्व जपणाऱ्या विविध कार्यक्रमांद्वारे सहकार सप्ताह साजरा करण्यात आला. या उपक्रमांमुळे सहकार चळवळीबाबत जनजागृती होण्यास मदत झाली असून, नागरिकांनीही या कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदविला. यावेळी सहकार विभागातील अधिकारी, कर्मचारी, सहकारी संस्थांचे पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### हरित क्रांतीच्या विचारांचा विद्यार्थ्यांना वारसा..!

**अरुणोदय विद्यालयात स्व. वसंतराव नाईक जयंती उत्साहात**

**दिग्रस :** तालुक्यातील लाख (रा.) येथील अरुणोदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व हरित क्रांतीचे प्रणेते स्व. वसंतरावजी नाईक यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना कृषी, शिक्षण आणि ग्रामीण विकासाच्या विचारांची प्रेरणा देण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात स्व. वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधीर काळबोंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्व. नाईक यांनी कृषी क्षेत्रात घडविलेल्या ऐतिहासिक बदलांचा, शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेल्या प्रयत्नांचा तसेच ग्रामीण विकासातील योगदानाचा आढावा घेतला. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहिताची जाणीव ठेवत कर्तृत्ववान नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी शिक्षकांनीही स्व. वसंतरावजी नाईक यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी घोषवाक्ये, मनोगते आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून जयंती कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व संचालन विद्यालयाच्या शिक्षकांनी केले.

# पुढील आठवड्यापासून शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ..!

**यवतमाळ, दि. ५ :** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना पुढील आठवड्यापासून प्रत्यक्ष कर्ज मुक्तीचा लाभ मिळण्यास सुरुवात होणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून, लाभ वितरणासाठी शासन यंत्रणा सज्ज झाली आहे. राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी 'महाकर्जमुक्ती योजना' म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे.

विविध बँकांकडून प्राप्त झालेल्या पात्र कर्ज दारांची माहिती, ई-केवायसी, आधार पडताळणी आणि खात्यांची अंतिम छाननी यासह सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्णत्वास येत आहेत. संबंधित विभाग, बँका आणि जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय साधून लाभ वितरणाची तयारी वेगाने सुरू आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांमध्ये थेट कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यास सुरुवात केली जाणार आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या योजनेमुळे राष्ट्रीयकृत, खाजगी, प्रादेशिक ग्रामीण तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इ. कडून घेतलेल्या पात्र पीक कर्ज धारकांना लाभ मिळणार आहे. शासनाने शेतकऱ्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, ई-केवायसी आणि बँक खात्याची माहिती अद्ययावत करण्याचे आवाहन केले आहे. पात्रते बाबत किंवा कर्जमुक्ती प्रक्रियेविषयी कोणतीही अडचण असल्यास संबंधित बँक शाखा अथवा कृषी विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि प्रभावीपणे होण्यासाठी राज्य शासनाने तक्रार निवारणाची सक्षम व्यवस्था उभारली आहे. कर्ज खात्याची माहिती, आधार संलग्नता, बँक तपशील किंवा लाभार्थी पात्रते संदर्भात कोणतीही तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचण उद्भवल्यास शेतकऱ्यांना तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमरखेड शहराध्यक्षपदी दामोधर इंगोले..!

## युवा नेतृत्वावर पक्षाची मोठी जबाबदारी



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ५ :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने संघटन विस्ताराला गती देत युवा व सक्रिय कार्यकर्ते दामोधर शामराव इंगोले यांची उमरखेड शहराध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मान्यतेने ही नियुक्ती करण्यात आली असून, यवतमाळ जिल्हाध्यक्ष बाळासाहेब जयवंतराव पाटील (कामारकर) यांनी ४ जुलै रोजी नियुक्तीपत्र प्रदान केले. इंगोले यांच्या नियुक्तीमुळे शहरातील पक्ष संघटनेला नवसंजीवनी मिळेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. शहरात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, युवक व महिलांना पक्षाशी जोडणे, सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविणे आणि पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविणे, ही त्यांच्या समोरील प्रमुख आव्हाने असणार आहेत. नियुक्तीनंतर इंगोले यांनी पक्ष नेतृत्वाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत जनसामान्यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करणार असून, शहरात पक्ष अधिक सक्षम करण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याची भूमिका व्यक्त केली.

# यवतमाळात महाज्योती, बार्टीसाठी 'भीक मांगो' आंदोलन

## महाज्योती, बार्टीसाठी निधी नसल्याने ओबीसी संघर्ष समिती आक्रमक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ५ :** महाज्योती, बार्टी, टीआरटीआय आणि सारथी यांसारख्या बहुजन व वंचित घटकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या शैक्षणिक संस्था चालवण्यासाठी सरकारकडे निधीच उपलब्ध नसल्याचा आरोप करत 'ओबीसी संघर्ष समिती' कमालीची आक्रमक झाली आहे. सरकारने ओबीसी विद्यार्थ्यांची प्रशिक्षणार्थी संख्याही मोठ्या प्रमाणावर कपात केल्याने, या अन्यायाविरोधात समितीने राज्यव्यापी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

"सरकारजवळ पैसा नाही, तर आम्ही भीक मागून देऊ," असा संतप्त पवित्रा घेत ओबीसी संघर्ष समितीद्वारे उद्या, सोमवार दिनांक ६ जुलै २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'भीक मांगो आंदोलन' करण्यात येणार आहे. या आंदोलनातून गोळा होणारी रक्कम थेट मुख्यमंत्र्यांकडे पाठवली जाणार आहे.

समितीचे आवाहन

ओबीसी, बहुजन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आणणाऱ्या या सरकारी धोरणाचा निषेध करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी उद्या दुपारच्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्मशानभुमीच्या जमिनीवर अतिक्रमण करून केली पेरणी

## कोनदरी येथील गंभीर प्रकार,कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे

**महागाव, दि. ५ :** स्मशानभूमीच्या जमिनीवर मशागत करून बियाणे पेरणी केल्याचा गंभीर प्रकार कोनदरी येथे उघडकीस आला असुन अतिक्रमण करणाऱ्या इसमावर कारवाई करण्याची मागणी सरपंच रविंद्र पवार यांनी तहसीलदारांकडे केली आहे. महागाव तालुक्यातील कोंनदरी गावालगत सार्वजनिक स्मशानभुमीसाठी शेत सर्व्हे नंबर ११६भोगवटदार २ शासकीय फ वर्गातून ही जामीन हस्तांतरित करण्यात आली होती. या जमिनीवर स्मशानभूमीचे दहनशेड उभारण्यात येवुन नागरिकांच्या सोयीसाठी बसण्यासाठी बेंचची सुद्धा व्यवस्था कार्यात करण्यात आली तसेच विविध योजनेच्या माध्यमातून वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करण्यात आले परंतु गावातील शंकर सवाई राठोड या इसमाने कोणतीही परवानगी न घेता मनमानी करीत जबरदस्तीने जमिनीची मशागत करून त्यामध्ये तुर पिकाची पेरणी करून सर्व जमिनीला संरक्षणासाठी लोखंडी एंगल उभारून जाळी लावुन त्याला विद्युत प्रवाह जोडला आहे. गावात एखादी अनुचित घटना घडून एखाद्या नागरिकाचा मृत्यू झाल्यास त्याच्यावर अंत्यसंस्कार कोठे करायचे? हा मोठा प्रश्न गावकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. त्यामुळे राठोड यांच्या या दादागिरी करून शासकीय जमिनीवर अतिक्रमण करण्याच्या गंभीर प्रकारामुळे गावात संतापाचे वातावरण निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.त्यामुळे गावात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी स्मशानभूमीच्या जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या शंकर राठोड यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येवुन अतिक्रमण मुक्त करण्यात यावे अशी मागणी सरपंच तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रविंद्र पवार यांनी तहसीलदार यांच्याकडे केली आहे. तहसीलदार या गंभीर प्रकारावर काय कारवाई करतात याकडे संपुर्ण गावाचे लक्ष लागले आहे.



**गंभीर प्रकाराची प्रशासनाने दखल घेऊन योग्य कारवाई करावी**

**स्मशानभुमीच्या जागेवर अतिक्रमण करून पेरणी करण्याचा प्रकार गंभीर असुन यामुळे गावाच्या शांततेला गालबोट लावण्याचा प्रयत्न केल्या जात आहे.त्यामुळे महसूल व पोलिस प्रशासनाने या गंभीर प्रकाराची तत्काळ दखल घेऊन संबंधित व्यक्तीवर योग्य ती कायदेशीर कारवाई करून गावात शांतता अबाधित राखावी.**

**- रविंद्र पवार (सरपंच कोनदरी तथा सभापती बाजार समिती महागाव)**

# तराश मध्ये चमकले उमरखेड चे विद्यार्थी

## जेईई , नीट ची पूर्व तयारी मिळणार मोफत, महात्मा फुले शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ५ :** माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमामध्ये प्रथम क्रमांक पटकावीत तब्बल अकरा लाख रुपयाचे बक्षीस घेणारी शाळा शिवाय एन एम एम एस परीक्षेत जिल्ह्यात प्रथम येणाऱ्या शहरातील महात्मा फुले शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड आयोजित परीक्षेमध्ये या शाळेच्या दोन विद्यार्थ्यांनी दैदीप्यमान यश प्राप्त केले.टॅलेंट ॲम्पिफिकेशन ऑफ रुरल युथ स्किल हंट म्हणजेच तराश या संघटने अंतर्गत वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड म्हणजेच डब्ल्यूसीएल कंपनीने सीएसआर अंतर्गत इयत्ता दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता परीक्षा आयोजित केली होती यामध्ये महात्मा फुले विद्यालयाची दुर्गेश्वरी संतोष जाधव व गोविंदराज नलावडे या दोन विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले सदर परीक्षेत एक हजार च्या वर विद्यार्थी बसले होते त्यामधून फक्त चाळीस पात्र विद्यार्थी निवडण्यात आले असून यापैकी वीस विद्यार्थी हे अभियंता विभागाकरीता आवश्यक असणारी जेइइ आणि वीस विद्यार्थी वैद्यकीय क्षेत्राकरिता आवश्यक असणारी नीट परीक्षा करिता पात्र ठरले आहेत सदर कंपनी या परीक्षेतील उत्तीर्ण चाळीस विद्यार्थ्यांचा इयत्ता अकरावी बारावीचा संपूर्ण शैक्षणिक खर्च तसेच जेइइ आणि नीट परीक्षेच्या तयारीसाठी लागणारा सर्व शैक्षणिक खर्च त्यांचा निवास भोजन खर्च व्यवस्था आणि एक हजार रुपये मासिक विद्या वेतन देखील देणार आहे कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत कॉर्पोरेट क्षेत्रातील सर्वच कंपन्यांना सामाजिक जबाबदारी अर्थात सी एस आर खर्च करावा लागतो याच सीएसआर माध्यमातून डब्ल्यू सी एल कंपनी द्वारा नागपूर चंद्रपूर यवतमाळ आणि मध्य प्रदेश मधील छिंदवाडा व बैतूल या जिल्ह्यांमध्ये परीक्षा आयोजित केली होती यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता यामध्ये महात्मा फुले विद्यालयच्या या दोन विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले यामुळे या विद्यार्थ्यांना वैद्यकीय आणि अभियांत्रिक शिक्षण घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर सचिव डॉक्टर यादव राऊत मुख्यध्यापक प्रमोद देशमुख पर्यवेक्षक राणे व सर्व शिक्षक वृंदांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले





**शैक्षणिक हब तयार करण्याकडे वाटचाल उमरखेड शहराची किंबहुना तालुक्याची ओळख ही शैक्षणिक हब म्हणून करण्याकडे वाटचाल सुरू असून या माध्यमातून विविध परीक्षा आयोजित करणे, क्रीडा शिक्षण आरोग्य या विषयांवर विद्यार्थ्यांचा अधिकाधिक विकास करणे हाच उद्देश ठेवून वाटचाल सुरू आहे**

**- राम देवसरकर**
**संस्थाअध्यक्ष महात्मा फुले विद्यालय**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# ऑनलाइन की ऑफलाइन? टीईटीच्या नव्या परीक्षेकडे लाखो उमेदवारांचे लक्ष

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षेच्या (टीईटी)पेपरफुटीनंतर आता पुन्हा परीक्षा घेताना ती संगणक आधारित पद्धतीने (ऑनलाइन) पद्धतीने आयोजित करण्याबाबत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून चाचपणी करण्यात येत आहे. परीक्षा ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष (ऑफलाइन) पद्धतीने घेण्याबाबतचा निर्णय अंतिम झाल्यानंतर नव्याने परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे, अशी माहिती परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिली.




सर्वोच्च न्यायालयाने सर्वच शिक्षकांना टीईटी पात्र होणे बंधनकारक असल्याचा निर्णय सप्टेंबर २०२५मध्ये दिला. तसेच टीईटी पात्र होण्यासाठी २०२८पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. राज्यात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे टीईटी परीक्षा आयोजित केली जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर टीईटी परीक्षेच्या नोंदणीमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येते. परीक्षा परिषदेने २८ जून रोजी राज्यात टीईटी परीक्षा आयोजित केली होती. या परीक्षेसाठी एकूण ६ लाख १२५ अर्ज दाखल झाले होते. त्यासाठी नोंदणी केलेल्या ४ लाख २८ हजार १२२ उमेदवारांमध्ये २ लाख २६ हजार २६३ कार्यरत शिक्षकांचा समावेश होता. परीक्षेत गैरप्रकार होऊ नयेत, या दृष्टीने काटेकोर उपाययोजनाही करण्यात आल्या होत्या. मात्र, २७ जून रोजी भिवंडी येथे टीईटीचे पेपर फुटल्याची घटना उघडकीस आली. वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेत (नीट) पेपरफुटीचे प्रकरण ताजे असतानाच टीईटीचे पेपर फुटल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली. टीईटीचा सुधारित दिनांक यथावकाश जाहीर करण्यात येणार असल्याचे परीक्षा परिषदेने स्पष्ट केले.

पेपरफुटीच्या अनुषंगाने विधिमंडळ अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्यात आला असता, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी पेपरफुटीमुळे रद्द झालेली टीईटी परीक्षा पुन्हा घेण्यात येणार असून, विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्व आकारले जाणार नाही; तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा विचार करण्यात येईल, असे स्पष्ट केले. पेपरफुटी प्रकरणातील दोषींना जास्तीत जास्त शिक्षा होण्यासाठी सरकार पूर्ण प्रयत्न करेल. परीक्षा पारदर्शक करण्यासाठी ठोस पावले उचलली जात आहेत, अशी माहिती त्यांनी विधिमंडळात दिली. या पार्श्वभूमीवर, आता राज्य परीक्षा परिषदेने पुन्हा टीईटी आयोजित करण्यासाठी काम सुरू केले आहे. टीईटी ऑनलाइन घेण्याच्या दृष्टीने चाचपणी करण्यात येत आहे. सर्वांत आधी परीक्षा ऑनलाइन घ्यायची, की प्रत्यक्ष (ऑफलाइन) हे निश्चित करण्यात येईल. त्यानंतर परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा परिषदेतील अधिकाऱ्यांनी दिली.

## भाजपच्या स्वयंघोषित नेत्यांचा धुमाकूळ

### मंत्र्यांचे नाते संबंध व मंत्र्यांचे फोटो दाखवून अधिकाऱ्यांवर दबाव

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी तालुक्यात सध्या भारतीय जनता पक्षाच्या (BJP) काही स्वयंघोषित नेत्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला आहे. पक्षाचे कोणतेही मोठे अधिकृत पद नसताना केवळ वरिष्ठ नेत्यांसोबतचे फोटो दाखवून अधिकारी-कर्मचाऱ्यांवर दबाव आणणे आणि मंत्रालयातून कामे करून देण्याच्या नावाखाली सर्वसामान्यांची आर्थिक फसवणूक करणे, असे प्रकार तालुक्यात उघडकीस येत आहेत. यामुळे पक्षाच्या मूळ प्रतिमेला धक्का पोहोचत असून, या तोतया नेत्यांचा वरिष्ठ पातळीवरून तातडीने बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यातील काही स्वयंघोषित नेत्यांचे स्वतःचे कोणतेही ठोस राजकीय अस्तित्व नाही. यातील बहुतांश जणांनी साधी स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूकही लढवलेली नाही. असे असतानाही, केवळ आपले खोटे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी हे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत विविध कार्यक्रमांत काढलेले फोटो आपल्या मोबाईलमध्ये ठेवतात. शासकीय कार्यालयांमध्ये गेल्यावर अधिकारी व कर्मचाऱ्यांना हे फोटो दाखवून, 'माझे मुख्यमंत्र्यांशी आणि महसूल मंत्र्यांशी थेट संबंध आहेत,' असे भासवून शासकीय कामांवर दबाव आणण्याचा प्रयत्न हे स्वयंघोषित नेते करत आहेत.

या स्वयंघोषित नेत्यांपैकी एका नेत्याने तर मर्यादा ओलांडली आहे. 'माजी मंत्री माझे जवळचे नातेवाईक आहेत, तर एका माजी मंत्र्यांचे विहीण-विहीण सध्या मंत्रिमंडळात मोठ्या पदावर आहेत,' अशी बतावणी या नेत्याने शहरात सुरू केली आहे. 'मी मुंबईतील मंत्रालयातून तुमचे कोणतेही काम सहज करून देतो,' असे आश्वासन देऊन हा नेता गरजू लोकांकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक देवाणघेवाण (पैसे) करत असल्याची जोरदार चर्चा सध्या शहरात रंगली आहे. हा स्वयंघोषित नेता मूळचा



अंजनगाव ग्रामीण भागातील रहिवासी असून, सध्या तो शहरात वास्तव्यास असल्याची खात्रीशीर माहिती समोर आली आहे.स्वतःचे राजकीय अस्तित्व नसताना पक्षाच्या नावाचा आणि वरिष्ठ नेत्यांच्या फोटोंचा गैरवापर करणाऱ्या या कंपूमुळे तालुक्यातील प्रामाणिक कार्यकर्ते आणि जनता कमालीची त्रस्त झाली आहे. अशा तोतया नेत्यांमुळे भाजप पक्षाची जनमानसातील प्रतिमा डागाळली जात आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेऊन, शासकीय अधिकाऱ्यांना धमकावणाऱ्या आणि मंत्रालयाच्या नावाखाली वसुली करणाऱ्या या स्वयंघोषित नेत्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी तीव्र मागणी आता सुजाण नागरिकांमधून व निष्ठावंत कार्यकर्त्यांमधून केली जात आहे.

## अमरावती ते पंढरपूर 'सायकल वारी'

**अमरावती-** पर्यावरण संवर्धन आणि आरोग्य यांचा भक्तीशी मेळ घालण्याच्या उद्देशाने अमरावती ते पंढरपूर अशी 'सायकल वारी' आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमासाठी ४१ सायकलपटू पूर्णपणे सज्ज आहेत. हा प्रवास ७ जुलै रोजी अमरावतीतून सुरू होईल आणि हा गट १२ जुलै रोजी पंढरपुरात पोहोचेल. तिथे ते '५ व्या अखिल महाराष्ट्र पंढरपूर सायकल वारी आणि परिषदे'त सहभागी होतील; या कार्यक्रमात राज्यभरातून ४,००० ते ५,००० सायकलपटूंचा सहभाग असणार आहे.

प्रा. लक्ष्मीकांत खंडागळे यांच्या नेतृत्वाखाली या वारीवर जाणाऱ्या सायकलपटूंच्या टीममध्ये प्रवीण खंडपासोले, राजेंद्र महाजन, सचिन पारेख, सुभाष गुप्ता, अर्चना मांगे, संतोष सरोदे, विजय महाल्ले आणि ॲड. यांचा समावेश आहे. या ग्रुपमध्ये सुषमा जोशी, आनंद वानखडे, दिव्या मेश्राम, धनराज मेश्राम, डॉ.राधा सावदेकर, समीर बागडे, वैशाली सरागे, अनिल कुरळकर, शालिनी सेवानी, पवनकुमार रामावत, दिनेश नरसू, प्रसादपंत, जयमाला देशमुख, राजू देशमुख, राजू देशमुख, नीरव देशमुख, नीरव देशमुख यांचा समावेश आहे. सदानंद देशमुख, प्रशांत आघाव, अंजली झोड, वर्षा सदर, आशिष गावंडे, विजय गुडधे, गणेश बोरोकर, माधुरी बोरोकर, अर्चना जगताप, सोनी मोटवानी, अमिता देशपांडे, आणि विकास केमदेव यांच्यासह सहकारी सदस्य श्रीराम देशपांडे, आशिष जावडे, महेंद्र जावडे, व डॉ. सुट्टी आणि हंगामी कार्यक्रम सायकल वारीचा मार्ग (मिरवणूक) ७ जुलै रोजी अमरावती येथून निघणारी ही सायकल मिरवणूक कारंजा, मंगरूळपीर, वाशिम, हिंगोली, औंढा नागनाथ, जावला बाजार, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, अंबाजोगाई, कळंब, येरमाळा, बार्शी, कुर्डूवाडी, व पंढरपूर मार्गे निघेल.


## शिष्यवृत्ती परीक्षेत सिदरा अफशीन तालुक्यात प्रथम!

### न.प. उर्दू शाळेचे घवघवीत यश

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) - २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत चांदूर रेल्वे येथील नगर परिषद मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू पूर्व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

या परीक्षेत शाळेची गुणवान विद्यार्थिनी सिदरा अफशीन मोहम्मद इक्रामुररहीम शेख हिने ८४ % गुण मिळवून चांदूर तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, सिदराने शालेय अभ्यासासोबतच केवळ २ वर्षे, ९ महिने आणि २२ दिवसांत 'कुराण हिफ्ज' (पवित्र कुराण मुखोद्गत)





करण्याची महान कामगिरी देखील पूर्ण केली आहे. तिच्या या दुहेरी यशामुळे सर्वत्र तिचे विशेष कौतुक होत आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील एकूण ८ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. यात सिदरा अफशीन मोहम्मद इक्रामुररहीम शेख (८४%), अरमा फिरदोस अय्युब खान (७४.६६%), शबनम परवीन मोहम्मद अमजद (७०.६६%), सिमरन परवीन शेख इर्शाद (६६.६६%), अश्मिरा फिरदोस शेख आसिफ (६६.६६%), इद्रिस खान इस्राईल खान (६६.६६%), हुस्ना फातेमा हारून बेग (६६.००%) व नायरा फातेमा रजा खान (६३.३३%) यांचा समावेश आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे शाळेच्या मुख्याध्यापिका नाहीद अख्तर मो. इनामुररहीम शेख, शाळेचे सहाय्यक शिक्षक अब्दुल गफ्फार, यास्मीन बेग, मोहम्मद वसीम आणि सय्यद उझैर यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन केले. 'आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि सर्व शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाचे फळ आहे. सिदरा सह सर्व विद्यार्थ्यांचे यश हे इतर विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. भविष्यातही आमचे विद्यार्थी अशीच प्रगती करतील,' असा विश्वास मुख्याध्यापिका नाहीद अख्तर व सर्व शिक्षक वृंदाने व्यक्त केला. परिसरातील सर्व स्तरातून या विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## शहरापासून १२ किमी दूर मेडिकल कॉलेज चालविणे भौतिकदृष्ट्या अडचणीचे होईल - आ.संजय खोडके

**अमरावती/का.प्र.**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी शहरापासून १२ किलोमीटर लांब अंतरावर प्रस्तावित केलेली मौजे आलियाबाद येथील जागा ही भौतिकदृष्ट्या अडचणीची होणार आहे. याबाबत फेरविचार करण्याची मागणी वारंवार अधिवेशनातून होत असतांना वैद्यकीय शिक्षण विभाग हा तीनवर्षापूर्वी मुख्यमंत्रीमहोदयांच्या समितीचा हवाला देत आहे. आता हि जागा आयडेंटिफाइट फॉरेस्ट असतांना निदान आता तरी वैद्यकीय शिक्षण विभाग एक डिपार्टमेंट म्हणून त्याला विरोध करणार का? असा प्रश्न आ. संजय खोडके यांनी अधिवेशनात उपस्थित केला.

अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे शहरापासून १२ किलोमीटर लांब अंतरावर मौजे आलियाबाद येथे जागा निवडण्यात आली. ५००-६०० कोटी रुपये खर्च करून ते रुग्णालय उभारण्यात येईल. मात्र त्याला ओपीडी उपलब्ध होणार नसल्याने ते रुग्णालय चालणे भौतिकदृष्ट्या शक्य होणार नाही. त्यामुळे याला डिपार्टमेंट म्हणून वैद्यकीय शिक्षण विभागाने पॉलिसी म्हणून विरोध करायला पाहिजे, त्यासंदर्भातील विषय व वस्तुस्थिती मुख्यमंत्री महोदयांच्या समितीपुढे मांडायला पाहिजे. डिपार्टमेंट ने ठरविले कि, आम्हाला हायकोर्टात जायचे आहे, तर त्यांनी तशी परवानगी मागायला पाहिजे. मात्र वैद्यकीय शिक्षण विभाग केवळ तीन वर्षांपूर्वीच्या उपसमितीने निवडलेल्या जागेचा हवाला देत आहे. आता मौजे आलियाबाद येथील जागा वनविभागाच्या अखत्यारीत आली आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या परवानगीसाठी विलंब लागून कायदेशीर मान्यता व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. त्यामुळे अमरावती येथील जीएमसीच्या जागेसंदर्भात फेरविचार करावा? तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाने एक डिपार्टमेंट या नात्याने प्रस्तावित मौजे आलियाबाद येथील जागा भौतिकदृष्ट्या शक्य नसल्याचा अभिप्राय देऊन समितीपुढे ठेवण्याचा निर्णय घेणार का? असा प्रश्न सुद्धा आ. संजय खोडके यांनी सभागृहात उपस्थित केला.



यावर पीठासीन सभापती मा.राम शिंदे यांनी अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मौजे अलियाबाद येथील जागेबाबत फेरविचार करण्यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने सर्व वस्तुस्थिती ही मुख्यमंत्रीमहोदयांच्या समितीपुढे ठेवून त्यांचा निदर्शनास आणून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच अमरावती शहराच्या मध्यवर्तीभागात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी पर्यायी जागा उपलब्ध असल्याने ही बाब सुद्धा मुख्यमंत्रीमहोदयांच्या समितीपुढे मांडून कार्यवाही करण्याचे सुद्धा सभापती महोदयांनी निर्देशित केले.यावर सभागृहाच्या निर्देशानंतर निश्चितच अनुपालन करण्याचे आश्वासन मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

### इर्विन रुग्णालय जीएमसीकडे हस्तांतरण प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी

दरम्यान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या ५०० खाटांच्या संलग्न रुग्णालयाच्या हस्तांतरणाचा मुद्दाही आमदार संजय खोडके यांनी उपस्थित केला. राज्य शासनाने आदेश दिल्यानंतरही व तीन वर्षापूर्वीच इर्विन रुग्णालय हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी हस्तांतरित करण्याचा करार झाला असून सुद्धा जीएमसीचे अधिष्ठाता - डॉ.नंदकिशोर राऊत यांच्याकडून ताबा मिळविण्यासाठी आवश्यक प्रयत्न होत नसल्याने इर्विन रुग्णालयाच्या हस्तांतरणास विलंब होत आहे.

जिल्हासामान्य रूग्णालयाचे हस्तांतरण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे करण्याबाबतचा प्रस्ताव दुसऱ्यांदा तयार करण्यात आला असून, हा प्रस्तावही शासनस्तरावर जवळपास तीन महिन्यांपासून प्रलंबित असल्याबाबत आ. संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले.

त्यामुळे नाहक शैक्षणिक नुकसान होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये मात्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. याबाबत अधिष्ठाता डॉ. नंदकिशोर राऊत हे केवळ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व जिल्हा स्त्री रुग्णालयाची प्रशस्त इमारत मिळण्यासाठी अडून बसले आहेत. तसेच आपली चार -पाच महिन्यावर निवृत्ती असल्याने डोकेदुखी नको, अशी भावना त्यांची असल्याने खरी समस्या उद्भवत असल्याचे सुद्धा आ. संजय खोडके यांनी सांगितले. इर्विनचे हस्तांतरण करण्यास जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आधीच सहमती दर्शविली आहे. मात्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाकडूनच अद्याप ताबा घेण्यास विलंब होत असल्याने मेडिकलच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, त्यामुळे याबाबत सभागृहाने वैद्यकीय शिक्षण विभागाला सुचना करण्यात यावी.अशी मागणी आमदार महोदयांनी केली.

## संक्षिप्त

### विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शालेय साहित्याचे वाटप



**अचलपूर -** शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त अचलपूर शहरातील देवडी परिसरातील राष्ट्रीय प्राथमिक शाळा येथे विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. हा कार्यक्रम प्रीतेश कठारे व अथर्व देंडव तसेच शिवसेना-युवासेना मित्रपरिवार, अचलपूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.या कार्यक्रमाला माजी नगरसेवक बल्लू जवंजाळ, माजी नगरसेवक संजय तट्टे, राष्ट्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक संजय पोंदे,नितीन आखुड,माजी नगरसेवक बंटी ककरानीया, शिवसेने चे विलास सोळंकी ,गोपाल खोलापुरे,शहराध्यक्ष आतिश अहीर, प्रीतेश अवघड ,विवेक महलले,आकाश धमेले यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शिवसेना, युवासेना व प्रहार जनशक्ती पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी माजी नगरसेवक बल्लू जवंजाळ,संजय तट्टे, प्रीतेश अवघड या मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे महत्त्व पटवून देत मन लावून शिक्षण घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी कौतुक केले.

### राज्यस्तरीय कृषी क्षेत्रातील रूपाली ठाकरे सन्मानित



**टाकरखेडा संभू -** भातकुली तालुक्यातील टाकरखेडा शंभू येथील सहाय्यक कृषी अधिकारी रूपाली वसंतराव ठाकरे (रूपाली शशिकांत चऱ्हाटे) यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय 'पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न-२०२४' पुरस्काराने गौरविण्यात आले. १ जुलै रोजी कृषी दिनानिमित्त वरळी, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे ,जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील,कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, रोजगार हमी फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मृदा व जलसंधारण मंत्री इंद्रनील नाईक, राज्याचे कृषी सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सुरज मांढरे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.सन २००४ पासूनच्या २२ वर्षांच्या सेवाकाळात त्यांनी कृषी विस्तार, शेतकरी प्रशिक्षण, महिला शेती शाळा, जलसंधारण आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार यामध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे. यापूर्वीही त्यांना जिल्हास्तरीय उत्कृष्ट अधिकारी गौरव, राज्यस्तरीय कृषी मित्र पुरस्कार तसेच कृषीथॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.या यशाबद्दल रूपाली ठाकरे यांनी शेतकरी, वरिष्ठ अधिकारी, सहकारी कर्मचारी आणि कुटुंबीयांचे आभार मानत, त्यांच्या सहकार्यामुळेच हा सन्मान मिळाल्याची भावना व्यक्त केली.

### शेतकरी कुटुंबीयांची सांत्वनपर भेट



**शिराळा -** येथील शेतकरी सुरेशराव खाडे व विजयराव तायडे. यांनी कर्जबाजारीपणा व नापिकीच्या संकटामुळे सुमारे दहा दिवसांपूर्वी आत्महत्या केली. या दुःखाच्या प्रसंगीयुवा स्वाभिमान पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश दादा साबळे यांनी दोन्ही कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले व त्यांना धीर दिला. संबंधित कुटुंबे अत्यंत गरीब व अल्पभूधारक असल्याने शासनाकडून आवश्यक ती मदत मिळावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच या कठीण काळात कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे अभिवचन दिले.याप्रसंगी माजी पंचायत समिती सदस्य गणेशराव कडू, मोहम्मद मुश्ताक, सिद्धूभाऊ, माजी उपसरपंच रुपरावजी तायडे,डी. आर. वानखडे. तसेच दोन्ही कुटुंबांतील सदस्य उपस्थित होते. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे.त्यांच्या कुटुंबांच्या दुःखात सहभागी होणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे.

### महिला शहराध्यक्षपदी कांता काळे

**अमरावती -** अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने नुकतीच महिला मंच कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्ष कंचन मुरके यांनी समाजसेविका तसेच रुग्णसेविका कांता काळे यांची अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळींच्या उपस्थितीत सर्वानुमते अमरावती महिलामंच चे शहराध्यक्ष पद देऊन कामाची जबाबदारी सोपवली आहे. अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ महिला मंच चे मला मिळालेले पद नसून यावर कार्य करणे म्हणजे मी माझे कर्तव्य समजेल आणि महिला पत्रकारांसाठी कायम कार्यरत राहील असे कांता काळे यांनी यावेळी बोलताना सांगीतले. याप्रसंगी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने, प्रदेश अध्यक्ष कैलास बापू देशमुख, प्रदेश सरचिटणीस राजेंद्र ठाकरे, शहराध्यक्ष किशोर बरडे, जिल्हाध्यक्ष वाघमारे, संतोष चव्हाण, संदीप सुने, तसेच अखिल भारतीय ग्रामीण भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.


# चिंता तरुणाईच्या मानसिकतेची

**लोहगड किल्ल्यावर झालेला केतनचा मृत्यू हा अपघात नसून खून असल्याचे समोर आल्याने सबंध राज्यात खळबळ उडाली आहे. त्याच्या होणाऱ्या पत्नीने आपल्या प्रियकराच्या मदतीने केतनचा काटा काढल्याची कहाणी एखाद्या चित्रपटाच्या कथानकाला साजेसी आहे. मानसशास्त्रीयदृष्टया विचार करता हा सायकोपॅथीचा प्रकार असल्याचे दिसते. या प्रकरणामुळे आजच्या तरुण पिढीच्या बदलत्या मानसिकतेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.**

लोहगड किल्ल्यावर झालेल्या केतन अग्रवाल या तरुणाच्या मृत्यूने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. सुरुवातीला अपघात वाटणाऱ्या या प्रकरणाचा खोलात जाऊन तपास केल्यानंतर तो सिया म्हणजेच केतनच्या होणाऱ्या पत्नीकडून केला गेलेला खून असल्याचे सकृतदर्शनी समोर आले आहे. सियाने आपला प्रियकर चेतन याच्या मदतीने हे दुष्कृत्य घडवून आणल्याचे पोलीस तपासातून पुढे आले आहे. अद्याप या प्रकरणात दोषनिश्चिती झालेली नसली तरी समोर येणारे तपशील कोणाही सामान्य व्यक्तीला हादरवून टाकणारे आहेत. या प्रकरणामुळे आजच्या तरुण पिढीच्या बदलत्या मानसिकतेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

वडिलांनी नवरा मुलगा पसंत करायचा आणि मुलींनी हो म्हणायचे असा एक काळ समाजाने अनुभवलेला आहे. स्त्रियांना मतस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, निर्णयाधिकार असतात हे मान्य नसणारी पुरुषप्रधान व्यवस्था आपल्याकडे अनेक वर्षे होती. परंतु गेल्या दोन दशकांमध्ये मुलींच्या शिक्षणाचा पाया रुंदावत गेला आणि त्यांच्या कर्तृत्वाची झलकही सर्वांनी पाहिली, पण इंटरनेट युगातील आजची पिढी ही पूर्वीच्या निकषांपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. समाजातील मूल्ये, संस्कार, विचारधारा यांचा आलेख घसरत असताना ही पिढी मोठी झाली आहे. त्यामुळे अशा प्रकरणांचा मानसशास्त्रीयदृष्टया विचार करताना बदललेले सामाजिक परिदृश्य लक्षात घेणे गरजेचे आहे.

स्वतच्या होणाऱ्या पतीला केवळ आपल्या प्रेमाच्या आड येतो म्हणून दरीत ढकलून देणे आणि त्याला अपघाताचे रूप देणे, ही घटना आजच्या तरुण पिढीतील गंभीर मानसिक विकृती आणि भावनिक अपरिपक्वता दर्शवणारी एक धोक्याची घंटा आहे. एखाद्या व्यक्तीची हत्या करण्याचा कट रचणे, हत्येनंतर पोलिसांसमोर खोटे अश्रू ढाळणे आणि केलेल्या कृत्याचा कोणताही पश्चात्ताप न होणे, ही लक्षणे अँटी-सोशल पर्सनालिटी डिसऑर्डर किंवा सायकोपॅथीकडे संकेत करतात. यामध्ये व्यक्तीला सामाजिक नियम, कायदे आणि इतरांच्या भावना किंवा हक्कांबद्दल सदर व्यक्तीला कोणतीही पर्वा नसते. दुस?याच्या वेदनेची किंवा जिवाची किंमत नसते. केवळ स्वतची इच्छा पूर्ण करण्यासाठी ही माणसे कोणत्याही थराला जाऊ शकतात. स्वतच्या आनंदासाठी इतरांशी खोटे बोलणे, फसवणूक करणे किंवा बनावट ओळख वापरणे यामध्ये त्यांना यत्किंचितही गैर वाटत नाही. सियाला हे लग्न मान्य नव्हते, तर ती घरात ठामपणे नकार देऊ शकली असती किंवा कायदेशीर मदत घेऊ शकली असती. परंतु समस्येवर परिपक्वतेने मार्ग काढण्याऐवजी वाटेतील अडथळाच संपवून टाकणे हा मार्ग निवडला गेला. याला मानसशास्त्रात 'प्युअर कोपिंग मेकॅनिझम' म्हणतात. या मनस्थितीमध्ये कठीण प्रसंगात मेंदू योग्य निर्णय घेऊ शकत नाही. आपल्या आवडीच्या गोष्टीसाठी कोणत्याही थराला जाण्यास तयार असण्याच्या मानसिकतेला 'ऑब्सेसिव्ह लव्ह डिसऑर्डर' म्हटले जाते.



आजच्या पिढीला काही जण 'मॅगी जनरेशन' असेही म्हणतात. कारण या पिढीला यश असो, पैसे असो की स्वातंत्र्य, प्रत्येक गोष्ट लगेच हवी असते. इमिजिएट. ती मिळत नाही किंवा जेव्हा त्यांच्या मनाविरुद्ध काही घडते किंवा एखादी अडचण समोर येते, तेव्हा ती सोडवण्यासाठी संयम ठेवण्याऐवजी ती अडचणच मुळातून उपटून टाकण्याची हिंसक प्रवृत्ती वाढताना दिसत आहे. तसेच मुलांना नकार स्वीकारण्याची, पचवण्याची मानसिकताच विकसित होत नाही.


सियाच्या प्रकरणाचा सर्वात मोठा धडा म्हणजे पालकांचा मुलांशी असणारा सुसंवाद वाढायला हवा. आपला विवाह ज्या मुलाशी लावून दिला जात आहे तो मला मान्य नाही, हे मोकळेपणाने आपल्या पालकांना सांगायला हवे असे सियाला का वाटले नाही? तेवढी मोकळीक त्यांच्या कुटुंबात का नव्हती? आपले एखाद्या मुलावर प्रेम आहे हे मुलींना घरामध्ये सांगायला आजही भीती वाटण्यामागे कुटुंबांतर्गत वातावरणात सुसंवादाचा आणि मोकळेपणाचा अभाव हे महत्त्वाचे कारण आहे. ते असते तर आज केतनसारख्या निष्पाप तरुणाचा बळी गेला नसता आणि सियाचे भवितव्यही अंधकारमय झाले नसते.

तरुणांमध्ये वाढत चाललेल्या क्रौर्याच्या मानसिकतेला मनोरंजनविश्वही जबाबदार आहे. आज ओटीटी प्लॅटफॉर्मवरील वेबसीरिज, चित्रपट पाहिल्यास त्यामध्ये अनैतिक संबंध, हिंसा, नशेबाजपणा यांचा महापूर आलेला दिसतो. तरुण पिढी असे कार्यक्रम, चित्रपट सर्रास पाहत असते आणि बहुतेकदा पालकांना त्याची कल्पनाही नसते, पण सातत्याने अशा मालिका पाहिल्यामुळे विचारप्रक्रियेवर अतिशय नकारात्मक परिणाम होतात. आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे लिव्ह इन रिलेशनशिपसारख्या प्रवाहांचा तरुण पिढीवरील वाढता प्रभाव. विवाह संस्था, कुटुंब संस्था यांमुळे भारतीय संस्कृतीची मुळे भक्कम राहिली, पण पश्चिमी जगाच्या अंधानुकरणातून लिव्ह इनसारखे घातक फॅड तरुणाईमध्ये वाढत चालले आहे. त्यातून तयार झालेल्या मानसिकतेचाही परिणाम अशा घटनांच्या रूपाने दिसून येतो.

मागे मॉडेल मारिया सुसाईराज आणि तिचा प्रियकर जेरोम मॅथ्यू यांनी मिळून टीव्ही एक्झिक्युटिव्ह नीरज ग्रोवर याची मारियाच्या घरात चाकूने भोसकून हत्या केली होती. त्यानंतर पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेहाचे लहान तुकडे करून ते जंगलात जाळण्यात आले. एका क्षणाच्या रागातून आणि अनैतिक संबंधातून हे कृत्य घडले होते. अशा अनेक घटना गेल्या काही वर्षांत घडल्या आहेत. याबाबत समाजाला गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. मुला-मुलींचे विवाह ठरवताना बळजबरी करण्याऐवजी मानसोपचारतज्ज्ञांचे किंवा कौटुंबिक समुपदेशकांचे साहाय्य घेण्यात कमीपणा वाटून घेऊ नका. लोहगड हत्याकांड हे तरुणाईच्या ढासळत्या मानसिक स्वास्थ्याचे लक्षण आहे. आपण आताच त्यांच्या भावनिक आरोग्याकडे लक्ष दिले नाही, तर केवळ सोशल मीडियाच्या आभासी जगात जगणारी ही पिढी वास्तवातील नाती आणि मानवी जीवनाची किंमत विसरून जाईल.

**डॉ. संजय गायकवाड**

# लोचा तंत्रज्ञानाचा, जुगाड नवऱ्याचा!



'आवश्यकता ही शोधाची जननी असते' असे आपण आजवर ऐकत आलो आहोत. पण भारतासारख्या देशात 'आवश्यकता ही जुगाडाची जननी असते' असे म्हटले, तर ते अधिक सार्थ ठरेल. सध्या सोशल मीडियाच्या विश्वात एका अशाच अजब, चक्रावून टाकणाऱ्या आणि तितक्याच मजेशीर जुगाडाची गोष्ट प्रचंड वेगाने व्हायरल होत आहे. तंत्रज्ञानाची कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि माणसाची उपजत विनोदबुद्धी यांचा एक अनोखा आणि रंजक मेळ या घटनेत पाहायला मिळत असून, डिजिटल जगतात याची जोरदार चर्चा सुरू आहे.

व्हायरल झालेल्या दाव्यानुसार, एका महाशयांनी उन्हाळ्याचा त्रास किंवा काही घरगुती कारणामुळे आपले संपूर्ण डोके मुंडवून म्हणजेच टक्कल करून एक नवा लुक करायचे ठरवले. हौसेने टक्कल तर झाले, पण खरा 'क्लायमॅक्स' त्यानंतर समोर आला. जेव्हा या व्यक्तीने आपला स्मार्टफोन अनलॉक करण्यासाठी किंवा एखाद्या बँकेच्या सुरक्षित ॲपमध्ये 'फेस व्हेरिफिकेशन' Face Verification करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा एआय आधारित फेस रेकग्निशन सिस्टमने त्याचा चेहरा ओळखण्यास साफ नकार दिला

वारंवार प्रयत्न करूनही स्क्रीनवर `Face Not Recognized' असा मेसेज येत होता. टक्कल केल्यामुळे चेहऱ्याच्या वरच्या भागाच्या रचनेत आणि कपाळाच्या आकारात झालेल्या बदलामुळे एआय सिस्टम त्याला फोनचा मूळ मालक न समजता कोणीतरी घुसखोर समजत होती. फोन पूर्णपणे लॉक झाल्यामुळे त्या व्यक्तीची मोठीच पंचायत झाली.आजच्या डिजिटल युगात फोन लॉक असणे म्हणजे माणसाचे हातपाय बांधून ठेवण्यासारखे आहे. सर्व तांत्रिक उपाय आणि पासवर्डचे पर्याय थकल्यानंतर या पठ्ठ्याने एक अशी युक्ती लढवली, ज्याची कल्पना कोणत्याही टेक-तज्ज्ञाने किंवा सिलिकॉन व्हॅलीतील इंजिनिअरने केली नसेल. त्याने थेट आपल्या पत्नीच्या लांबसडक केसांचा आसरा घेतला!

त्या व्यक्तीने पत्नीचे काही लांब केस आपल्या डोक्यावर अशा प्रकारे सेट केले, जेणेकरून कपाळावर पडणाऱ्या केसांची रचना त्याच्या जुन्या (केस असलेल्या) लुकसारखी दिसेल. डोक्यावर पत्नीच्या केसांचा हा तात्पुरता 'विग' लावून जेव्हा त्याने पुन्हा कॅमेऱ्यासमोर आपला चेहरा धरला, तेव्हा चमत्कार घडला! हा अजब जुगाड यशस्वी ठरला. सिस्टमने तात्काळ त्याचा चेहरा ओळखला, 'फेस व्हेरिफिकेशन' सक्सेसफुल झाले आणि फोन खटकन अनलॉक झाला!

तांत्रिक विश्लेषणमध्ये टक्कल केल्याने फेस आयडी खरोखरच ब्लॉक होऊ शकतो का? या मजेशीर घटनेच्या निमित्ताने तंत्रज्ञान क्षेत्रात एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला जात आहे: आपले फोन खरोखरच केसांवरून आपली ओळख पटवतात का? याचे उत्तर स्मार्टफोनमध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाच्या दर्जावर अवलंबून आहे.

ॲपलचा `Face ID' किंवा प्रीमियम फ्लॅगशिप फोन्समध्ये असणारे हे तंत्रज्ञान चेहऱ्यावर हजारो अदृश्य इन्फ्रारेड डॉट्स टाकून चेहऱ्याची त्रिमितीय रचना म्हणजेचँ दहा ऐॅल्ली, डोळे, नाक आणि ओठांमधील अंतर मोजते. येथे केसांचा काहीच फरक पडत नाही. टक्कल केले किंवा दाढी वाढवली तरी फोन सहज अनलॉक होतो.

अनेक स्वस्त किंवा बजेट अँड्रॉइड फोन्समध्ये केवळ समोरील कॅमेऱ्याचा वापर करून चेहऱ्याचा एक फोटो सेव्ह केला जातो आणि नंतर त्याची तुलना केली जाते. अशा सिस्टीम्स चेहऱ्याच्या बाह्य रेषेवर आणि केसांच्या रचनेवर बऱ्याच अंशी अवलंबून असतात. त्यामुळे केसांमध्ये किंवा दाढीत अचानक मोठा बदल झाल्यास या सिस्टीम्स गोंधळात पडू शकतात. त्यामुळे, जर त्या व्यक्तीकडे जुन्या तंत्रज्ञानाचा किंवा बजेट सेगमेंटमधील फोन असेल, तर टक्कल केल्यामुळे त्याची ओळख पटवण्यात फोनला अडचण आली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

हा किस्सा वाचायला आणि ऐकायला जितका रंजक आहे, तितकाच तो विचार करायला लावणारा आहे.आजकालच्या 'रील्स' आणि 'शॉर्ट्स'च्या जमान्यात निव्वळ व्ह्यूज, लाईक्स आणि फॉलोअर्स मिळवण्यासाठी अनेक डिजिटल क्रिएटर्स असे प्रँक (Prank) व्हिडिओ किंवा स्क्रिप्टेड (आधीच ठरवलेले) व्हिडिओ बनवत असतात. कदाचित त्या व्यक्तीने फोन लॉक करण्यासाठी आधीच पत्नीच्या केसांसह फेस आयडी रजिस्टर केला असावा आणि नंतर मनोरंजनासाठी हा व्हिडिओ बनवला असावा, अशीही दाट शक्यता आहे. त्यामुळे अशा व्हायरल दाव्यांवर डोळे झाकून विश्वास ठेवण्यापूर्वी त्यातील तांत्रिक आणि व्यावहारिक बाजू समजून घेणे गरजेचे आहे.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,**
वर्धा, ९५६१५९४३०६

# भारतातही फुटबॉल संस्कृती रुजायला हवी!



फुटबॉल हा जगातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ मानला जातो. जगातील जवळपास प्रत्येक देशात हा खेळ खेळला जात असल्याने त्याला खेळांचा राजा असेही म्हटले जाते. या खेळाचा सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा सोहळा म्हणजे फिफा विश्वचषक. फुटबॉलप्रेमींसाठी हा स्पर्धा महोत्सव म्हणजे अक्षरशः कुंभमेळाच. यंदाचा २०२६ चा विश्वचषक अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांनी संयुक्तपणे आयोजित केला असून प्रथमच ४८ संघांच्या सहभागामुळे स्पर्धेचे स्वरूप अधिक व्यापक आणि रोमांचक झाले आहे.

यापूर्वी विश्वचषकात ३२ संघ सहभागी होत असत. मात्र यंदापासून ४८ संघांचा समावेश करण्यात आला आहे. १२ गटांमध्ये विभागलेल्या या स्पर्धेत प्रत्येक गटातील अव्वल दोन संघांसह सर्वोत्तम आठ तिसऱ्या क्रमांकाच्या संघांनाही बाद फेरीत प्रवेश मिळत आहे. त्यामुळे अधिक देशांना जागतिक स्तरावर स्वतःचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली आहे.

यंदाच्या विश्वचषकात अनेक धक्कादायक निकाल पाहायला मिळाले. बलाढ्य संघांना अनपेक्षित पराभव पत्करावा लागला, तर काही नवोदित संघांनी आपल्या खेळाने जगाला चकित केले. त्यापैकी सर्वाधिक चर्चेत राहिला तो आफ्रिकेतील छोटासा केप वर्दे देश. अवघी सुमारे सहा लाख लोकसंख्या असलेल्या या देशाने प्रथमच विश्वचषकासाठी पात्रता मिळवली आणि बाद फेरीपर्यंत मजल मारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अर्जेंटिनाविरुद्ध अखेरच्या क्षणी गोल स्वीकारल्यामुळे त्यांचा प्रवास थांबला; पण त्यांनी फुटबॉलप्रेमींची मने जिंकली. आकाराने लहान असला तरी जिद्द, शिस्त आणि सांघिक खेळाच्या बळावर जगात स्वतःचे स्थान निर्माण करता येते, हे केप वर्देने सिद्ध करून दाखवले.

एका बाजूला केप वर्देसारखा छोटा देश जागतिक फुटबॉलमध्ये उल्लेखनीय कामगिरी करतो, तर दुसऱ्या बाजूला तब्बल १४५ कोटी लोकसंख्या असलेला भारत अजूनही विश्वचषकापासून दूर आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या देशाला जागतिक फुटबॉलमध्ये ठोस स्थान निर्माण करता आलेले नाही, ही निश्चितच चिंतेची बाब आहे. प्रतिभेची कमतरता नसतानाही नियोजन, पायाभूत सुविधा, प्रशिक्षण व्यवस्था आणि तळागाळातील विकास यामध्ये आपण मागे पडत आहोत.

भारतात क्रिकेटला मिळणारी लोकप्रियता आणि सुविधा इतर खेळांना मिळत नाहीत, हे वास्तव आहे. फुटबॉलची परंपरा पश्चिम बंगाल, केरळ, गोवा आणि ईशान्येकडील काही राज्यांपुरतीच मर्यादित राहिली आहे. अनेक ठिकाणी दर्जेदार मैदाने, प्रशिक्षक, प्रशिक्षण केंद्रे आणि स्पर्धांचा अभाव आहे. त्यामुळे अनेक गुणवान खेळाडूंना स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधीच मिळत नाही.

भारतात फुटबॉल संस्कृती रुजवायची असेल तर केवळ व्यावसायिक लीग पुरेशा ठरणार नाहीत. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर फुटबॉलला प्रोत्साहन देणे, प्रत्येक जिल्ह्यात दर्जेदार मैदाने उभारणे, प्रशिक्षित प्रशिक्षक उपलब्ध करून देणे, नियमित स्पर्धांचे आयोजन करणे आणि ग्रामीण भागातील प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळवून देणे आवश्यक आहे. माध्यमांनीही फुटबॉलला अधिक प्रसिद्धी दिल्यास आणि आंतरराष्ट्रीय सामन्यांचे व्यापक प्रक्षेपण झाल्यास तरुण पिढी या खेळाकडे अधिक आकर्षित होईल.

भारताकडे प्रतिभा, युवा शक्ती आणि संसाधनांची कमतरता नाही. गरज आहे ती दीर्घकालीन नियोजनाची, सातत्यपूर्ण गुंतवणुकीची आणि फुटबॉलला लोकचळवळीचे स्वरूप देण्याची. क्रिकेटप्रमाणेच फुटबॉललाही देशभरात पोषक वातावरण निर्माण झाले, तर भारताचाही तिरंगा एक दिवस फिफा विश्वचषकाच्या मैदानावर अभिमानाने फडकताना पाहण्याचे स्वप्न निश्चितच साकार होऊ शकते.

**श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# कर्जमुक्तीपासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत...

## शेतकऱ्यांच्या विकासाचा नवा अध्याय

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांना सातत्याने नैसर्गिक आपत्तींनी छळले आहे. राज्यात व्यापक प्रमाणात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्या असल्या, तरी शेतीचा मोठा भाग पर्जन्यपोषित आहे. त्यामुळे खरीपाच्या (आणि रब्बीच्याही) उत्तम हंगामासाठी पर्जनमान हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. अर्थात, चांगला पाऊस पडूनही अनेकदा कीडींच्या प्रादुर्भावाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. या समस्या सुटल्यावर काहीवेळा अवकाळी पावसाचा फटका बसल्यावर हातचे पीक गमावण्याची वेळ शेतकऱ्यांवर ओढवते. पीक चांगले आल्यावर शेतीमालाच्या दरांचा प्रश्नही सातत्याने भेडसावत असतो. शेतकऱ्यांवर येणाऱ्या अशा विविध स्वरुपाच्या संकटांचा विचार करून राज्य शासनाने वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे.

कर्जमुक्ती योजनेचा निर्णय

राज्य सरकारने अलिकडेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' जाहीर करून पुन्हा एकदा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. २०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळी थेट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती जाहीर करण्यात आली असून या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जांचा या योजनेत समावेश आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे कर्जाची रक्कम या मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या शेतकऱ्यांनाही स्वतःच्या हिस्स्याची रक्कम भरल्यावर दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचे लाभ देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलाय. यामुळे शेतकरी पीककर्जासाठी अक्षम ठरणार नाहीत, याची काळजी घेण्यात आली आहे.

'त्या' शेतकऱ्यांनाही लाभ

कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही राज्य सरकारने प्रोत्साहनपर दिलासा दिला असून अशा शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद या योजनेत आहे. नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ



देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक

**विशेष लेख**

वर्षातील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.

कल्याणकारी योजनांची जोड

राज्य सरकारचे कृषी धोरण शेतकरी केंद्रित आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, या त्रिसूत्रीवर कृषी विभागाच्या नेतृत्वात विविध योजना राबविल्या जात आहेत. सिंचन सुविधांचा विस्तार, ठिबक व तुषार सिंचनाला प्रोत्साहन, पीकविमा, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि शेततळ्यांच्या उभारणीसाठीही विविध योजनांद्वारे आर्थिक सहाय्य दिले जात आहे. ऊर्जेच्या खर्चात बचत व्हावी आणि दिवसा अखंडित वीज उपलब्ध व्हावी, यासाठी 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' महत्त्वाची ठरली आहे. या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर सौर पंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, सिंचनासाठी शाश्वत ऊर्जेचा वापर वाढविण्यावर भर दिला जातोय.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

जगभरात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान सातत्याने प्रगतीची शिखरे गाठत असताना शेतीचे क्षेत्रही त्यातून सुटलेले नाही. शेतीसाठी लागणारे मानवी श्रम तुलनेने कमी व्हावे आणि शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचे 'स्मार्ट' पर्याय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने 'एआय' म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या प्रसारवर मोठा भर दिला आहे. पीकांची लागवड, कीडींचे व्यवस्थापन, खत व पाण्याचे अचूक नियोजन, फवारणी, बाजारभावांचे अचूक विश्लेषण, पर्यायी बाजारपेठांची उपलब्धता, हवामानविषयक माहिती अशा अनेक बाबतीत आता 'एआय' साधने राज्यात शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होत आहेत. याशिवाय शेतमाल साठवणूक, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहन, तसेच डिजिटल सेवांद्वारे शासकीय योजनांची माहिती आणि अर्ज प्रक्रिया सुलभ करण्याचे प्रयत्नही सुरू आहेत.

आधुनिक तंत्रज्ञान, आर्थिक सहाय्य आणि पायाभूत सुविधांचा संगम साधत शेतीला अधिक सक्षम, स्पर्धात्मक आणि शाश्वत स्वरूप देण्याचे प्रयत्न राज्य शासनाकडून सुरु आहेत. कर्जमुक्तीपासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचा हा प्रवास महाराष्ट्रातील कृषी क्षेत्र आणि पर्यायाने शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्याच्या व्यापक प्रयत्नांचे द्योतक मानला जात आहे.

**रमाकांत दाणी**

# शासकीय जागेवर मुरूम माफियांचा डल्ला?

## विवरा–आलेगाव परिसरात अवैध उत्खननाचा गंभीर आरोप

**जेसीबीच्या सहाय्याने शेकडो ब्रास गौण खनिज उपशाची चर्चा; महसूल विभागाच्या भूमिकेवर ग्रामस्थांचे प्रश्नचिन्ह**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

*पातूर तालुक्यातील विवरा व आलेगाव परिसरातील शासकीय जमिनींवरून मोठ्या प्रमाणात मुरूमाचे कथित अवैध उत्खनन सुरू असल्याचा गंभीर आरोप पुढे आला असून, या प्रकारामुळे शासनाच्या महसुलाला लाखो रुपयांचा फटका बसत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. विशेष म्हणजे, जेसीबीसारख्या अवजड यंत्रांच्या सहाय्याने गौण खनिजाचा उपसा सुरू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असून, संबंधित महसूल यंत्रणा याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही होत आहे.*



मिळालेल्या माहितीनुसार, विवरा–सुकळी मार्गावरील सोपीनाथ नगर परिसरातील बीएसएनएल मोबाईल टॉवरजवळील शासकीय जागा तसेच आलेगाव येथील शिवटेकडी परिसरात मोठ्या प्रमाणावर मुरूम उपसा करण्यात आल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे. या ठिकाणांहून जेसीबीच्या सहाय्याने शेकडो ब्रास गौण खनिज काढून त्याची विविध ठिकाणी वाहतूक करण्यात येत असल्याची माहितीही समोर येत आहे.

गौण खनिजाचे उत्खनन आणि वाहतूक यासाठी शासनाने निश्चित केलेली परवानगी, रॉयल्टी आणि नियमावली लागू असते. त्यामुळे शासकीय जागेवर कोणत्याही प्रकारचे उत्खनन करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी आवश्यक असते. अशा परिस्थितीत संबंधित ठिकाणी सुरू असल्याचा दावा करण्यात येत असलेल्या उत्खननाला आवश्यक परवानग्या आहेत का, उत्खननाची नोंद संबंधित विभागाकडे आहे का आणि वाहतुकीसाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध आहेत का, याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अवैध उत्खननामुळे अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे निर्माण झाले असून त्यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भविष्यात पावसाळ्यात हे खड्डे अपघाताचे कारण ठरू शकतात, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. याशिवाय शासकीय मालमत्तेचे नुकसान आणि नैसर्गिक संसाधनांचा अनियंत्रित उपसा हा चिंतेचा विषय बनला आहे.

विशेष म्हणजे, दिवसाढवळ्या जेसीबीसारख्या यंत्रांच्या सहाय्याने उत्खनन आणि वाहनांद्वारे वाहतूक होत असल्याचा दावा केला जात असतानाही संबंधित महसूल विभाग, गौण खनिज शाखा किंवा स्थानिक प्रशासनाकडून ठोस कारवाई झाल्याचे चित्र दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे अवैध गौण खनिज उत्खननावर नियंत्रण ठेवण्यासाठी असलेली यंत्रणा कितपत प्रभावीपणे कार्यरत आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. ग्रामस्थांनी या संपूर्ण प्रकरणाची जिल्हास्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून, संबंधित ठिकाणांची संयुक्त पाहणी करून उत्खननाची वस्तुस्थिती तपासावी, दोषींवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी आणि शासनाचा महसूल वसूल करावा, अशी मागणी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सातत्याने तपासणी मोहीम राबविण्याचीही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत महसूल विभागाकडून अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसून, प्रशासन या आरोपांची दखल घेऊन काय कारवाई करते, याकडे विवरा, आलेगाव व परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**शेकडो ब्रास गौण खनिज उपशाचा आरोप**

विवरा आणि आलेगाव परिसरातील शासकीय जागेवरून जेसीबी मशीनद्वारे मोठ्या प्रमाणात मुरूम काढण्यात आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. शेकडो ब्रास गौण खनिजाची कथित अवैध वाहतूक झाल्यामुळे शासनाला लाखो रुपयांचा महसुली फटका बसल्याची चर्चा असून, महसूल विभागाने तातडीने पंचनामा करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# सलाबत प्लॉटमध्ये अस्वच्छतेचा विळखा

## शिर्ला ग्रामपंचायतीवर २० जुलैला जन आक्रोश मोर्चाचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील शिर्ला ग्रामपंचायत हद्दीतील पातूर येथील सलाबत प्लॉट परिसरात अनेक दिवसांपासून अस्वच्छतेचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. रस्त्यांवर साचलेला कचरा, घाणीचे ढीग, पावसाच्या पाण्याची डबकी आणि सर्वत्र पसरलेली दुर्गंधी यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. वारंवार तक्रारी करूनही ग्रामपंचायतीकडून ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

सलाबत प्लॉट परिसरात नियमित साफसफाई होत नसल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला असून, संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. अनेक दिवसांपासून सफाई कर्मचारी या भागात फिरकले नसल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्या नेतृत्वाखाली २० जुलै रोजी शिर्ला ग्रामपंचायत कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्याआधी सलाबत प्लॉट परिसराची तातडीने स्वच्छता करण्यात यावी, नियमित सफाई व्यवस्था सुरू करावी तसेच नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न त्वरित मार्गी लावावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास परिसरातील नागरिकांच्या सहभागातून मोठ्या संख्येने जनआक्रोश मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा देत प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती सुधारावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



'पहिल्याच पावसात शिर्ला ग्रामपंचायतीच्या कारभाराची पोल उघड झाली आहे. सलाबत प्लॉट परिसरात जागोजागी कचरा, घाण आणि पाण्याची डबकी साचल्याने दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. २० जुलैपूर्वी तातडीने साफसफाई न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात येईल.'

**निलेश कापकर,**
सामाजिक कार्यकर्ते, आलेगाव

# प्रहार अपंग क्रांती संघटनेचे स्मार्ट कार्ड वितरण शिबिर



■ प्रतिनिधी | अकोला ■

दिव्यांग वर्गात सेवारत असणाऱ्या व माजी मंत्री, दिव्यांगांचे नेते बच्चू कडू प्रणित प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने स्मार्ट कार्ड वितरण शिबिर घेण्यात आले.या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.रविवारी स्थानिक गोरक्षण रोड येथील गणेश विहार अपार्टमेंट परिसरात प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या अकोला जिल्हा उपाध्यक्ष व राष्ट्रीय रेल्वे प्रवासी महिला संघटना दिव्यांग आघाडीच्या विदर्भ अध्यक्ष सौ मनीषा खेडकर यांच्या पुढाकारात हा रचनात्मक उपक्रम राबविण्यात आला.मान्यवरांच्या उपस्थितीत या शिबिराचा प्रारंभ झाला. यावेळी सौ खेडकर यांनी या उपक्रमाची माहिती दिली.राज्याचे माजी मंत्री तथा संघटनचे संस्थापक बच्चू कडू यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित या उपक्रमात महिलांच्या अर्ध तिकीटसाठी १२ वर्षावरील सर्व महिला, पुरुषांच्या अर्ध्या तिकिटासाठी ६५ वर्षावरील सर्व पुरुष,तथा संपूर्ण मोफत तिकिटासाठी सर्व महिला पुरुष या राज्य परिवहन महामंडळाच्या योजनेसाठी पात्र असून त्यांनी स्मार्ट कार्ड काढून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. दरम्यान या शिबिरात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मंगेश काळे यांनी भेट देऊन प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने सुरू असलेल्या या उपक्रमाचे कौतुक करीत आपल्या शुभेच्छा बहाल केल्यात. यावेळी सो मनीषा खेडकर यांनी मंगेश काळे यांचे स्वागत करून त्यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्यात. शिबिर सफलतेसाठी श्रीपाद खेडकर, रवींद्र पोफळे, मंगला पोफळे, दिलीप देशमुख, अरुणा देशमुख, किरण देशमुख,कु भगत, मनीषा, सरोदे पती पत्नी समवेत प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या समस्त पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

# भोपळे विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न

**हिवरखेड :** येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचालित सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रवेशोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे हे होते. प्रमुख उपस्थितीत संस्थेचे कार्यवाह श्यामशील भोपळे, संचालक शिवशंकर मार्के व सहकार्यवाह स्नेहल भोपळे हे होते. याप्रसंगी नव प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी करण्यात आली होती. सेल्फी पॉईंट या उत्सवाचे मुख्य आकर्षण होते. उपस्थित मान्यवर व शिक्षक-शिक्षिका यांनी पुष्प व नवीन पुस्तके देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

# महानगरात 'विदर्भ चेंबर पत्रिका' चे प्रकाशन संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

गेल्या ९३ वर्षांच्या गौरवशाली परंपरा आणि व्यापारी-उद्योग क्षेत्राची सातत्यपूर्ण सेवा या संकल्पासह विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, अकोला यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत चेंबरचे मुखपत्र असणाऱ्या 'विदर्भ चेंबर पत्रिका'चे मोठ्या उत्साहात प्रकाशन करण्यात आले. स्थानीय पोलीस लॉन येथे संपन्न या कार्यक्रमात कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे राष्ट्रीय महासचिव व दिल्ली चे खा.प्रवीण खंडेलवाल, कैटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतिया, खा अनूप धोत्रे, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष निकेश गुप्ता, निवर्तमान अध्यक्ष नितिन खंडेलवाल, नवनियुक्त अध्यक्ष निरव वोरा, वरिष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रूहाटिया, कोषाध्यक्ष किशोर बाछूका आणि सहसचिव किरीट मंत्री उपस्थित होते.



यावेळी संपादकीय मंडळाचे सदस्य संतोष छाजेड़, राहुल मित्तल, मनोज अग्रवाल, एड. सुरेश गुरुजी अग्रवाल,प्रा विजय अग्रवाल यांच्या उपस्थितीत प्रकाशनाचे पूजन व जल्लोषात अनावरण करण्यात आले.या प्रसंगी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. 'विचारांमधून विकासाचा मार्ग मोकळा होतो आणि संवादामुळे संस्थेची शक्ती वाढते.' या भावनेला उजाळा देत प्रकाशित झालेली 'विदर्भ चेंबर पत्रिका' ही फक्त वृत्तांची सूची नसून चेंबरच्या सक्रियता, उपलब्धीं, निर्धार आणि भविष्यदिशेचे एक ठोस दस्तऐवज आहे. पत्रिकेत मागील वर्षी चेंबरने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांचे, व्यापार-उद्योग विकासासाठी केल्या गेलेल्या प्रयत्नांचे, व्यापाऱ्यांच्या हितासाठी घेतलेल्या महत्त्वाच्या आंदोलनांचे आणि स्थानिक आर्थिक प्रगतीतील चेंबरच्या भूमिकेचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे. तसेच वर्तमान आर्थिक आव्हानं, जागतिक व्यापारातील बदल, नवोन्मेष, उद्योजकता आणि तज्ज्ञांचे उपयुक्त विचार यांना देखील स्थान देण्यात आले आहे, ज्यामुळे व्यापार-उद्योग क्षेत्राला नवीन माहिती आणि मार्गदर्शन मिळत असल्याचे सांगण्यात आले.विदर्भ चेंबरच्या वतीने या प्रसंगी सर्व सहकार्यकऱ्यांचे आभार व्यक्त करून सातत्यपूर्ण सहकार्य, विश्वास व सहभागामुळे हे प्रकाशन दरवर्षी नवीन उंची गाठत व्यापार-उद्योगासाठी एक उपयुक्त संदर्भग्रंथ म्हणून आपली भूमिका बजावत राहो अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाला व्यापार व उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# गुरुवारी इनरव्हिल क्लब अकोलाचा पदग्रहण सोहळा



■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक,सांस्कृतिक सेवा क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांच्या इनरव्हील कलब ऑफ अकोलाचा नूतन कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.गुरुवार दि २ जुलै रोजी दुपारी ४ वाजता नवीन बस स्टँड जवळील हॉटेल क्रिष्णा इमपरीयल मध्ये हा सोहळा होऊन यात मावळत्या अध्यक्षा जयश्री शास्त्रकार या वर्ष २०२६-२७ च्या अध्यक्षा निरू शाह यांना पदभार सोपविणार आहेत.यात क्लब सचिव म्हणून सई ठाकरे या कामकाज बघणार आहेत.या पदग्रहण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय इनरव्हीलच्या कोषाध्यक्ष डॉ. रश्मी शर्मा प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. या नूतन कार्यकारणीच्या पदग्रहण सोहळ्यात समस्त क्लब पदाधिकारी व सदस्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन इनरव्हील क्लबच्या समस्त पदाधिकाऱ्यांनी केले.

**Change In Name**

I have change my name From
**Mohmmad Luqman Abdul Rauf**
-To-
**Mohammad Luqman Abdul Rauf**
Address S/O Abdul Rauf Abdul Rahim, Kasai Bes, Shahar Balapur, Balapur, PO: Akola, Maharashtra -444001 Passport No :- N8913175

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २०८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# गुरुनानक कॉन्वेंट शाळेने दिला वृक्षारोपणाचा संदेश

**अकोला :** स्थानिक सिंधी कॅम्पमधील गुरुनानक कॉन्वेंट शाळेचा ३२ वा स्थापना दिन मोठ्या उत्साह आणि आनंदात संपन्न झाला. या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात सिंध शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. एल. विरवाणी, उपाध्यक्ष अशोक पंजवानी, गुरुनानक कॉन्वेंटचे अध्यक्ष गोपीचंद पंजवानी व सचिव मनोहर विरवाणी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांनी दीप प्रज्वलित करून केली. त्यानंतर सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर इयत्ता पहिली ते चौथी मधील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मनमोहक स्वागत नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. आपल्या उद्बोधनात डॉ. बी. एल. विरवाणी यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबर संस्कारांचे महत्त्व पटवून दिले आणि शिक्षण हे फक्त परीक्षा नव्हे तर जीवनाला योग्य दिशा देणारे माध्यम असल्याचे सांगितले.

# विवेकानंद शाळेच्या विद्यार्थ्यांची गगन भरारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

तापडिया नगर स्थित विवेकानंद इंग्लिश हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा वर्ग ५ वी व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा वर्ग ८ वीच्या परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा वर्ग ५ वी तून कु.मानवी पंकज कदम ही १४ वी मिरीट आली तर उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा वर्ग ८ वी तून प्रगती आनंद जोगदंड ही १२ वी मिरीट आली आहे.या संदर्भात शाळेतील अनुभवी शिक्षकवृंद विद्यार्थ्यांकडून स्पर्धा परीक्षा संबंधित सराव करून घेत असतात. वर्ग ५ वीच्या विद्यार्थ्यांना सौ. अंजली जोशी, सौ. नम्रता भोकरदनकर, सौ. सोनिया मगर, कु. राणी खुरानिया यांचे तर वर्ग ८ वी च्या विद्यार्थ्यांना शशिकांत सैतवाल, सौ. शितल तळपदे, सौ. भक्ती अभ्यंकर या शिक्षक वृंदांचे विशेष मार्गदर्शन लाभले.शाळेत घेतलेला सराव, अनुभवी शिक्षक वृंदांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संगीता कोकीळ यांचे सतत मिळणारे प्रोत्साहन, आई-वडिलांचे आशीर्वाद हेच यशाचे गमक आहे' अशा भावना विद्यार्थ्यांनी याप्रसंगी व्यक्त केल्या.यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक मिश्रित अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष अनिल पिंपरखेडे,ज्येष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र पाठक,कनिष्ठ उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष अविनाश नानोटी,सचिव रवींद्र अभ्यंकर, संस्थेचे ज्येष्ठ सदस्य निशिकांत पुजारी, सदस्य अनिरुद्ध खरे,समीर थोडगे,शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.संगीता कोकीळ, माध्यमिक शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. मिनल कापसे, प्राथमिक शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. नयना हातवळणे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

# इनरव्हील क्विन्स ने केला वैद्यकीय वर्गाचा सन्मान

## 'जीवन धारा की नई लहर, स्वस्थ रहे गाव शहर' उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक व महिला सेवा कार्य सक्रिय असणाऱ्या इनरव्हील क्लब ऑफ अकोला क्विन्सच्या वतीने डॉक्टर्स दिन साजरा करण्यात आला. क्लबच्या नूतन अध्यक्ष पल्लवी दिवेकर यांच्या पुढाकारात व पिडीसी आशा तारे,विणा वाघेला,वैजयंती पाठक समवेत क्लबच्या नूतन उपाध्यक्ष किरण हिरानंदानी,सचिव दीप्ती अग्रवाल,कोषाध्यक्ष भावना शाह,सीसीसोनल संकलेंचा, आयएसओ हरसिमरन कौर जनेजा,

आयपीपी कविता पोहरे,कार्यकारी सदस्य अमृता नागरा,अंकीता सोनी आदींच्या उपस्थितीत संपन्न या दिनावर वैद्यकीय वर्गाचा सन्मान करण्यात येऊन सात डायलिसिस रुग्णांना वैद्यकीय सहाय्य करण्यात आले.जीवनधारा प्रकल्प अंतर्गत' जीवन धारा की नई लहर,स्वस्थ रहे गाव शहर'या ब्रीदला अनुसरून जवाहर नगर येथील ग्लोबल हॉस्पिटल येथे आयोजित या वैद्यकीय वर्ग सन्मान सोहळ्यात डायलिसिस घेत असलेल्या ७ रुग्णांना आवश्यक असलेल्या ईपोफर इंजेक्शन्स देऊन सहकार्य करण्यात आले.या कार्यक्रमात क्लबच्या वतीने १५ वैद्यकीय वर्गाचा सन्मान करण्यात आला.स्वागत सोहळ्यात भाज्यांचे बियाणे व रोप ट्रे चे वितरण करण्यात आले.हा स्वागत सोहळा रानमित्र संस्थेच्या सहकार्याने करण्यात आला.



यात डॉ सदानंद भुसारी डॉ अमर सुलतान, डॉ प्रशांत मालवीय,डॉ अमोल भगत,डॉ फैजान अन्सारी, डॉ रवींद्र तेलकर,डॉ नयना तेलकर, डॉ महेंद्र चांडक,डॉ सपना चांडक, डॉ आशिष तापडिया,डॉ देवयानी खेळकर,डॉ वैशाली डोसे, डॉ कल्याणी पवित्रकार,डॉ कपिल लाड आदी वैद्यकीय वर्गाचा सन्मान करण्यात आला. आपल्या मनोगतात नूतन अध्यक्ष पल्लवी दिवेकर यांनी या उपक्रमाची संकल्पना सादर करीत क्लबच्या वतीने सातत्याने नवनवीन उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.यावेळीं बहुसंख्य वैद्यकीय वर्ग व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# उद्या महानगरात आरक्षण वर्गीकरणाच्या समर्थनार्थ भव्य महामोर्चाचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

अनुसूचित जातीतील आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ महानगरात भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.मंगळवार दि ७ जुलै रोजी स्वराज्य भवन येथून सकाळी ११ वाजता हा महामोर्चा निघणार असून तो धिंग्रा चौक,डॉ आंबेडकर खुले नाट्य गृह, गांधी रोड पंचायत समिती मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर येऊन या ठिकाणी या महामोर्चाचे सभेत रूपांतर होणार आहे. या महामोर्चासाठी जिल्हाभरात अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण समर्थक समितीची मोठ्या जोमात तयारी सुरू असून अनुसूचित जातीमधील उपेक्षित, वंचित घटकांचे हजारो महिला पुरुष युवक युवती यामध्ये सहभागी होणार आहेत.



अनुसूचित जाती मधील आरक्षण उपवर्गीकरण व्हावे या संदर्भात सुप्रीम कोर्टाच्या सात सदस्य खंडपीठाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी अनुसूचित जातीतील उपेक्षित, वंचित समाज घटक व मातंग समाज जिल्हा अकोलाच्या वतीने सदर महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे.

अनुसूचित जातीतील उपेक्षित,वंचित समाज घटक व मातंग समाजाने या मोर्चात मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन परिमल कांबळे, रामदास तायडे,ललित अंभोरे, बाळासाहेब तायडे,वामनराव भिसे, शंकरराव अवचार, मधुकर वानखडे,प्रकाश तायडे, पराग कांबळे,भिकाजी अवचार, प्रभाकर लांडगे,गजानन दांडगे, योगेश सोनोने,विष्णू शेलारकर, बाळकृष्ण गायकवाड, गजानन तायडे,शुभेदार रमेश खंदारे,विजय बांगर, सुरेश जाधव, रामकृष्ण डोंगरे, श्रीकृष्ण चव्हाण,निलेश वानखडे, संतोष डोंगरे भाष्कर अंभोरे विनोद खवेकर, महादेव क्षीरसागर, सुनील खंदारे, संतोष चव्हाण, विजय अंभोरे, चेतन नृपनारायण, विजय अंभोरे, अमोल तायडे,अविनाश डोंगरेदिवे योगेश भालेराव राहूल तायडे प्रभु गवई राजु तायडे राजकुमार ससाने लहु ससाने, अँड चंद्रकांत बोदडे,अँड आनंद तायडे, ?ड महेश घनगावकर अविनाश डोंगरदिवे, प्रकाश तायडे, महादेव नावकार, गोपाल धुरदेव,शाहीर मधुकर नावकार,प्रभाकर बोरकर, राजेश अवचार, गजानन चव्हाण,गजानन शिंदे,अमर इंगळे समवेत अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण समर्थक समिती, अकोलाच्या वतीने केले आहे.

जनमाध्यम



## संक्षिप्त

### चाकूहल्ला करून दोघांवर हल्ला

**हिंगणघाट**-किरकोळ कारणातून झालेल्या वादाचे पर्यवसान चाकूहल्ल्यात झाल्याची घटना सरकारी रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोरील पिंपळगाव मार्गावर घडली. या घटनेत एका युवकाच्या पाठीवर चाकूने वार करण्यात आला, तर दुसऱ्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. राम शंकर गाडेकर (४५) आणि त्यांचा मित्र सागरसिंग भादा यांना उमेश कडू याने भेटण्यासाठी बोलावले होते. दोघे तेथे पोहोचताच उमेश कडू आणि त्याच्या तीन साथीदारांनी शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर वाद वाढताच एका आरोपीने धारदार शस्त्राने सागरसिंग भादा यांच्या पाठीवर वार करून जखमी केले. तसेच राम गाडेकर यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. जखमींवर उपचार करण्यात आले.

### मजुरीच्या पैशावरून युवकाला मारहाण

**देवळी**-मजुरीच्या पैशाच्या वादातून दोन जणांनी शेतमजुराला लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना काजळसरा येथे घडली. गुणवंत चंपत कुंभरे हे शेतमजूर म्हणून काम करतात. त्यांच्याकडे पुरुषोत्तम बीजवार यांचे ५०० रुपये बाकी होते. गुणवंत कुंभरे हे गावातील गोठाणाजवळ उभे असताना पुरुषोत्तम बीजवार व अक्षय बीजवार तेथे आले. त्यांनी पैशाची मागणी केली. सध्या पैसे नसल्याचे गुणवंत यांनी सांगताच दोघांनी संतापून शिवीगाळ केली आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत गुणवंत कुंभरे जखमी झाले.

### कणीस विक्रेत्यावर काठीने हल्ला

**वर्धा**-कणीस परत न घेतल्याच्या किरकोळ कारणावरून विक्रेत्याला काठीने मारहाण केल्याची घटना शिखबेडा परिसरात घडली. विलास वासुदेव वैरागडे हे कणीस विक्री करत होते. प्रेमसिंग सपड यांनी ७० रुपयांचे कणीस घेतले. त्यानंतर त्यांच्या पत्नीने किंमत जास्त असल्याचे सांगत कणीस परत घेण्याची मागणी केली. यावरून दोन्ही पक्षांत वाद झाला. काही वेळाने प्रेमसिंग सपड आणि त्यांचा मुलगा अनमोल तेथे आले.

# कचऱ्याने पादचाऱ्यांचीच वाट बदलवली

## सुंदर वर्धा'चे रूपांतर कचरा शहरात ; नागरिकांच्या बेजबाबदारपणावर लगाम कधी?

**वर्धा/जनमाध्यम**

स्वच्छ शहर सुंदर शहर हे ब्रीदवाक्य आता केवळ फलकांपुरतेच उरले असून प्रत्यक्षात शहराचे रूपांतर 'कचरा शहर' झाल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळत आहे. शहरातील अनेक रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचले असून, दुर्गा टॉकीजलगत डॉ. मोगरे यांच्या दवाखान्याजवळील रस्त्यावर तर कचऱ्याने अक्षरशः पादचाऱ्यांची वाटच बदलून टाकली आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की या मार्गाने चालणेही कठीण बनल्याने नागरिकांना पर्यायी रस्ता वापरावा लागत आहे.



नगरपरिषदेकडून घंटागाडी, घराघरांतून कचरा संकलन, स्वच्छता मोहीम, जनजागृती अशा विविध योजना सातत्याने राबविल्या जात आहेत. एवढे करूनही काही बेजबाबदार नागरिक मात्र सार्वजनिक रस्तेच कचराकुंडी समजून त्यावर सर्रास कचरा टाकत आहेत. प्रशासनाने सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही नियमांचे पालन करण्याची जबाबदारी नागरिकांनीच झटकून टाकल्याचे चित्र आहे. डॉ. मोगरे यांच्या दवाखान्याजवळील रस्त्यावर साचलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरली असून, रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, महिला व शालेय विद्यार्थ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. सार्वजनिक आरोग्यालाही हा प्रकार गंभीर धोका निर्माण करणारा आहे.

शहराला अस्वच्छ करणाऱ्या अशा प्रवृत्तींवर केवळ आवाहन करून भागणार नाही. रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांची ओळख पटवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे, सीसीटीव्हीच्या माध्यमातून देखरेख वाढविणे आणि नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर पावले उचलणे अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा 'स्वच्छ वर्धा'ची घोषणा कागदावरच राहील आणि शहराची ओळख कचरा शहर अशीच होत राहील, अशी तीव्र भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.



## कायद्याला ठेंगा... कचऱ्याची दादागिरी
## फलक लावले, इशारे दिले, तरीही कचरा टाकणाऱ्यांचा उर्मटपणा कायम

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा शहरातील बजाज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर असलेल्या पोलीस चौकीच्या कंपाऊंडलगत काही नागरिकांनी अक्षरशः कचऱ्याचा ढीग साचवून परिसराचे विद्रूपीकरण केले आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे हा प्रकार नवीन नसून याबाबत अनेकदा वर्तमानपत्रांत वृत्त प्रसिद्ध होऊनही नगरपरिषदेने कोणतीही प्रभावी उपाययोजना केलेली नाही.

कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत असून परिसरातील नागरिक, पादचारी आणि वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, असा स्पष्ट इशारा देत स्थानिक पोलीस निरीक्षकांनी नागरिकांना आवाहन केले. इतकेच नव्हे तर, येथे कचरा टाकल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा देणारे फलकही भिंतीवर लावण्यात आले.

मात्र या इशाऱ्यालाही काही बेजबाबदार नागरिकांनी केराची टोपली दाखविली आहे. पोलिसांच्या सूचनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून पुन्हा त्याच ठिकाणी कचरा टाकण्याचे प्रकार सुरूच आहेत. त्यामुळे आम्ही कोणाच्या बापाला भीत नाही.कचरा इथेच टाकणार, अशीच जणू त्यांची मानसिकता असल्याचे चित्र दिसून येत आहे.

एका बाजूला शहर स्वच्छतेसाठी प्रशासन मोहीमा राबवत आहे, तर दुसऱ्या बाजूला मोजक्या बेजबाबदार नागरिकांमुळे संपूर्ण शहराची प्रतिमा मलिन होत आहे. आता केवळ इशारे देण्याऐवजी अशा प्रवृत्तींवर कठोर फौजदारी कारवाई करून दंडात्मक पावले उचलण्याची मागणी नागरिकांतून जोर धरू लागली आहे.

## व्हॉट्सॲपवरील आक्षेपार्ह लिखाण अंगलट, तक्रारीवरून गुन्हा दाखल

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

व्हॉट्सॲप ग्रुपवर एका थोर व्यक्तीबद्दल आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी सिंदी रेल्वे येथील रहिवासी सुधाकर विठोबाजी वाघमारे यांच्याविरुद्ध सिंदी रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत अमोल सुरेशराव सोनटक्के यांनी सिंदी रेल्वे पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली. तक्रारीत संबंधित व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये प्रसारित करण्यात आलेल्या आक्षेपार्ह मजकुरामुळे समाजात तेढ निर्माण होऊन सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी उपलब्ध पुरावे व प्राथमिक चौकशीच्या आधारे भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १९६(१)(अ) अन्वये सुधाकर विठोबाजी वाघमारे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सिंदी रेल्वे पोलीस करीत आहेत.

## वीजबिलाच्या २० रुपयांवरून धक्काबुक्की

आर्वी - वीजबिलाच्या २० रुपयांच्या वादातून बिल भरणा केंद्रातील कर्मचाऱ्याला धक्काबुक्की करून जखमी केल्याची घटना नेताजी वॉर्डातील वीज बिल भरणा केंद्रात घडली. कृणाल मेश्राम हे केंद्रावर काम करतात. प्रवीण चोपकार यांनी २,०३० रुपयांचे वीजबिल भरताना २,५०० रुपये दिले. सुट्टे पैसे नसल्याने २० रुपये पुढील बिलात समायोजित करण्यात येतील, असे कृणाल यांनी सांगितले. मात्र काही वेळाने प्रवीण पुन्हा केंद्रावर आला आणि वाद घालत कृणाल यांना धक्काबुक्की केली. यात कृणाल खाली पडल्याने त्यांच्या पाठीला फ्रॅक्चर झाले. जखमी कर्मचाऱ्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## स्वामी विवेकानंदांच्या पुण्यतिथीनिमित्त हिंदी विद्यापीठात अभिवादन



**वर्धा/जनमाध्यम**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात महान तत्त्वज्ञ, आध्यात्मिक गुरु आणि युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विद्यापीठाच्या प्रशासकीय भवनासमोर आयोजित कार्यक्रमात कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा यांनी स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा म्हणाल्या की, स्वामी विवेकानंद यांचे विचार आजही युवकांना राष्ट्रनिर्माण, आत्मविश्वास, सेवा आणि मानवतेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतात. त्यांनी भारतीय संस्कृती आणि आध्यात्मिक परंपरेला जागतिक पातळीवर प्रतिष्ठा मिळवून दिली तसेच युवकांना स्वतःमधील सुप्त शक्ती ओळखण्याचा संदेश दिला. त्यांचे विचार आजच्या काळातही तेवढेच समर्पक आणि प्रेरणादायी आहेत, जितके ते त्यांच्या जीवनकाळात होते. कार्यक्रमात उपस्थित अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीही स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली तसेच त्यांचे आदर्श आपल्या जीवनात अंगीकारण्याचा संकल्प व्यक्त केला. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव कादर नवाज खान, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रा. अवधेश कुमार यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लक्ष्मीबाई वाघमारे यांचे निधन



**सावंगी मेघे** -सावंगी मेघे ( वर्धा) येथील रहिवासी श्रीमती लक्ष्मीबाई यंकंतराव वाघमारे (वय १०५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली, नातवंडे तसेच आप्तपरिवार असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सावंगी मेघे येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना विविध सेवांसाठी प्रोत्साहनपर अनुदान

**वर्धा/जनमाध्यम**

खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना कृत्रिम रेतन सेवा पुरविण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना राष्ट्रीय गोकुळ अभियानातर्गत कृत्रिम रेतन व लसीकरणाच्या नोंदी भारत पशुधन प्रणालीवर केल्याप्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.

पशुधनाची गुणवत्ता सुधारणे आणि ग्रामीण भागात कृत्रिम रेतन व लसीकरण सेवांचा विस्तार करणे हा या योजनेचा उद्देश असून खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांनी केलेल्या कामाची नोंद भारत पशुधन प्रणालीवर करणे अनिवार्य आहे. यासाठी खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांनी गायी म्हशींना कृत्रिम रेतन करुन प्रणालीवर नोंद घेतल्यास ५० रुपये, कृत्रिम रेतनामुळे वासरु जन्माला आल्यास त्यांची नोंद घेतल्यास १०० रुपये, गायवर्ग, म्हैसवर्ग व वराह यांना टॅगिंग करुन नोंद घेतल्यास ५ रुपये, शेळ्या-मेढ्यांचे टॅगिंग करुन नोंद घेतल्यास ३ रुपये, मोठ्या जनावरांचे लाळखुरकत लसीकरण गायवर्गीय, म्हैसवर्गीय व वराहवर्गीय जनावरांच्या लसीकरणाची नोंद घेतल्यास ५ रुपये, शेळया -मेंढ्याचे लाळखुरकत लसीकरण करुन नोंद घेतल्यास ४ रुपये, बुसेल्ला लसीकरण करुन नोंद घेतल्यास ५ रुपये, पीपीआर लसीकरण करुन नोंद घेतल्यास ४ रुपये, वराहांचे स्वाईन फीव्हर लसीकरण करुन नोंद घेतल्यास ५ रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.

राज्यातील पशुधनाची उत्पादकता वाढविण्यासाठी आणि विविध संसर्गजन्य आजारांपासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी कृत्रिम रेतन व लसीकरण मोहिम अत्यंत महत्वाची आहे. जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञानी या राष्ट्रीय मोहिमेत सहभाग नोंदवावा. त्यांनी केलेल्या सर्व कामांच्या नोंदी भारत पशुधन प्रणाली वर अचूकपणे कराव्यात, जेणेकरुन त्यांना प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ गतीने मिळू शकेल., असे जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्तांनी कळविले आहे.


## वेळीच तक्रार... अन् फसवणुकीचे तब्बल ४९ हजार ५६६ रुपये परत

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

ऑनलाइन सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांमध्ये वेळीच तक्रार आणि योग्य पाठपुरावा केल्यास गमावलेली रक्कम परत मिळू शकते, याचे उदाहरण आष्टी तालुक्यातील किन्हाळा येथे समोर आले आहे. आर्थिक साक्षरता केंद्र, आर्वीच्या प्रयत्नांमुळे सायबर फसवणुकीतील तब्बल ४९ हजार ५६६ रुपये लाभार्थ्याच्या खात्यात परत जमा करण्यात यश आले.

किन्हाळा येथील रुपेश रामचंद्र मोहोड यांची १८ जून रोजी संशयास्पद एपीके (APK) फाईल डाउनलोड केल्यानंतर ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाली होती. फसवणुकीची माहिती मिळताच त्यांनी आर्थिक साक्षरता केंद्र, आर्वी येथे संपर्क साधला. केंद्राने तातडीने आवश्यक मार्गदर्शन करत संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा सुरू केला. तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि वेळेत तक्रार नोंदविण्याच्या प्रक्रियेतही मदत केली.

या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळत १ जुलै रोजी फसवणुकीतील संपूर्ण ४९ हजार ५६६ रुपयांची रक्कम रुपेश मोहोड यांच्या बँक खात्यात परत जमा झाली. पैसे परत मिळाल्याने त्यांनी आर्थिक साक्षरता केंद्र, आर्वीचे आभार मानत केंद्राच्या तत्पर आणि प्रभावी कार्याची प्रशंसा केली. यावेळी आर्थिक साक्षरता केंद्र, आर्वीचे केंद्रचालक मंगेश पांडे यांनी नागरिकांना ऑनलाइन व्यवहार करताना विशेष सतर्क राहण्याचे आवाहन केले. कोणतीही संशयास्पद एपीके फाईल, लिंक किंवा अज्ञात ॲप डाउनलोड करू नये. सायबर आर्थिक फसवणूक झाल्यास विलंब न करता तातडीने तक्रार नोंदवून आर्थिक साक्षरता केंद्राशी संपर्क



साधावा. वेळेत केलेली कारवाई आणि योग्य पाठपुरावा केल्यास फसवणुकीची रक्कम परत मिळण्याची शक्यता वाढते, असे त्यांनी सांगितले.

## ट्रेलरच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

आर्वी - समोरून भरधाव येणाऱ्या ट्रेलरने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. हा अपघात देऊरवाडा मार्गावरील शीतला माता मंदिराजवळ घडला. प्रमोद रामदास कळंबे (५२, रा. भादोड पुनर्वसन) हे दुचाकीने आर्वीहून भादोडकडे जात होते. त्यावेळी समोरून येणाऱ्या जीजे-२७-टीएफ-९६४० क्रमांकाच्या ट्रेलरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. धडकेमुळे प्रमोद कळंबे रस्त्यावर फेकले गेले व गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तातडीने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. अपघातानंतर ट्रेलरचालकाविरुद्ध पोलिसांत तक्रार नोंदविण्यात आली असून पोलिसांनी अपघाताचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

## पद्म पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

**वर्धा/जनमाध्यम**

भारतातील दुस-या क्रमांकाचा असलेला नागरी सर्वोच्च पद्म पुरस्कार सन २०२६ साठी ३१ जुलै पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात प्रस्ताव सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रस्तावातील शिफारस करतांना संबंधित क्षेत्रातील अत्युत्कृष्ट कार्य हा निकष असावा. उल्लेखनीय कार्यामध्ये समाजसेवा हाही एक घटक असावा. पद्म पुरस्कार हा भारतातील दुस-या क्रमांकाचा सर्वोच्च सन्मान असल्याने मान्यवरांची शिफारस करतांना शिफारस केलेल्या मान्यवरास त्याच्या कार्यक्षेत्रात यापुर्वी कोणते राष्ट्रीय, राज्य पुरस्कार मिळाले आहेत काय विचार व्हावा. पुरस्कारासाठी नावे सुचवितांना सामाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, महिला, दिव्यांग व्यक्ती व कमकुवत घटकामधील प्रतिभासंपन्न व्यक्तींचाही विचार व्हावा.

मरणोत्तर पुरस्कारासाठी शक्यतो शिफारस करु नये. मात्र उच्चतम गुणवत्तेच्या अपवादात्मक प्रकरणांमध्ये जानेवारी २०२६ नंतर निधन झालेल्या व्यक्तींची शिफारस करता येईल. पद्मभूषण पुरस्कारासाठी मान्यवरांची शिफारस पद्मश्री पुरस्कार प्राप्त केल्यानंतर ५ वर्षांने करता येईल. तसेच पद्मविभूषण पुरस्कारांसाठी मान्यवरांची शिफारस पद्मभूषण प्राप्त केल्यानंतर ५ वर्षांनी करता येईल. तथापि ही मर्यादा अपवादात्मक प्रकरणांमध्ये शिथिल करण्याचा विचार करता येईल. शासकीय सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रमातील डॉक्टर व वैज्ञानिक वगळता अन्य कर्मचारी, अधिकारी पद्म पुरस्कारासाठी पात्र नाहीत, असे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

## गांधी-विनोबांच्या मूल्यांचा शतकभर जपलेला वारसा : महिला आश्रम


# खादीच्या धाग्याची वीण शंभर वर्षानंतरही मजबूत

**वर्धा**-महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे आणि जमनालाल बजाज यांच्या विचारांचा वारसा जपत शिक्षण, संस्कार, स्वावलंबन आणि खादीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणारे महिला आश्रम हे वर्ध्यातील एक आगळेवेगळे शैक्षणिक केंद्र आहे. सन २०२४ मध्ये संस्थेने शताब्दी वर्ष पूर्ण करत मूल्याधिष्ठित शिक्षणाची शंभर वर्षांची यशस्वी परंपरा पूर्ण केली.

सन १९२४ मध्ये शांताबाई रानीवाला यांनी विधवा महिलांच्या शिक्षण व पुनर्वसनाच्या उद्देशाने संस्थेची स्थापना केली. पुढे १५ जानेवारी १९३३ रोजी विनोबा भावे यांच्या कन्या आश्रमाचे महिला आश्रमात विलीनीकरण झाल्यानंतर संस्थेच्या कार्याला नवे बळ मिळाले. स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबांना आधार देणे, महिलांना शिक्षणाद्वारे स्वावलंबी बनविणे आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देणे हे संस्थेचे प्रमुख ध्येय राहिले.

रमाबहन रुइया (मामीजी) यांच्या नेतृत्वाखाली महिला आश्रमाने गांधीवादी जीवनमूल्ये कृतीतून जोपासली. खादीचा स्वीकार, सूत कताई, श्रमदान, शेती, सर्वधर्म प्रार्थना आणि साधी जीवनशैली हे संस्थेच्या संस्कारांचे अविभाज्य घटक बनले. १९५६ मध्ये अध्यापिका विद्यालयाची स्थापना करून हजारो महिलांना शिक्षक म्हणून घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्थेने केले. उत्तरोत्तर महिला सेवा मंडळाच्या माध्यमातून शिशुविहार, प्राथमिक, माध्यमिक व अध्यापक विद्यालयांसह विविध शैक्षणिक संस्था निर्माण झाल्या व यशाच्या शिखरावर पोहचल्या.

आज संस्थेचे मंत्री पवन रुइया व संचालक मंडळाने शतकापूर्वी रुजविलेली मूल्यांची परंपरा तितक्याच निष्ठेने पुढे नेली जात आहे. शंभर वर्षांच्या प्रदीर्घ प्रवासात महिला आश्रमने आपल्या मूलभूत मूल्यांमध्ये कोणताही बदल होऊ दिला नाही. बदल झाला तो केवळ विद्यार्थ्यांसाठीच्या आधुनिक सुविधा आणि शैक्षणिक संसाधनांमध्ये. काळाच्या गरजेनुसार अत्याधुनिक इमारती, डिजिटल वर्ग, संगणक कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालये, क्रीडांगणे आणि स्वच्छतागृहे अन्य सुविधा उभारण्यात आल्या मात्र संस्थेचा ऐतिहासिक आणि वैचारिक वारसा तितक्याच संवेदनशीलतेने सांभाळला गेला. अध्यापिका विद्यालयाची देखणी जुनी इमारत आजही 'ओल्ड हेरिटेज' म्हणून दिमाखात उभी आहे, तर विनोबांनी गीताई लिहिलेले प्रार्थना भवन आजही प्रेरणेचे पवित्र स्थान म्हणुन जपले आहे. संस्थेची शिस्त, साधेपणा आणि खादीप्रेम संस्थेच्या व येथील माणसांच्या कणाकणात रुजले आहे. पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी आणि सुमारे चार हजार विद्यार्थी अभिमानाने खादीचा गणवेश परिधान करतात. इंग्रजी माध्यमाच्या वाढत्या आकर्षणाच्या काळातही महिला सेवा मंडळाच्या शाळांमध्ये प्रवेशासाठी मोठी मागणी आहे. शासकीय मर्यादा



असतानाही संस्था स्वतःच्या निधीतून अतिरिक्त शिक्षकांची नियुक्ती करून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ देत नाही. ग्रामीण, आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत खादीचे गणवेश, आर्थिक मदत आणि आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. अध्यापिका विद्यालयातील गरजू विद्यार्थिनींना प्रवासभत्ता व खादीचे गणवेश संस्थेकडून दिले जातात त्यामुळे ग्रामीण भागातील मुलींना आर्थिक दृष्ट्या मोठा दिलासा मिळतो.

महिला आश्रमात केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षणच नव्हे, तर मन, मेंदू व मनगट मजबूत करणारे कौशल्याधारित शिक्षण, क्रीडा, संस्कार, श्रमप्रतिष्ठा, स्त्री-पुरुष समानता आणि सर्वधर्मसमभाव यांनाही तितकेच महत्त्व दिले जाते. त्यामुळे येथील विद्यार्थी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. देश-विदेशात विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत.विद्यार्थी उत्तम नागरिक घडावा, त्याच्यामध्ये मूल्यांची रुजवणूक व्हावी यासाठी सातत्याने ही संस्था प्रयत्नशील असते, आजही आहे, उद्याही असेल कारण मूल्य ही महिला आश्रमच्या मातीतच रुजलेली आहेत, शांताबाई रानीवाला व रमाबहन यांच्या अमूल्य विचारांचा ठेवा सतत प्रवाहीत राहो व शंभर वर्षपूर्ती नंतरही महिला आश्रम दैदीप्यमान प्रगती करीत राहो हीच सदिच्छा.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २१९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# गोवंशांच्या अवैध कत्तली प्रकरणी कठोर कारवाई करा

## हिंदुत्ववादी संघटनांचे पोलीस आयुक्तांना निवेदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** गोवंशीय पशूंच्या कथित अवैध कत्तलीचे गंभीर प्रकरण समोर आल्याचा दावा करण्यात आला असून, या प्रकरणात संबंधित आरोपीं विरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी हिंदुत्ववादी संघटनांनी पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात म्हटले आहे कि, हे प्रकरण केवळ अवैध कत्तलीपुरते मर्यादित नसून, संघटित स्वरूपातील अवैध वाहतूक, आर्थिक फायद्यासाठी कार्यरत असलेल्या कथित गुन्हेगारी साखळीशी संबंधित असू शकते. त्यामुळे तपास यंत्रणांनी सर्व संबंधित पैलूंची सखोल चौकशी करून दोषींविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा, प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा, भारतीय न्याय संहिता तसेच इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच तपासादरम्यान संघटित गुन्हेगारीचे पुरावे आढळल्यास त्यानुसार संबंधित कठोर कायदेशीर तरतुदींचाही विचार करावा, आरोपींना तातडीने अटक करण्यात यावी. कथित अवैध कत्तलीसाठी वापरण्यात आलेली ठिकाणे त्वरित सील करण्यात यावीत.संबंधित वाहने, मोबाईल, सीसीटीव्ही फुटेज, जीपीएस नोंदी आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यात यावी.



संपूर्ण नेटवर्क, आर्थिक लाभार्थी, वाहतूक करणारे आणि कथित संरक्षण देणाऱ्या व्यक्तींची भूमिका तपासण्यात यावी. जप्त करण्यात आलेल्या साहित्याची फॉरेन्सिक तपासणी करण्यात यावी. तपासात कोणत्याही अधिकारी, कर्मचारी किंवा इतर प्रभावशाली व्यक्तींचा सहभाग आढळल्यास त्यांच्याविरुद्धही कायद्यानुसार समान कारवाई करण्यात यावी.या प्रकरणात निष्पक्ष व पारदर्शक तपास झाला नाही, तर संबंधित प्रकरण राज्यस्तरीय यंत्रणा, न्यायालय तसेच इतर सक्षम प्राधिकरणांसमोर मांडण्यात येईल.

निवेदन देताना अजित पाल सिंग मोंगा, निषाद जोध, डॉ. कंवलजीत पांडे, अनिल साहू, सुधीर बोपुलकर, सोजल हिंगणे, निलेश चंद्रमुनी, संगम गुप्ता, सुरज धारू आणि महेश यांच्यासह विविध पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# अवैध दारू विक्रेत्यावर धाड, १.१० लाखांचा मुद्देमाल जप्त

## अंजनगाव सुर्जी पोलिसांची कामगिरी

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अवैध दारू विक्रीविरोधात अंजनगाव सुर्जी पोलिसांनी धडक कारवाई करत एका दारू विक्रेत्याला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून देशी दारूचा साठा, दुचाकी आणि मोबाईल असा एकूण १ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ जुलै रोजी अवैध धंद्यांवरील कारवाईसाठी पोलिस पथक गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली. खोडगावकडून पांढरी-खानमपूर मार्गावर एक व्यक्ती मोटारसायकलद्वारे अवैधरित्या देशी दारू विक्रीसाठी वाहतूक करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला. खोडगाव रोड परिसरात संशयिताला अडवून चौकशी केली असता त्याने आपले नाव अभिजीत दीपक गायगोले (वय २८, रा. गुलजारपुरा, अंजनगाव सुर्जी) असे सांगितले. त्याच्या ताब्यातील दोन प्लास्टिक पोत्यांची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात देशी दारू आढळून आली. तपासणीदरम्यान गोल्डन संत्रा कंपनीच्या ९० एमएलच्या १०० सीलबंद पावट्या (किंमत ५ हजार रुपये) तसेच टँगोपंच कंपनीच्या ९० एमएलच्या १०० सीलबंद पावट्या (किंमत ५ हजार रुपये) असा एकूण १० हजार रुपयांचा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला. याशिवाय दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली एमएच-२७/डीडब्ल्यू-२५९७



क्रमांकाची होंडा युनिकॉर्न दुचाकी (किंमत ९० हजार रुपये) आणि एक अँड्रॉइड मोबाईल (किंमत १० हजार रुपये) असा एकूण १ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. चौकशीदरम्यान आरोपीने हा दारूसाठा अंजनगाव सुर्जी येथील लाला चौक परिसरातील भट्टीतून आणल्याचे सांगितले. त्यानुसार भट्टीचा व्यवस्थापक नितेश गणेशराव बुंदिले (वय ३६, रा. कोकाटखेल, अंजनगाव सुर्जी) याचाही या प्रकरणात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (अ) व (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोडेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सूरज बोंडे, पोलीस उपनिरीक्षक भारत चिरडे, पोहेकॉ जयसिंग चव्हाण, पोलीस कॉन्स्टेबल आकाश रंगारी व मोहसिन पठाण यांनी केली.

# नांदगाव खंडेश्वर शहर काँग्रेस अध्यक्षपदी अमोल धवसे यांची पुन्हा नियुक्ती

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** नांदगाव खंडेश्वर शहर काँग्रेस अध्यक्षपदी अमोल धवसे यांची पुन्हा एकदा नियुक्ती करण्यात आली . काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर शहर संघटनेची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवत त्यांच्या निष्ठावान कार्याची, प्रामाणिकपणाची आणि संघटन कौशल्याची पावती दिली आहे.



अमोल धवसे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहून सामान्य कार्यकर्ता ते शहर नेतृत्वापर्यंतचा प्रवास केला आहे. सर्वसामान्य नागरिकांशी असलेला जिव्हाळ्याचा संपर्क, सामाजिक बांधिलकी आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने केलेले कार्य यामुळे त्यांनी शहरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. माजी आमदार वीरेंद्र जगताप यांचे निष्ठावान व विश्वासू सहकारी म्हणून अमोल धवसे यांची तालुक्यात ओळख आहे. नांदगाव नगरपंचायत निवडणुकीत शहर काँग्रेस अध्यक्ष म्हणून त्यांनी पक्ष संघटना मजबूत करत काँग्रेसचे सर्वाधिक पाच नगरसेवक निवडून आणण्यात महत्त्वाची भूमिका होती. पक्ष संघटन वाढविणे, कार्यकर्त्यांना एकत्र ठेवणे आणि जनतेशी सातत्याने संपर्कात राहणे या त्यांच्या कार्यपद्धतीमुळे काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर पुन्हा विश्वास दाखवला आहे. आपल्या पुनर्नियुक्ती बद्दल अमोल धवसे यांनी काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी आमदार वीरेंद्र जगताप, माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर, अमरावती जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे तसेच महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप यांचे आभार मानले.

यापुढेही काँग्रेस पक्षाची विचारधारा आणि सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी अधिक जोमाने काम करून शहरातील संघटन मजबूत करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# भाचीवर अत्याचार करणाऱ्या चुलत मामाला पाच वर्षाची शिक्षा

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक २ वाय गोस्वामी यांनी आपला निर्णय देताना भाचीसोबत अत्याचार करणाऱ्या चुलत मामा आरोपी मंगेश दशरथ गायकवाड (वय ३०, दशरा मैदान झोपडपट्टी ) याला ५ वर्ष सक्त मजुरी व १० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंड न भरल्यास तीन महिने अतिरिक्त करावास राहणार आहे. तसेच १० हजार रुपये नुकसान भरपाई पिडितेला देण्याचे आदेश दिले आहे. दोषारोप पत्रानुसार १ मे २०१५ रोजी पीडिता घरी एकटी होती. तिचे सात वर्षाची आई-वडील कामावर गेले होते. पीडितेची आजारी जेवणाचा डबा घेऊन आली तेव्हा पीडिता पलंगावर विवस्त्र झोपली होती. घरी कोणी नसताना आरोपीने तिच्यासोबत अत्याचार केला होता. घटनेनंतर आजीने राजापेठ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली आणि आरोपीवर गुन्हा दाखल झाला. तपास पीएसआय के. एम. बन्सा व पीएसआय. व्ही. डी. चव्हाण यांनी केला.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला पाच वर्ष सक्त मंजुरी आणि दहा हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. एकूण १९ साक्षीदार तपासण्यात आले. सरकारी पक्षाकडून एड. शशिकिरण पलोड यांनी यशस्वी युक्तिवाद केला. न्यायालयीन पैरवी मध्ये एएसआय कनोजिया व अरुण हटवार यांनी मदत केली.



# नीलगायीची शिकार उघडकीस; तिघांना अटक

## -वन विभागाची कारवाई,

### डाबका तलाव परिसरात आढळली मृत नीलगाय

**धारणी/प्रतिनिधीः-** सुसर्दा वनपरिक्षेत्रातील डाबका तलावाजवळ मृत अवस्थेत आढळलेल्या नर नीलगायीच्या शिकारीप्रकरणी वन विभागाने तातडीने कारवाई करत तिघा संशयितांना अटक केली आहे. अनिल रामलाल कास्देकर (वय ३१), सोनाजी उर्फ भिल्या कुंजीलाल भिलावेकर आणि अनारसिंग सुखराम सावलकर (सर्व रा. डाबका, ता. धारणी) अशी आरोपींची नावे आहेत. या घटनेमुळे मेळघाट परिसरात खळबळ उडाली आहे.

वन विभागाला १ जुलै रोजी जाणपाणी बिटमधील वनखंड क्रमांक ११८३ परिसरात डाबका तलावाजवळ एक नर नीलगाय मृतावस्थेत पडल्याची माहिती मिळाली होती. वनकर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली असता नीलगायीचा उजवा पाय आणि उजवे शिंग कापलेले आढळून आले. यावरून शिकारीचा संशय बळावला.

वन विभागाने घटनास्थळी पंचनामा, जप्तीनामा व इतर आवश्यक कार्यवाही करून वनगुन्हा नोंदविला. त्यानंतर २ जुलै रोजी पशुधन विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत नीलगायीचे शवविच्छेदन करण्यात आले. तपासासाठी आवश्यक अवयवांचे नमुने जप्त करून सीलबंद करण्यात आले.

पशुवैद्यकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृत नीलगायीची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली. दरम्यान, ३ जुलै रोजी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे वन विभाग आणि क्राईम सेलच्या संयुक्त पथकाने डाबका गाव परिसरात धाड टाकली.

या कारवाईत तिघांना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून ही कारवाई मेळघाटचे उपवनसंरक्षक आणि सहाय्यक वनसंरक्षक, धारणी यांच्या मार्गदर्शनाखाली सुसर्दा वनपरिक्षेत्राच्या पथकाने केली.

# तडीपार आरोपीचा विळयाने युवकावर हल्ला; परस्परविरोधी गुन्हे दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगाव–चांदूर बाजार मार्गावरील सती मंदिर परिसरात किरकोळ वादातून झालेल्या हाणामारीचे हिंसक रूपांतर होऊन तडीपार आरोपीने विळयाने केलेल्या हल्ल्यात एक युवक गंभीर जखमी झाला. या घटनेत हल्लेखोर आरोपीदेखील जखमी झाला असून, दोघांच्या तक्रारींवरून वलगाव पोलिसांनी परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २ जुलैच्या रात्री सती मंदिर परिसरात राहणाऱ्या नवेद खान (वय २८) याचा शेख नदीम शेख नबी (वय २८, रा. सतीनगर, वलगाव) याच्याशी वाद झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर शेख नदीम याने विळयाने हल्ला केल्याचा आरोप असून, त्यात नवेद खान गंभीर जखमी झाला. जखमी अवस्थेत त्याला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, या झटापटीत शेख नदीम हाही जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच वलगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी दोन्ही जखमींना उपचारासाठी रुग्णालयात हलवून घटनेचा तपास सुरू केला.

विशेष म्हणजे, शेख नदीम याला यापूर्वी पोलीस प्रशासनाने तडीपार केले होते. असे असतानाही तो वलगावातील सतीनगर परिसरात वास्तव्यास असल्याची बाब समोर आली आहे. त्याच्याविरुद्ध यापूर्वीही विविध गुन्हे दाखल असून तो सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

या प्रकरणात नवेद खान यांच्या फिर्यादीवरून एक गुन्हा, तर शेख नदीम यांच्या तक्रारीवरून दुसरा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे पोलिसांनी परस्परविरोधी गुन्ह्यांची नोंद करून घटनेमागील नेमके कारण, वादाची पार्श्वभूमी आणि हल्ल्याचा संपूर्ण घटनाक्रम उघड करण्यासाठी तपास सुरू केला आहे.

**तडीपार आरोपी पुन्हा परिसरात कसा?**-तडीपार आदेश असतानाही शेख नदीम वलगाव परिसरात वास्तव्यास असल्याची बाब समोर आल्याने पोलिसांच्या देखरेख व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४०६/२०२६ ने.ता.१७.०८.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती तिजा बोंदर पाठेकर, वय ७० वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.संतोष बोंदर पाठेकर, वय ५२ वर्षे, धंदा - व्यवसाय
३. श्री.राजू बोंदर पाठेकर, वय ४९ वर्षे, धंदा - व्यवसाय
सर्व रा.गायत्री नगर, झिंगाबाई टाकळी, नागपूर, ता.जि.नागपूर
४. सौ.इंदिरा बनतराव हिंगवे, वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.महिलावाडी, ता.मुलताई, जि.बैतूल (म.प्र.)

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार-** श्री.भोजराज बोंदर पाठेकर, वय ५५ वर्षे, धंदा - व्यवसाय
रा.प्लॉट नं.२, गोधनी रोड, प्रकाश नगर, झिंगाबाई टाकळी, नागपूर

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ चे वडील तसेच गैरअर्जदाराचे वडीलनामे **बोंदर सिताराम पाठेकर** हे दि.**१६.०९.२०२५** रोजी त्यांचे राहते घरी नागपूर, ता.जि.नागपूर येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०३.०७.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३९८/२०२६ ने.ता.१२.०८.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती माधुरी श्रीकृष्ण हटवार, वय ३५ वर्षे, धंदा - घरकाम
२. कु.अमृता श्रीकृष्ण हटवार, वय १५ वर्षे, धंदा - शिक्षण
३. वेदांत श्रीकृष्ण हटववार, वय १३ वर्षे, धंदा - शिक्षण
४. श्रीमती बेबीताई विष्णुजी हटवार, वय ७० वर्षे, धंदा - घरकाम
अर्जदार नं.२ व ३ करीता अ.पा.क.र्आ अर्जदार नं.१
सर्व रा.पेठपुरा, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील तर अर्जदार नं.४ चा मुलगा नामे **श्रीकृष्ण विष्णुजी हटवार** हे दि.**२१.०४.२०२६** रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०३.०७.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३९९/२०२६ ने.ता.१२.०८.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.सुनिल बस्तीराम उईके, वय ५२ वर्षे, धंदा - शेती
२. श्री.अनिल बस्तीराम उईके, वय ४१ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार-** कोणीही नाही

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे आजोबा नामे **चैतराम मंगल उईके** हे दि.**२१.०३.१९९५** रोजी त्यांचे राहते घरी खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच अर्जदाराचे वडील **बस्तीराम चैतराम उईके** हे दिनांक **०४.११.२०००** रोजी त्यांचे राहते घरी खानापूर येथे मरण पावलेले आहेत.त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०३.०७.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४१४/२०२६ ने.ता.१९.०८.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.मनोहर विठ्ठलराव येवले
वय ५४ वर्षे, धंदा - शेती
रा.खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार-** कोणीही नाही

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील नामे **विठ्ठल पुंजाजी येवले** हे दि.**०१.१२.२००१** रोजी खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच अर्जदाराचे आई नामे **यशोदाबाई विठ्ठलराव येवले** ही दिनांक **०२.०४.२०२१** रोजी खानापूर येथे मरण पावलेले आहेत.त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०३.०७.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४१५/२०२६ ने.ता.१९.०८.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.मनोहर विठ्ठलराव येवले
वय ५३ वर्षे, धंदा - शेती
रा.खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार-** कोणीही नाही

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराची मावशी नामे **पुनाबाई विठ्ठलराव वाटकर** ही दि.**२५.०८.२०११** रोजी खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०३.०७.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**

## CHANGE IN NAME

**OLD NAME**
ABDUL MUJEEB

**NEW NAME**
ABDUL MUJIB ABDUL HAMID

**-ADDRESS-**
REHAN PARK,
MORSHI-444905

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २९८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**नोटीस देणार - सरफराज सलाहोद्दीन काझी अजीजोद्दीन**
Sarfaraz Salahuddin Quazi Azizuddin
**वय ६५ वर्षे, धंदा - वैद्यकीय**
**जामा मस्जिद जवळ यासीनपुरा, दर्यापूर,**
**ता.दर्यापूर, जि.अमरावती**

**तर्फे - ॲड.डी.बी.अग्रवाल**
**मुर्तिजापूर रोड, गणेशपूर**
**ता.दर्यापूर, जि.अमरावती**

**मी खालील** सही करणार जाहीर नोटीस देतो की,

१. आमचे उपरोक्त पक्षकार हे डॉक्टर असून त्यांचे नांव **सरफराज सलाहोद्दीन काझी अजीजोद्दीन** Sarfaraz Salahuddin Quazi Azizuddin असे आहे. हे नांव त्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, शाळेचे टी.सी.वर नमुद आहे. परंतु महाराष्ट्र स्टेट बोर्ड, पुणे यांनी पाठविलेल्या प्रमाणपत्रात **सरफराज अजीजोद्दीन** Sarfaraz Salahuddin Quazi Azizuddin असे दर्शविण्यात आले आहे. त्यांचे प्रोटोकॉल नुसार अडनांव हे समोर घ्यावे लागते. म्हणून **सरफराज सलाहोद्दीन काझी अजीजोद्दीन** Quazi Sarfaraz Salahuddin Azizuddin चे जागी काझी सरफराज सलाहोद्दीन अजीजोद्दीन Quazi Sarfaraz Salahuddin Azizuddin असे दर्शविण्यात आले आहे. ही दोन्ही नांवे एकाच व्यक्तिची असून बोर्डाच्या नियमानुसार काझी अडनांव समोर दर्शविले आहे. या नावाबाबत कोणाला काही आक्षेप असल्यास खालील पत्त्यावर कळवावे.

करीता जाहीर नोटीस दिली आहे.

(ॲड.डी.बी.अग्रवाल, गणेशपुर)
मो.७५८८०८५२०१

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४१२/२०२६ ने.ता.१८.०८.२०२६

**अर्जदार -**
१. श्री रामहरी उकंडराव पारीसे,, वय ८२ वर्षे, धंदा - शेती
२. श्री.विठ्ठल उकंडराव पारीसे, वय ७६ वर्षे, धंदा - शेती
३. श्री.किसना उकंडराव पारीसे, वय ५७ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. श्री.लक्ष्मण उकंडराव पारीसे, वय ७९ वर्षे, धंदा - शेती
रा.देवरा, ता.जि.अमरावती
५. अलका मारोतराव पाचारे, वय ८० वर्षे, धंदा - घरकाम
रा.हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
६. सुमित्रा अंबादासराव नांदणे, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.लाडकी बु., ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराची आई नामे **देवकाबाई उकंडराव पारीसे** हे दि.**१९.०९.१९९४** रोजी **पाळा,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०३.०७.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

प्रो.नं.१६२४/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.०४.०७.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./२७३/२०२६ दिनांक ०३.०८.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. दीपाताई विजयराव पवार, वय ६८ वर्षे, धंदा - घरकाम
२. शुभांगी प्रशांत मालपे, वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.माळीपुरा, जुनी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती
३. शितल उमाकांत चिंचोळकर, वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.केशव नगर, अकोला, ता.जि.अकोला
४. धनश्री श्रीधर श्रीखंडे, वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.प्रभु विहार दर्गा जवळ साईनगर, अमरावती
५. भूषण विजयराव पवार, वय ४१ वर्षे, धंदा - शेती
अ.नं.१ व ५ रा.नांदेड बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती
६. तृप्ती वैभव निमकर, वय ३९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.शिक्षक कॉलनी, प्रल्हादपूर चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **विजय मोतीराम पवार** हे दिनांक **०७.०३.२०२५** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **विजय मोतीराम पवार** यांचे नांवे अ) मौजा नांदेड बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील ग्रा.पं.मालमत्ता क.९५, क्षेत्रफळ ९१२ चौ.फुट ब) मौजा नांदेड बु. ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील ग्रा.पं.मालमत्ता क.२२९, क्षेत्रफळ २६४० चौ.फुट, क) मौजा नांदेड बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट क.३८१ यात मृतकाचे क्षेत्र ० हे.१८ आर. पो.ख.०.०१ येणे वर्णनाची ग्रामीण भागातील मालमत्ता असून त्याची बाजारभाव किंमत रु.२५,०००/- एवढी आहे.

आज दि.०४.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### स्वराध्याने श्रोत्यांना केले मंत्रमूग्ध



**अमरावती-** विदर्भात नामांकित असलेल्या स्वराध्या एंटरटेनमेंटने नुकताच स्थानिक जोशी हॉलमध्ये नवोदिताना संगीत क्षेत्रात संधी मिळावी म्हणून' गाणी जुनीच पण आवाज नवा' हा कार्यक्रम आयोजित केला होता. यात अनेक नवीन व जुन्या गायकांनी सहभाग घेऊन श्रोत्यांच्या टाळ्या घेतल्या तर याच वेळी स्वराध्या दिनकर तायडे या चिमुकलीने नायक या चित्रपटातील गीत गाऊन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. काही दिवसापूर्वीच स्व. लता मंगेशकर यांची ५१ गाणी व स्व. आशा भोसले यांची ३५ गाणी फर्मच्या संचालिका स्वामिनी दिनकर तायडे हिने तर कुमार सानू यांची ३१ गाणी संचालक दिनकर तायडे ह्यांनी नॉनस्टॉप गाऊन शहरात विक्रम नोंदविला. याप्रसंगी सांगितप्रेमी समासेवक गोविंद कासट, वि. दा. पवार, भोजराज काळे (स्वीकृत सदस्य), गजानन अंबाडकर, विजय गायकवाड, मनीष जगताप, चंद्रकांत पोपट यांचा दिलीप हटवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर स्वराध्या गौरव पुरस्कार राजेंद्र वाघमारे, दिलीप डहाके, गणेश बिजवे, जयश्री देशमुख यांना देण्यात आला. कार्यक्रमाला असंख्य सांगितप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धुरा मंगेश ठाकरे यांनी केले.

### भरधाव एसटीची दुचाकीला धडक

**अमरावती-** वलगाव–दर्यापूर मार्गावर शनिवारी दुपारी झालेल्या भीषण अपघातात एका २२ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. भरधाव वेगाने धावणाऱ्या एसटी बसने दुचाकीला धडक दिल्याने हा अपघात घडला. या दुर्घटनेत आकाश ज्ञानेश्वर शिंदे (रा. खारतळेगाव, ता. भातकुली) यांचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, आकाश शिंदे हे दुचाकीवरून आपल्या कामानिमित्त जात असताना खारतळेगाव परिसरात बडनेरा आगाराच्या एमएच-४० वाय-५१८१ क्रमांकाच्या एसटी बसची त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक बसली.

# मनपा आयुक्तांच्या विरोधात सत्ताधारी व विरोधकांचा एल्गार

## पालकमंत्र्यांकडे पदाधिऱ्यांची तकार, अधिकारी-पदाधिकाऱ्यांमध्ये वाद चिघडला

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिकेत प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा उफाळून येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. विकासकामांसाठी निधी उपलब्ध नसल्याचे कारण देत अनेक प्रस्ताव प्रलंबित ठेवले जात असल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येत असून, मनपा आयुक्त वर्षा लढा यांच्या कार्यपद्धतीबाबत वाढत्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे तक्रार करण्यात आल्याची विश्वसनीय माहिती आहे.

महापालिका क्षेत्रातील रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि इतर विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याचे कारण देत अनेक प्रस्तावांना मंजुरी मिळत नाही. त्यामुळे नागरिकांसमोरील मूलभूत समस्या कायम असून, विकासकामे रखडल्याचा फटका थेट नागरिकांना बसत आहे. अनेकवेळा महापौर तेजवानी, पक्षनेता चेतन गावंडे, विरोधी पक्ष नेता विलास इंगोले व सभापतीं अविनाश मार्डीकर यांनी आयुक्तांसोबत या विषयावर चर्चा करण्याचा प्रयत्न केला. या विषयावरून महापौर व आयुक्त यांच्यात खटके उडून शाब्दिक वादही झाला. याशिवाय, प्रत्येक विकासकामाच्या फाईलमध्ये विविध त्रुटी काढून त्या प्रलंबित ठेवल्या जात असल्याने निर्णय प्रक्रियेला विलंब होत असल्याची तक्रारही लोकप्रतिनिधींनी केली आहे. याच पार्श्वभूमीवर सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील काही पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन आयुक्तांच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त केल्याची माहिती समोर येत आहे. पालकमंत्र्यांनीही या तक्रारीची गंभीर दखल घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, नगरसेवक संजय गव्हाळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर या वादाला आणखी वेगळे वळण मिळाले आहे.




गव्हाळे यांनी पत्र परिषद घेऊन हा गुन्हा आकसापोटी दाखल करण्यात आल्याचा आरोप केला. महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय अशा प्रकारची कारवाई होणे शक्य नसते. त्यामुळे गव्हाळे यांच्याविरुद्ध दाखल झालेल्या गुन्ह्यामागे नेमके कोणाचे पाठबळ होते, तसेच संबंधित डॉ. जाधव यांनी कोणाच्या सांगण्यावरून तक्रार दाखल केली, याबाबत विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत. या सर्व घडामोडींमुळे अमरावती महानगरपालिकेत प्रशासन विरुद्ध पदाधिकारी असा संघर्ष पुन्हा एकदा तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### बदलीची चर्चा

एकीकडे अधिकारी, पदाधिकारी यांच्यात वाद तर दुसरीकडे मनपा आयुक्त वर्षा ल यांच्या संभाव्य बदलीचीही चर्चा सुरू झाली आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पावसाळी अधिवेशनानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन बदली संदर्भात आवश्यक प्रशासकीय निर्णय घेतले जातील, असे संकेत दिल्याची माहिती आहे. मात्र याबाबत अद्याप कोणताही अधिकृत आदेश जारी झालेला नाही. यासंदर्भात मनपा आयुक्तांशी संपर्क साधला असता त्यांनी पारिवारिक कार्यक्रमात असल्याचे सांगितले. त्यामुळे बदली संदर्भात मला कुठलीही माहिती नसल्याचे ही त्या म्हणाल्या.

# घरात घुसून तरुणावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला

## गणपती नगरातील घटना; तरुण गंभीर जखमी

**अमरावती-** राजापेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गणपती नगर, लॉर्ड्स हॉटेल परिसरात शुक्रवारी मध्यरात्रीनंतर एका तरुणावर घरात घुसून धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची गंभीर घटना घडली. या हल्ल्यात रुपेश सुरेश भोसले (वय २४, रा. गणपती नगर, लॉर्ड्स हॉटेलजवळ) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास तीन ते चार अज्ञात युवकांनी रुपेश भोसले यांच्या घरात घुसून धारदार शस्त्राने त्याच्यावर सपासप वार केले. या अचानक झालेल्या हल्ल्यात रुपेश गंभीर जखमी झाला. परिसरातील नागरिकांच्या मदतीने त्याला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपासाला सुरुवात केली. जखमीच्या जबाबाच्या आधारे संबंधित हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. दरम्यान, आरोपींचा शोध घेण्यासाठी राजापेठ पोलीस स्टेशनचे डीबी पथक रवाना करण्यात आले असून, हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणाचा पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहेत.

# जनहिताचे प्रश्न मांडल्याने खोट्या तक्रारीत अडकवण्याचा प्रयत्न-संजय गव्हाले



**अमरावती/का.प्र.**

प्रभागातील स्वच्छता, आरोग्य, सांडपाणी, गटार आणि इतर नागरी समस्यांबाबत सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या लोकप्रतिनिधीला खोट्या तक्रारीत अडकवून आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नगरसेवक संजय गव्हाले यांनी शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेत केला. गव्हाले म्हणाले की, प्रभागातील विविध नागरी समस्यांबाबत त्यांनी वेळोवेळी प्रशासनाचे लक्ष वेधले. विदर्भ हौसिंग सोसायटीतील आरोग्यविषयक समस्या, कोणार्क कंपनीच्या कामातील त्रुटी तसेच आरोग्य अधिकारी अजय जाधव यांच्या कार्यपद्धतीबाबत लेखी तक्रारीही करण्यात आल्या. हे प्रश्न महापालिकेच्या सभागृहातही मांडले. मात्र, अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासने देऊनही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याचा आरोप त्यांनी केला. अधिकारी फोन उचलत नाहीत किंवा केवळ आश्वासने देऊन वेळकाढूपणा करत असल्याचे सांगत, जनहिताचे प्रश्न उपस्थित केल्यामुळेच राजापेठ पोलीस ठाण्यात आपल्या विरोधात खोटी तक्रार दाखल करण्यात आल्याचा दावा गव्हाले यांनी केला. लोकप्रतिनिधीचा आवाज दाबण्यासाठी आणि मानसिक त्रास देण्यासाठी हा प्रकार घडवून आणल्याचा आरोपही त्यांनी केला या संपूर्ण प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, तसेच अधिकारांचा गैरवापर करून त्रास देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.पत्रकार परिषदेला पंजाबराव तायडे, इस्माईल लालूवाले, सचिन वैद्य, अक्षय माटे, आशिष लुल्ला आदी उपस्थित होते.

## संविधानानुसार न्याय्य निर्णय घ्यावा
# अन्यथा तीव्र संघर्ष अटळ-निलेश जामठे




**अमरावती/का.प्र.**

अनुसूचित जातींच्या ५९ जातींच्या प्रस्तावित उपवर्गीकरणाच्या विरोधात मुंबई येथील विधानभवनावर भव्य महामोर्चा काढण्यात आला. आयु. आनंद राज आंबेडकर, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाजकल्याण मंत्री बबनराव (नाना) घोलप आणि माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा पार पडला.

उपवर्गीकरणाच्या विरोधासाठी विविध चर्मकार संघटना एकत्र येऊन 'चर्मकार समाज अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोध समिती' स्थापन करण्यात आली. समितीच्या आवाहनाला प्रतिसाद देत राज्यभरातून हजारो समाजबांधव आणि कार्यकर्त्यांनी महामोर्चात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.अमरावती जिल्ह्यातून राष्ट्रीय प्रवक्ते रविंद्र राजुस्कर, प्रदेश उपाध्यक्ष सुधाकर पानझाडे, राज्य कार्यकारिणी सदस्य शामकुमार आकोडे, जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, जिल्हा उपाध्यक्ष मनोहर कोथळकर, तिवसा तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर मोहेकर, ज्ञानेश्वर वानखडे, राजुभाऊ मोहेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

महामोर्चाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिष्टमंडळाची भेट घेऊन निवेदन स्वीकारले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणत्याही जातीवर अन्याय होणार नाही, सर्व संबंधितांशी चर्चा करूनच योग्य निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अमरावती जिल्हाध्यक्ष निलेश जामठे म्हणाले, अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांवर कोणताही आघात आम्ही सहन करणार नाही. सरकारने संविधानाच्या चौकटीत राहून न्याय्य व सर्वसमावेशक निर्णय घ्यावा. अन्यथा समाजाच्या हक्कांसाठीचा लढा अधिक व्यापक आणि तीव्र स्वरूपात उभारला जाईल. गरज पडल्यास समाजबांधवांनी पुढील संघर्षासाठी सज्ज राहावे.' या महामोर्चातून अनुसूचित जाती समाजाची अभूतपूर्व एकजूट राज्यासमोर दिसून आली. शासनाने समाजाच्या भावना लक्षात घेऊन संविधानानुसार न्याय्य निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# संत गुलाबराव महाराज जयंती उत्साहात

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार सोमवार, ६ जुलै रोजी संत गुलाबराव महाराज जयंती राज्यभर विविध स्तरावर उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. शासनाने प्रथमच सन २०२६ पासून संत गुलाबराव महाराज यांच्या जयंतीचा शासकीय कार्यक्रमांच्या यादीत समावेश केला असून, राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.




शासनाच्या परिपत्रकानुसार संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार असून, त्यांच्या विचारांचे स्मरण, जीवनकार्याची माहिती आणि समाजप्रबोधनपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

नांदगाव खांडेश्वर तालुक्यातील लोणी (टाकळी) हे संत गुलाबराव महाराज यांचे जन्मस्थान असल्याने तालुक्यासाठी ही जयंती विशेष अभिमानाची बाब मानली जात आहे. तालुक्यातील विविध शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, सामाजिक व धार्मिक संघटनांकडून जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम, विचारप्रबोधन आणि श्रद्धांजलीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

संत गुलाबराव महाराज यांनी अध्यात्म, तत्त्वज्ञान, भक्ती आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून दिलेला ज्ञानाचा वारसा आजही समाजाला प्रेरणा देणारा आहे. शासनाने त्यांच्या जयंतीचा शासकीय स्तरावर समावेश केल्याने त्यांच्या कार्याला राज्यस्तरीय गौरव प्राप्त झाला असून, याबद्दल विविध स्तरातून समाधान व्यक्त केले जात आहे.

# नेरपिंगळाई विविध कार्यकारी सहकारी संस्थेला 'कृषीरत्न' पुरस्कार

## राज्यस्तरीय सत्कार सोहळयात देवेंद्र फडणविस यांच्या हस्ते करण्यात आले वितरण

**कैलास ठाकूर**

**लेहेगाव-** नेरपिंगळाई विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या कृषी, सहकार व शेतकरी विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठेचा 'कृषीरत्न' पुरस्कार मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय सत्कार सोहळयात मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष संजय सुने यांनी हा मानाचा पुरस्कार स्वीकारला. राज्याच्या राजधानीत झालेल्या या सोहळयात संस्थेचा झालेला गौरव नेरपिंगळाई गावासह संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

नेरपिंगळाई विविध कार्यकारी सहकारी संस्था गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत कार्यरत आहे.

पीककर्जाचे वेळेवर वितरण, कृषी निविष्ठांचा पुरवठा, सभासदांना पारदर्शक सेवा, शासनाच्या विविध कृषी योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच ग्रामीण भागातील सहकार चळवळीला बळकटी देण्यासाठी संस्थेने सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. संस्थेच्या याच उत्कृष्ट कार्याची राज्य शासनाने दखल घेत 'कृषीरत्न' पुरस्काराने गौरव केला.

मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय सत्कार सोहळयात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. या सोहळयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अध्यक्ष संजय सुने यांनी पुरस्कार स्वीकारला. हा क्षण नेरपिंगळाई विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या इतिहासातील एक सुवर्णक्षण मानला जात आहे.



पुरस्कार स्वीकारल्यानंतर अध्यक्ष संजय सुने यांनी हा सन्मान संस्थेच्या सर्व सभासद, संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी आणि परिसरातील शेतकरी बांधवांना समर्पित असल्याची भावना व्यक्त केली. सभासदांचा विश्वास, संचालक मंडळाचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक परिश्रमामुळेच हा बहुमान प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातही शेतकरी हिताच्या अधिक प्रभावी योजना राबवून संस्थेचे कार्य अधिक उंचीवर नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या पुरस्कारामुळे नेरपिंगळाई परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सहकारी क्षेत्रातील मान्यवरांनी अध्यक्ष संजय सुने, संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी आणि सर्व सभासदांचे अभिनंदन केले आहे.

राज्य शासनाने केलेला हा सन्मान ग्रामीण भागातील सहकार चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना व्यक्त होत आहे. मुंबई येथे झालेल्या या राज्यस्तरीय सत्कार सोहळयात मिळालेला 'कृषीरत्न' पुरस्कार हा केवळ संस्थेचा नव्हे, तर नेरपिंगळाई परिसरातील प्रत्येक शेतकरी आणि सहकार चळवळीशी निगडित असलेल्या सर्वांच्या परिश्रमाचा गौरव मानला जात असून, यामुळे संस्थेच्या कार्याला राज्यभर नवी ओळख मिळाली आहे.

# रोटरी क्लबचा नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा

**अचलपूर/वार्ताहर**

रोटरी क्लब अचलपूर तर्फे विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करीत विधानपरिषदेचे आमदार बच्चुभाऊ कडू यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आ.बच्चू कडू, अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेत्या सुरेखा ठाकरे, चांदुर बाजारचे नगरध्यक्ष मनिषा नागलिया, रोटरी क्लब अचलपूर चे अध्यक्ष श्याम मालू,माजी अध्यक्ष गौरव बंसल आदी उपस्थितीत होते.

गुलाब बाग येथे रोटरी क्लब अचलपूर नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा संपन्न झाला. यावेळी विधानपरिषद आ. बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित विद्यार्थ्यांना शालेयपयोगी वह्या चे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणाऱ्या रात्री क्लब अचलपूर चा कार्याचे विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांनी कौतुक करून यापुढे ही सामाजिक उपक्रम क्लब कढून मोठ्या प्रमाणात राबविले जाणार असल्याचा विश्वास व्यक्त केला .यावेळी रोटरी क्लब अचलपूर चे माजी अध्यक्ष गौरव बंसल यांनी २०२५-२६ वर्षात राबविलेले विविध सामाजिक उपक्रमाची माहिती दिली.यामध्ये वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, विद्यार्थ्यांना शालेयपयोगी साहित्याचे वाटप आदी चा समावेश आहे. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेते सुरेखा ठाकरे,नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त करून रोटरी क्लब अचलपूर चे नवीन कार्यकारिणी तील सदस्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी प्रतिष्ठित नागरिक,रोटरी क्लब अचलपूर चे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.



# विकासकामे न झाल्यास खड्ड्यात बेमुदत 'अर्धदफन आंदोलन'

## काँग्रेसचे उपाध्यक्ष गजानन पाथरे यांचा प्रशासनाला इशारा

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी तालुका काँग्रेस कमिटी (ग्रामीण) चे तालुका उपाध्यक्ष गजानन पाथरे (गुरुजी) यांनी प्रशासनाच्या संथ कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. तालुक्यातील अतिशय महत्त्वाच्या आणि प्रलंबित विकासकामांवर तातडीने कारवाई न झाल्यास, १६ जुलै रोजी खचलेल्या खड्ड्यात 'बेमुदत अर्धदफन आंदोलन' करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी अमरावती जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना लेखी निवेदन सादर केले आहे.सादर केलेल्या निवेदनात गजानन पाथरे यांनी प्रामुख्याने तीन अत्यंत महत्त्वाच्या कामांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. १.दर्यापूर उपविभागांतर्गत कापूसतळणी - रत्नापूर बु. - धनेगाव (ग्रा.मा. नं. ६७) रस्ता हा रस्ता पावसाळ्यात पूर्णपणे बंद पडतो. त्यामुळे पावसाळा सुरू होण्यापूर्वी यावर योग्य उपाययोजना करण्यात यावी.२.पूर संरक्षण भिंत व डांबरीकरण. याच रस्त्याला (ग्रा.मा. नं. ६७) नाल्याच्या काठाने १.५०० किमी अंतराची पूर संरक्षण भिंत बांधण्यात यावी, तसेच २ किमी रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे.३. कापूसतळणी - रत्नापूर बु. - वडनेर भुजंग (ग्रा.मा. नं. १२९) रस्ता: या अंदाजे ५ किमी लांबीच्या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करण्यात यावे.



या कामांविषयी दर्यापूर उपविभागीय कार्यालयाकडून आणि स्वतः पाथरे यांच्याकडून यापूर्वी अनेकदा (मे आणि जून २०२६ मध्ये) पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच खासदार बळवंतभाऊ वानखडे आणि आमदार गजाननभाऊ लवटे यांनीही या कामांसाठी शिफारस पत्रे दिली होती. एवढे संदर्भ असूनही प्रशासनाने या अतिआवश्यक विकासकामांवर अजूनपर्यंत कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही, असा थेट आरोप पाथरे यांनी केला आहे.

सततच्या पाठपुराव्यानंतरही प्रशासनाला जाग येत नसल्याने, आता आरपारची लढाई लढण्याचा निर्णय काँग्रेस कमिटीने घेतला आहे. या मागण्यांची दखल घेऊन तातडीने कामे सुरू न झाल्यास, १६ जुलै रोजी ग्रा.मा. नं. ६७ वरील खचलेल्या खड्ड्यात 'बेमुदत अर्धदफन आंदोलन' केले जाईल. या आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास किंवा कोणतीही जीवितहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल, असा स्पष्ट इशारा गजानन पाथरे (गुरुजी) यांनी निवेदनातून दिला आहे.

# वीजखांब कोसळून शेतकरी दाम्पत्यासह दोन मुक्या जीवांचा अंत

## महावितरणवर हलगर्जीपणाचा आरोप





### -मदतीसाठी तडफड, रुग्णवाहिका उशिराने पोहोचल्याने संताप

**धारणी/प्रतिनिधीः-** मेळघाटातील भोकरबर्डी गावात रविवारी घडलेल्या एका भीषण दुर्घटनेने संपूर्ण परिसर सुन्न झाला. जीर्ण झालेला वीजखांब अचानक बैलगाडीवर कोसळल्याने शेतकरी दाम्पत्य आणि त्यांच्या दोन बैलांचा करंट लागून मृत्यू झाला. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून महावितरणच्या निष्काळजी कारभाराविरोधात ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

मृतांमध्ये अमरसिंह बाबू जांबेकर (वय ५०) व त्यांची पत्नी मुन्नीबाई जांबेकर (वय ४५, रा. भोकरबर्डी) यांचा समावेश आहे. त्यांच्यासोबत असलेले दोन्ही बैलही या दुर्घटनेत दगावले. ☞(पान २ वर)

# डिप्रेशनच्या प्रभावामुळे विदर्भात पुढील तीन दिवस पावसाचा जोर

## काही ठिकाणी मुसळधार ते जोरदार सरींची शक्यता

### ७ जुलैनंतर पावसाची तीव्रता कमी होणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** उत्तर बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले ठळक कमी दाबाचे क्षेत्र तीव्र होत डिप्रेशनमध्ये (वादळात) परिवर्तित झाले असून त्याचा प्रभाव विदर्भासह मध्य भारतातील हवामानावर पडण्याची शक्यता आहे. हे डिप्रेशन वायव्य दिशेने सरकत पुढील २४ तासांत ओडिशा व छत्तीसगड परिसर ओलांडून पुढे जाण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

हवामान अभ्यासक प्रा. अनिल म. बंड यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुजरात ते केरळ किनारपट्टीदरम्यान कमी दाबाची द्रोणीय स्थिती☞(पान २ वर)

# गाजीपूर 'क्रशर प्रकरण' तापले; आता संयुक्त चौकशीची मागणी जोरात

## ४८ कोटींच्या दंडानंतरही उद्योग कसा सुरू? महसूल, महावितरण, प्रदूषण मंडळ, खनिकर्म विभागावरही वाढला दबाव

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर येथील कथित बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन आणि त्यानंतर त्याच परिसरात सुरू झालेल्या स्टोन क्रशर प्रकरणाने आता प्रशासनाची कसोटी लागली असून, विविध विभागांच्या हालचालींमुळे या प्रकरणाचा तपास अधिक व्यापक होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. महसूल विभाग, महावितरण आणि भूमी अभिलेख विभागाने स्वतंत्र स्तरावर पडताळणी सुरू केल्याची माहिती समोर येत असतानाच, आता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, खनिकर्म विभाग आणि स्फोटक परवानग्यांशी संबंधित यंत्रणांचीदेखील भूमिका तपासण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, संबंधित उद्योग सुरू होण्यापूर्वी आवश्यक असलेल्या विविध परवानग्या, मंजुऱ्या आणि वैधानिक अटींची पूर्तता प्रत्यक्षात झाली होती का, याचा तपशील आता एकत्रितपणे तपासला जात असल्याचे समजते. त्यामुळे केवळ एका विभागापुरती चौकशी न राहता संपूर्ण प्रशासकीय साखळीच तपासाच्या केंद्रस्थानी येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, संबंधित उद्योगासाठी




सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांतील तपशील आणि प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये काही विसंगती आहेत का, याची छाननी सुरू आहे. त्यासाठी विविध कार्यालयांकडील अभिलेखांची पडताळणी केली जात असल्याचे सांगितले जाते. अधिकृत स्तरावर मात्र याबाबत कोणतीही पुष्टी करण्यात आलेली नाही.

दरम्यान, ४८ कोटी रुपयांच्या दंडाची कारवाई झालेल्या प्रकरणानंतर त्याच परिसरात उद्योग सुरू झाल्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. जर पूर्वीच्या कारवाईतील निष्कर्ष गंभीर स्वरूपाचे असतील, तर त्यानंतर संबंधित परिसरातील नव्या औद्योगिक हालचालींवर कोणत्या पातळीवर देखरेख ठेवण्यात आली, संबंधित परवानग्या कोणत्या आधारावर देण्यात आल्या आणि त्या देताना सर्व विभागांनी आवश्यक पडताळणी केली होती का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे.

प्रशासकीय सूत्रांच्या माहितीनुसार, भूमापनाचा अहवाल या प्रकरणात अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. संबंधित उद्योग प्रत्यक्षात कोणत्या जमिनीवर उभारलेला आहे, जमिनीची मालकी काय आहे आणि महसूल अभिलेखांशी त्याचा ताळमेळ बसतो का, हे स्पष्ट झाल्यानंतर पुढील कारवाईची दिशा ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे भूमी अभिलेख विभागाच्या अधिकृत अहवालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

याचवेळी कथित ब्लास्टिंग बिलांबाबतही चौकशीची चर्चा अधिक तीव्र झाली आहे. खनिज उत्खननाशी संबंधित वैधानिक प्रक्रिया पूर्ण न करता ब्लास्टिंग करण्यात आले होते का, संबंधित नोंदी अधिकृत अभिलेखांमध्ये उपलब्ध आहेत का आणि स्फोटक साहित्याचा वापर नियमानुसार झाला होता का, अशा अनेक मुद्द्यांवर संबंधित यंत्रणांनी स्पष्टीकरण देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

कायद्याच्या जाणकारांच्या मते, जर विविध विभागांच्या अभिलेखांमध्ये विसंगती आढळली, तर स्वतंत्र विभागीय चौकशीपेक्षा संयुक्त चौकशी अधिक परिणामकारक ठरू शकते. अशा चौकशीत महसूल, महावितरण, प्रदूषण नियंत्रण मंडळ, खनिकर्म विभाग तसेच आवश्यकतेनुसार इतर सक्षम प्राधिकरणांचा सहभाग असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

दुसरीकडे, जिल्ह्यात या प्रकरणाची मोठी चर्चा सुरू असून, संबंधित सर्व यंत्रणांनी पारदर्शक भूमिका घ्यावी आणि चौकशी अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणी नागरिकांमधून पुढे येत असल्याचे बोलले जात आहे. अधिकृत माहिती समोर आल्यानंतरच या प्रकरणातील अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या सर्व घडामोडींवर संबंधित उद्योग, संबंधित व्यक्ती तसेच विविध शासकीय विभागांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यांची बाजू उपलब्ध झाल्यास ती प्रसिद्ध करण्यात येईल.

### ■ आता तपासाच्या रडारवर कोणते विभाग?

महसूल विभाग – जमिनीचे अधिकार व परवानग्या.
भूमी अभिलेख विभाग – अधिकृत मोजणी व सीमारेषा.
महावितरण – वीजजोडणीसाठी सादर कागदपत्रांची वैधता.
प्रदूषण नियंत्रण मंडळ – आवश्यक पर्यावरणीय संमती.
खनिकर्म विभाग – खनिज उत्खनन व संबंधित परवानग्या.
स्फोटक परवाना यंत्रणा – ब्लास्टिंगसंदर्भातील नोंदी व मंजुऱ्या

### ■ चौकशीत उत्तर मिळणार का? दंडानंतरही उद्योग सुरू होण्यामागील प्रक्रिया काय होती?

सर्व विभागांनी प्रत्यक्ष पाहणी केली होती का? परवानग्या देताना कोणत्या कागदपत्रांवर विश्वास ठेवण्यात आला? विविध विभागांच्या नोंदी एकमेकांशी जुळतात का? नियमभंग आढळल्यास जबाबदारी नेमकी कोणाची ठरणार? तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी सील केलेला क्रशर कोणाच्या आदेशाने उघडला ?

### ■ नजरा आता अधिकृत अहवालांकडे

महसूल, महावितरण आणि भूमी अभिलेख विभागांच्या पडताळणी अहवालांनंतरच या प्रकरणातील पुढील प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाईची दिशा स्पष्ट होणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत समोर येणारे अधिकृत निष्कर्ष गाजीपूर क्रशर प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा टप्पा ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# कार्यकर्त्याशिवाय नेता घडत नाही ,सत्ता महत्वाची नाही तर सत्य महत्वाच - आ. बच्चु कडू यांचे प्रतिपादन

### -विदर्भात शिवसेनेची मुठ मजबूत करणार

**अचलपूर/प्रतिनिधीः-** कारखान्यातील केक कापण्याऐवजी शेतकऱ्यांच्या शेतातील फळ कापून शिवसेना शिंदे गटाचे विधान परिषद आमदार बच्चु कडू यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना आमदार आ.बच्चु कडू यांच्या वाढदिवसानिमित्त विदर्भ मील शिवसेना पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयात विवीध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.बच्चु



कडू यांचा भव्य - दिव्य सत्कार शिवसेना शिंदे गटाचे आणि प्रहार जनशक्ती पक्ष अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरातील नेते ,पदाधिकारी, कार्यकर्त्याचा वतीने करण्यात आला. या प्रसंगी गांधी पूल परिसरातील वाचनालय येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच आमदार बच्चु कडू यांच्या हस्ते वृक्षारोपण सुद्धा करण्यात आले. आ. कडू यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना वह्याचे व वाटप करण्यात आले . यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्याध्यक्ष बल्लु जवंजाळ, अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र गोरले , अचलपूर माजी नगर परिषद उपाध्यक्ष अनिल पिंपळे,अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक आनंद काळे, सतीश ☞(पान २ वर)

# वाढत्या शहरीकरणांसाठी 'मित्रा' मार्फत नगर विकासाचे नवीन धोरण ठरविण्याची गरज- आ.संजय खोडके

## छोट्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक अडचणी संदर्भात दीर्घकालीन चर्चा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात शहरीकरण झपाट्याने वाढत असून नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने मूलभूत सुविधांची कामे करणे अत्यंत निकडीचे झाले आहे. राज्यातील 'ड' वर्ग महानगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींची आर्थिक परिस्थिती गंभीर असल्याने त्या स्वतःच्या आर्थिक उत्पन्नातून नागरी भागात पायाभूत सुविधांची पूर्तता करणे अशक्य आहे. अशा परिस्थितीत छोट्या स्थानिक स्वराज संस्थांना शासनाच्या बजेट मधून अथवा जिल्हा नियोजनातून अधिकाधिक निधी मिळण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाच्या धोरणांमध्ये आमुलाग्र बदल करून नवीन धोरण ठरविण्याची आवश्यकता असल्याचे मत आ. संजय खोडके यांनी विधानपरिषदेतून मांडले आहे. विधानपरिषदेमध्ये नियम २६०च्या प्रस्तावावर चर्चा



करतांना आमदार संजय खोडके यांनी नगर विकास संदर्भात बोलतांना राज्यातील 'ड' वर्ग महापालिका तसेच नगरपालिका व नगरपंचायतींना शासनाकडून कुठलाही निधी मिळत नसल्याने स्व-उत्पन्नातून विकास कामे करतांना अडचणी निर्माण झाल्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. नगरोत्थान योजनेच्या अनुदानातून कामे करायची असल्यास '☞(पान २ वर)

# उड्डाणपुलावर भरधाव कार पलटी

### थरारक अपघातात चालक बचावला

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील इर्विन चौक ते राजापेठदरम्यानच्या उड्डाणपुलावर शुक्रवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात मोठा अनर्थ थोडक्यात टळला. भरधाव वेगातील कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कारने प्रथम डिव्हायडरला जोरदार धडक दिली आणि त्यानंतर उड्डाणपुलावरच पलटी झाली. अपघाताची तीव्रता मोठी असतानाही चालक सुखरूप बचावल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

ही घटना ४ जुलैच्या मध्यरात्री सुमारे १ वाजताच्या सुमारास सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इर्विन हॉस्पिटल–राजापेठ उड्डाणपुलावर घडली. अपघातग्रस्त कारचा क्रमांक एमएच-२७/बीई-०८८३ असल्याची माहिती मिळाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, कार राजापेठकडून इर्विन चौकाच्या दिशेने जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण अचानक सुटले. त्यानंतर कारने उड्डाणपुलावरील डिव्हायडरला जोरदार धडक दिली. धडकेचा जोर इतका होता की कार रस्त्यावरच पलटी झाली. अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. काही काळ उड्डाणपुलावर बघ्यांची गर्दी झाल्याने वाहतुकीवरही परिणाम झाला. घटनेची माहिती मिळताच सिटी कोतवाली पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पलटी झालेली कार सरळ करून रस्त्याच्या कडेला हटवली आणि वाहतूक पूर्ववत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना☞(पान २ वर)

# सहाव्या मजल्यावरून कोसळून तरुण कामगाराचा मृत्यू

### -कांरजा लाड येथील विद्याभारती कॉलेज इमारतीवरील दुर्घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** बांधकामस्थळी सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव एका तरुण कामगाराच्या जीवावर बेतल्याची धक्कादायक घटना कांरजा लाड परिसरात घडली. विद्याभारती कॉलेजच्या इमारतीवर काम करत असताना २२ वर्षीय कामगार सहाव्या मजल्यावरून थेट खाली कोसळला. या भीषण अपघातात त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मृत कामगाराची ओळख सजल दिलीप सरदार (वय २२) अशी झाली आहे. तो मूळचा पश्चिम बंगालमधील नदिया जिल्ह्यातील रहिवासी असून बांधकामाच्या कामासाठी अमरावतीत आला होता. माहितीनुसार, सजल सरदार हा आपल्या सहकाऱ्यांसह कांरजा लाड ☞(पान २ वर)

# खोलापूर खून प्रकरणातील फरार आरोपी जेरबंद,यवतमाळ येथून अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** खोलापूर पोलीस ठाण्यात दाखल खूनप्रकरणातील फरार आरोपीला अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने यवतमाळ येथून अटक करून महत्त्वपूर्ण यश मिळविले आहे. सौरभ धर्मा शिरसाठ (वय २१, रा. इब्राहीमपूर, ता. भातकुली, जि. अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ जून २०२६ रोजी सुनिल रमेश कांबळे (वय ४०, रा. उदापूर, ता. भातकुली) यांनी खोलापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या चुलत साळ्याने त्यांच्याकडून दोन हजार रुपये घेतले होते. त्याबदल्यात त्याचा मोबाईल फिर्यादीकडे ठेवण्यात आला होता. मोबाईल परत घेण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर हिंसक संघर्षात झाले. या वादादरम्यान आरोपींनी सुनिलच्या पोटात चाकूने वार करून त्यांना गंभीर जखमी केले. या घटनेची तक्रार खोलापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. परंतू त्यानंतर उपचारादरम्यान सुनिलचा मृत्यू झाल्यानंतर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला होता. घटनेनंतर आरोपी सौरभ शिरसाठ फरार झाला होता. दरम्यान, ४ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर व त्यांच्या पथकाला गोपनीय ☞(पान २ वर)

## सारंग प्रतापे यांचे निधन



अमरावती : स्थानिक शंकर नगर जवळील बालाजी नगर येथील सारंग दीनानाथ प्रतापे यांचे आज दि.५ जुलैला सकाळी नेवाळे वस्ती, चिखली,पुणे येथे आजाराने निधन झाले.ते ४६ वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर चिखली,पुणे येथेच उद्या सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या मागे आई, दोन बहिणी व आप्त परिवार आहे.

# चांदूर रेल्वेतील आठवडी बाजारात चिखलमय रस्त्यामुळे नागरिक त्रस्त

### व्यापारी व ग्राहकांची गैरसोय

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे शहरातील आठवडी बाजारात दर रविवारी शहरासह तालुक्यातील शेकडो नागरिक भाजीपाला, फळे तसेच जीवनावश्यक वस्तू खरेदीसाठी येत असतात. मात्र बाजाराच्या आतील मुख्य रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य आणि पावसाचे साचलेले पाणी यामुळे व्यापारी, ग्राहक आणि पादचाऱ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

रविवारी (ता. ५) भरलेल्या आठवडी बाजारात रस्त्याच्या मध्यभागी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे



नागरिकांना चिखलातून वाट काढत खरेदी करावी लागली. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह बाजारात☞(पान २ वर)

# विद्याभारती कॉलेज परिसरातील खून प्रकरणात तीन आरोपी जेरबंद

### -थरारक पाठलागानंतर बडनेरा वाय-पॉईंटवरून ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विद्याभारती कॉलेज परिसरात झालेल्या खूनप्रकरणातील तीन आरोपींना अमरावती शहर गुन्हे शाखेने अवघ्या दोन तासांत अटक करून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. आरोपी शहरातून पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी थरारक पाठलाग करून त्यांना बडनेरा वाय-पॉईंट



परिसरातून चारचाकी वाहनासह ताब्यात घेतले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (दि. ४ जुलै) रात्री साडेअकराच्या सुमारास विद्याभारती कॉलेजजवळ एका ☞(पान २ वर)